# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे अधिवेशन, २०१७

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक २८ जुलै, २०१७ / श्रावण ६, १९३९ ( शके )**

| | |
|---|---|
| **(१) वित्त आणि नियोजन, वने मंत्री**<br>**(२) ग्रामविकास, महिला व बाल कल्याण मंत्री**<br>**(३) वैद्यकीय शिक्षण, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री**<br>**(४) सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री**<br>**(५) जलसंधारण, राजशिष्टाचार, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री**<br>**(६) रोजगार हमी, पर्यटन मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - १०२**

---

### अनुसूचित जाती-जमाती, विमुक्त जमाती, भूमीहीन शेतमजूर लाभार्थ्यांना कर्ज स्वरुपात अर्थसहाय्य करण्याबाबत

**(१) * ३१०८१ श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रधानमंत्री आवास योजनेतील अनुसूचित जाती-जमाती, विमुक्त जमाती, भूमीहीन शेतमजूर लाभार्थ्यांना अनुदानाशिवाय रुपये ७० हजार कर्ज स्वरुपात अर्थसहाय्य करण्याची मागणी पारधी मुक्ती आंदोलनाच्यावतीने जिल्हाधिकारी, सातारा, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद सातारा व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांचेकडे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुसूचित जाती-जमाती, विमुक्त जमाती, भूमीहीन शेतमजूर लाभार्थ्यांना अनुदानाशिवाय रुपये ७० हजार कर्ज स्वरुपात अर्थसहाय्य करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.
(२) प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) ही केंद्र पुरस्कृत योजना असून योजनेची अंमलबजावणी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार केली जाते. केंद्र शासनाने घरकुलाचे अनुदान रूपये १,२०,००० इतके केले आहे. या व्यतिरिक्त स्वच्छ भारत अभियानातून शौचालय बांधकामासाठी रूपये १२,०००/- व महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमधून ९० दिवसांकरिता अकुशल मजूरीच्या स्वरूपात रूपये १८,०००/- असे एकूण रूपये १,५०,०००/- प्रति लाभार्थ्यांना अर्थसहाय्य दिले जाते.

मार्गदर्शक तत्वातील परिच्छेद क्र.६.२.६ मध्ये लाभार्थ्यांस घरकुल बांधकामासाठी बँकेमार्फत अनुदानाशिवाय रूपये ७०,०००/- पर्यंत कर्ज स्वरूपात अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्याच्या सूचना आहेत. त्यानुसार BLBC/DLBC/SLBC या समितीच्या माध्यमातून आढावा घेणे याबाबतची तरतूद नमूद आहे.

घरकुलाच्या अनुदानाशिवाय रूपये ७० हजार पर्यंत कर्ज स्वरूपात अर्थसहाय्य बँकेमार्फत उपलब्ध करून दिले जात असल्याची माहिती लाभार्थ्यांना देण्यात आली आहे. लाभार्थ्यांना सदरचे अर्थसहाय्य आवश्यक असल्यास त्याबाबतचे प्रस्ताव सादर करण्याबाबत देखील मार्गदर्शन करण्यात आले आहे. लाभार्थ्यांकडून रूपये ७० हजार कर्ज स्वरूपात उपलब्ध करून देण्याचे प्रस्ताव प्राप्त होणे आवश्यक आहे.

घरकुल बांधकामासाठी कर्ज स्वरूपात अर्थसहाय्य मागणीचे प्रस्ताव प्राप्त होताच अशा लाभार्थ्यांस सदरचे अर्थसहाय बँकाच्या माध्यमातून उपलब्ध करून देणेबाबत अग्रणी बँक अधिकारी यांचेवतीने सर्व बँकर्सना BLBC सभेवेळी सूचित करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**मुख्य कार्यकारी अधिकारी, परभणी यांनी पुर्नपडताळणी शिफारसपात्र शिक्षकांना पदस्थापना देण्यासाठी विलंबाचे धोरण राबविल्याबाबत**

**(२) * ३३८३५ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.उच्च न्यायालयाचे आदेश तसेच शिक्षण संचालक, पुणे यांनी दिलेल्या सूचनेप्रमाणे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांनी पुर्नपडताळणी शिफारसपात्र शिक्षकांना पदस्थापना देण्याबाबत धोरण विलंबाने राबविल्याने त्यांच्याविरूध्द कारवाई करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान प्रधान सचिव, ग्रामविकास यांच्याकडे लेखी तक्रारीद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा. उच्च न्यायालय व शिक्षण संचालक, पुणे यांचे आदेश असतानाही शिक्षकांना पदस्थापना देण्याबाबत प्रधान सचिव, ग्रामविकास यांच्याकडे मार्गदर्शन मागवून मुख्य कार्यकारी अधिकारी, परभणी यांनी विलंबाचे धोरण राबविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा. उच्च न्यायालय व शिक्षण संचालक यांचे आदेश डावलून त्यांचा अवमान करणाऱ्यांविरूध्द शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** १) अशा स्वरुपाची तक्रार निदर्शनास आलेली नाही.

(२) व (३) जिल्हा परिषद, परभणी यांची बिंदूनामावली पुर्ण झालेली नसल्यामुळे तसेच सन २०१६-१७ ची संचमान्यता पुर्ण झालेली नसल्यामुळे या शिक्षकांना पदस्थापना देता येत नव्हती. आता जिल्हा परिषद, परभणी यांची बिंदूनामावली विभागीय आयुक्त औरंगाबाद (मागासवर्गीय कक्ष) यांचेकडून तपासून पुर्ण झालेली आहे, तसेच सन २०१६-१७ ची संच मान्यता पुर्ण झालेली असून सदर शिक्षकांना बिंदूनामावलीनुसार पदस्थापना देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**पनवेल (जि.रायगड) येथील रक्तपेढयांमधील रक्ताची टंचाई दूर करण्याबाबत**

**(३) * ३१३४४ श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, अॅड.राहुल नार्वेकर, श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) येथील रक्तपेढयांमध्ये रक्ताची टंचाई निर्माण झाल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रक्ताच्या टंचाईमुळे रुग्णांच्या नातेवाईकांना इतर रक्त पेढयातून रक्त आणण्यासाठी प्रयत्न करावे लागत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पनवेल येथील रक्तपेढयात पुरेशा प्रमाणात रक्ताचा पुरवठा करुन रुग्णांच्या नातेवाईकांची गैरसोय दूर करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात कायद्याचे उल्लंघन करुन बेकायदेशीर नर्सिंग होम सुरु असल्याबाबत**

**(४) * ३१८२५ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.सुजितसिंह ठाकूर, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सुमारे ३ हजार ५९५ बेकायदेशीर नर्सिंग होम सुरु असल्याचे निदर्शनास आलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशाच प्रकारे बेकायदेशीर नर्सिंग होममध्ये उपचार घेणाऱ्या पुणे येथील अतुल भोसले यांचे वडिलांवर इंदापूर तालुक्यातील सुविधा रुग्णालयात झालेल्या चुकीच्या उपचारांमुळे त्यांचे निधन झाल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मेडिकल कौन्सिल कायदा, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, अग्निशमन दल, अन्न व औषध प्रशासनाची नोंदणी, आदी विविध कायदयातील तरतुदी व नियमाचे पालन न करता, सुमारे ३ हजार ७९५ नर्सिंग होम व रुग्णालय बेकायदा सुरु असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच राज्यातील रुग्णालयांच्या तपासणी मोहिमेत ५६५ रुग्णालयांनी “बॉम्बे नर्सिंग होम ॲक्ट” अंतर्गत नोंदणी केलेली नसल्याचे व २७८ रुग्णालयांमध्ये इतर पॅथीच्या डॉक्टरांनी “ॲलोपॅथी” चा वापर केल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने बेकायदेशीर नर्सिंग होम चालकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) मार्च, २०१७ ते मे, २०१७ या कालावधीत केलेल्या धडक तपासणी मोहिमेत ६३१८ नर्सिंग होममध्ये विविध कायद्यातील तरतूदींचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) हे खरे नाही,

सुविधा रुग्णालय, पुणे हे बेकायदेशीर नसून श्री.अतुल भोसले यांच्या वडिलांचे निधन चुकीच्या उपचारामुळे झालेले नाही.
(३) व (४) राज्यातील ग्रामीण, शहरी व म.न.पा. क्षेत्रातील नर्सिंग होम्सची तपासणी केली असता ६३१८ नर्सिंग होम्समध्ये विविध कायद्यातील तरतुदीच्या पालनात अनियमितता आढळून आल्या आहेत.
(५) तपासणी पथकाद्वारे दिनांक १५/३/२०१७ ते दिनांक ३१/५/२०१७ पर्यंत राज्यातील आरोग्य संस्थांच्या तपासणीबाबत धडक मोहिम घेण्यात आली. सदर मोहिमेत आढळलेल्या त्रुटी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीसमोर ठेवण्यात आल्या असून समितीने नैसर्गिक न्यायाच्या तत्वानुसार संबंधीत केंद्रांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी दिली आहे. तसेच समितीच्या शिफारशीनुसार १५ बोगस डॉक्टरांवर एफआयआर दाखल करण्यात आला आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बीड जिल्हयात अतिवृष्टीमुळे क्षतिग्रस्त व फुटलेल्या पाझर तलावांच्या दुरुस्तीबाबत

**(५) * ३१३१७ श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हयात माहे ऑक्टोबर व नोव्हेंबर, २०१६ या महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे अनेक पाझर तलाव आणि सिंचन प्रकल्प क्षतिग्रस्त झाले होते, सदर तलाव व सिंचन प्रकल्पांच्या दुरुस्तीसाठी निधी मंजूर केल्याची घोषणा माहे डिसेंबर, २०१६ मध्ये व त्यादरम्यान करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेवराई विधानसभा मतदार संघातील अर्धमसाला, राजेगाव, रीधोरी आदी तलावांच्या दुरुस्तीसाठी जिल्हाधिकारी, बीड यांनी दिनांक ३ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास संबंधित विभागास पत्र दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) व (२) होय, हे अंशत : खरे आहे.

बीड जिल्हयात माहे सप्टेंबर, २०१६ या महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे बीड, पाटोदा, अंबाजोगाई, आष्टी, शिरूर, गेवराई, माजलगाव, वडवणी, केज, धारूर व परळी तालुक्यातील २६४ विविध लघुसिंचन प्रकल्प क्षतिग्रस्त झाले आहेत. अशा अतिवृष्टीमुळे क्षतिग्रस्त झालेल्या तलावांच्या दुरूस्तीसाठी आवश्यक निधी मागणी प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना दिनांक १६ सप्टेंबर, २०१६ रोजीच्या जिल्हा आढावा बैठकीमध्ये जिल्हाधिकारी, बीड यांनी दिल्या आहेत.

(३) व (४) लघुसिंचन (जलसंधारण) विभाग, बीड यांचे अंतर्गत ९ पाझर तलाव व २ कोल्हापुरी बंधारे क्षतिग्रस्त झाले असून ९ पाझर तलावांच्या दुरूस्तीसाठी रूपये ६८.५० लक्ष निधी मागणीचा प्रस्ताव दिनांक ७/१०/२०१६ रोजी जिल्हाधिकारी, बीड यांना सादर करण्यात आला आहे. २ कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्यांना जलयुक्त शिवार अभियानांतर्गत प्रशासकीय मान्यता प्राप्त असून तांत्रिक मंजुरीची कार्यवाही प्रगतीत आहे. त्यापैकी कोल्हापुरी बंधारा लोळदगावचे माती भरावाचे काम सुरू आहे.

उर्वरित २५३ लघुसिंचन प्रकल्प जिल्हा परिषद, बीड यांचे कार्यक्षेत्रातील असून त्यांचे दुरूस्ती करिता रुपये १७.११ कोटी निधी मागणीचा प्रस्ताव दिनांक १०/११/२०१६ रोजी जिल्हाधिकारी, बीड यांना सादर करण्यात आला आहे.

-----------------

**राज्यातील धरणांची सुरक्षा, भूकंप मापक उपकरणे, पाण्याचा प्रवाह मोजण्याची यंत्रे आदींच्या खरेदी केलेल्या उपकरणाच्या गुणवत्तेबाबत**

**(६) * ३१०९३ आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील धरणांची सुरक्षा, भूकंप मापक उपकरणे, पाण्याचा प्रवाह मोजण्याची यंत्रे आदींच्या खरेदी केलेल्या उपकरणाच्या गुणवत्तेबद्दल शंका निर्माण झाल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील धरणांच्या सुरक्षिततेबाबत कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) व (२) हे खरे नाही.

धरणांची सुरक्षा, भुकंपमापक उपकरणे, पाण्याचा प्रवाह मोजण्याची यंत्रे आदींची खरेदी ही राज्यस्तरीय खरेदी समितीमार्फत गुणवत्तापूर्ण व निविदा प्रक्रियेद्वारे करण्यात येते. सदर उपकरणांद्वारे धरणाच्या स्वास्थ्यासंबंधित पुरक माहिती मिळू शकते व त्याद्वारे काही उपाययोजना करणे शक्य होते. धरण सुरक्षितता संघटना व क्षेत्रिय अभियंत्यांकडून पावसाळापूर्व व पावसाळोत्तर धरण सुरक्षितता पाहणीच्या आधारे सुरक्षेसंबंधित उपाययोजना करण्यात येत असतात. धरण सुरक्षिततेबाबत जलसंपदा विभागामार्फत आवश्यक ती सर्व काळजी घेण्यात येत असते.

बहुतांशी धरण सुरक्षा उपकरणे ही धरणांच्या भिंतीमध्ये धरण बांधकामाच्या वेळेस कायमस्वरुपी स्थापित केली जातात. त्यांची दुरुस्ती आवश्यकतेनुसार केली जाते. सदर उपकरणे त्यांच्या विवक्षित आयुष्यमानानुसार नोंदी देत असतात. त्यानुसार धरणाचे स्वास्थ्य व्यवस्थित असल्याची खात्री करण्यात येत असते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शहापूर तालुक्यातील (जि.ठाणे) भातसा प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(७) * ३११०४ श्री.जगन्नाथ शिंदे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.किरण पावसकर:** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भातसा (ता.शहापूर, जि.ठाणे) प्रकल्पासाठी पाल्हेरी, पाचिवरे, कोठारे, पळसपाडा व इतर १४ आदिवासी पाडयांतील सुमारे ४४४.७४ हेक्टर जमीन पाण्याखाली गेली असून सदरहू ५ गावातील विस्थापित झालेल्या १२७ कुटूंबांचे ४७ वर्षांनंतरही पुनर्वसन झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भातसा प्रकल्पग्रस्तांनी दिनांक ९ जानेवारी, २०१३ रोजी वा त्यासुमारास भातसा प्रकल्प कार्यालयाला घेराव घातल्याने प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता यांनी प्रकल्पग्रस्तांचा एक सविस्तर पुनर्वसन आराखडा तयार करून दिनांक १९ मार्च, २०१३ रोजी वा त्यासुमारास जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांना पाठविला असून कोकण विभागीय आयुक्त यांनी सहसचिव, महसूल व वन विभाग यांना प्रकल्पग्रस्तांना पुनर्वसनाच्या सुविधा मिळाव्यात यासाठी सूचित केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू पुनर्वसन आराखडयात विस्थापित झालेल्या भातसा धरण वसाहतींजवळील १५.३३ हेक्टर जमिनीवर पुनर्वसन करून त्याठिकाणी १८ मुलभूत सुविधा पुरविणे आराखडयात समाविष्ट केले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, माहे एप्रिल, २०१६ मध्ये अध्यक्ष, भातसा प्रकल्पग्रस्त पुनर्वसन समिती यांच्या नेतृत्त्वाखाली मा. मुख्यमंत्री यांची भेट घेवून सदरहू आराखडयास त्वरीत मंजूरी मिळून त्याची विनाविलंब अंमलबजावणी व्हावी म्हणून मागणी केली असता मा.मुख्यमंत्री यांनी शिष्टमंडळास आश्वासन देवूनही अद्याप कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, भातसा प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम तसेच प्रकल्पग्रस्तांच्या मुलांना मुंबई महानगरपालिकेत नोकरीवर त्वरीत सामावून घेण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

भातसा प्रकल्पासाठी ४४४.७३ हे. बुडीत क्षेत्रासाठी खाजगी जमीन संपादन करण्यात आली आहे. सदर संपादनाची प्रक्रिया पुनर्वसन कायदा सन १९७६ अंमलात येण्यापूर्वी सन १९६८-६९ मध्ये झाले असल्याने वरील ९७ प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन शासनातर्फे झालेले नाही.

(२) होय.

(३) होय.

(४) हे खरे नाही.

(५) प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन भातसानगर वसाहतीमधील शासकीय जमिनीवर करण्याच्या अनुषंगाने प्रस्ताव जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दिनांक २५/२/२०१५ अन्वये शासनास सादर केला आहे. सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

मुंबई महापालिकेत प्रकल्पग्रस्तांना नोकऱ्या देणेकरिता प्रकल्पग्रस्तांची यादी आयुक्त, मुंबई महानगरपालिका यांच्याकडे जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दिनांक ३१/५/२०१४ पत्रान्वये पाठविली आहे. त्यावर मुंबई महापालिकेमार्फत कार्यवाही होणे अभिप्रेत आहे.

-----------------

**मुंबईतील डोंगरी येथील बालनिरीक्षणगृहातून मुले पळून गेल्याबाबत**

**(८) * ३२८०५ श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील डोंगरी येथील बालनिरीक्षणगृहातून तीन वर्षात तीस मुले पळून गेल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पळून गेलेल्या मुलांचा वयोगट १२ ते १८ वर्षाचा असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार यास जबाबदार असणाऱ्या व्यक्तीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, उक्त मुले पळून जाण्यामागची कारणे काय आहेत, याबाबत शासनाने शोध घेतला आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) होय.

(३) चिल्ड्रेन्स एड् सोसायटी माहिम, मुंबई यांचेमार्फत संबंधित रक्षक कर्मचा-यांकडून खुलासा मागविण्यात आला आहे. प्राप्त खुलाशानुसार मुंबईतील डोंगरी येथील बालनिरीक्षणगृहातून सन २०१४-१५ चे सन २०१६-१७ या मागील तीन वर्षात ४२ मुलांनी पलायन केले आहे. त्यापैकी १६ मुलांना परत आणण्यात आले आहे तसेच एका रक्षक कर्मचा-यांस सेवेतून निलंबित करण्यात आले असून सदर प्रकरणाची विभागीय चौकशी सुरू आहे.

(४) संस्थेत विधी संघर्षग्रस्त मुलांना दाखल केले जाते. सदर विधी संघर्षग्रस्त मुलांच्या प्रकरणामध्ये फौजदारी प्रक्रियेमुळे अंतिम निर्णय लागणास विलंब होतो.

अशा प्रकरणामध्ये दाखल झालेली विधी संघर्षग्रस्त बालके पळून जाण्याचा प्रयत्न करतात. सदर मुले पळून जाऊ नये म्हणून मुलांचे समुपदेशन, सुरक्षा व्यवस्था कडक करणे, मुलांचे आरोग्य व आहाराविषयी दर्जा सुधारणे, परिसर स्वच्छता, परिविक्षा अधिकारी यांचेमार्फत पालकांचा लवकरात लवकर शोध घेणे, मुलांना व्यवसाय प्रशिक्षण देणे व करमणुकीबाबत दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**उमरखेड व शेंबाळप्रिंपरी (जि.यवतमाळ) येथील वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांनी चार कोटीचे काम ई निविदेशिवाय मंजूर करुन गैरव्यवहार केल्याबाबत**

**(९) * ३२११६ श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरखेड व शेंबाळप्रिंपरी (जि.यवतमाळ) येथील वन परिक्षेत्र अधिकाऱ्यांनी रुपये चार कोटीचे काम ई-निविदेशिवाय करुन गैरव्यवहार केल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नूसार ई-निविदेशिवाय काम करण्यास जबाबदार असणाऱ्या वन अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.

पुसद वन विभागातील उमरखेड व शेंबाळपिंपरी वनपरिक्षेत्रात सन २०१५-१६ या वर्षात जलयुक्त शिवार अभियान कार्यक्रमांतर्गत वनक्षेत्र लागून असलेल्या २१ गावांची निवड करुन कामे प्रस्तावित करण्यात आली होती. सदर प्रस्तावित केलेल्या कामाची अंदाजपत्रके ही ३ लाखापेक्षा कमी किंमतीची होती. सदर कामांना जिल्हाधिकारी यवतमाळ यांची प्रशासकीय मंजूरी प्राप्त झाली होती. सदर अंदाजपत्रकास तांत्रिक मंजूरी प्रदान करण्यास सक्षम असल्याने

वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी सदरची कामे अंदाजपत्रकातील तरतूदीप्रमाणे जलयुक्त शिवार अभियानांतर्गत वनविभागाच्या कार्यक्षेत्रातील कामे संयुक्त वनव्यवस्थापन समिती/वन विभागामार्फत करण्यात आलेली आहेत. सदरची कामे ही अंदाजपत्रकीय तरतूदीप्रमाणे नियोजनबध्द पध्दतीने पुर्ण करण्यात आलेली आहेत.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील भूमिपुत्र विद्यार्थ्यांना पदवीव्युत्तर मेडिकल आणि डेंटल अभ्यासक्रमांच्या प्रवेशात आरक्षण देण्याबाबत

**(१०) * ३३५९८ श्री.सुजितसिंह ठाकूर, श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात ग्रामीण भागात डॉक्टरांचा तुटवडा दूर होऊन रुग्णांना वैद्यकीय सेवा मिळावी यासाठी पदवीव्युत्तर मेडिकल आणि डेंटल अभ्यासक्रमांच्या प्रवेशात, राज्यातील भूमिपुत्र विद्यार्थ्यांना ६७.५ टक्के आरक्षण देण्याचा माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान शासनाने काढलेला अध्यादेश मा.उच्च न्यायालयाने माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान रद्दबातल ठरविला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाचा सदरहू निर्णय मा. उच्च न्यायालयाने रद्दबातल ठरविण्याची कारणे काय आहेत व शासनाची योग्य बाजू न्यायालयात मांडण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, परराज्यातील प्रवेश घेणारे विद्यार्थी हे वैद्यकीय अभ्यासक्रम पूर्ण झाल्यावर राज्याच्या ग्रामीण भागात जाण्यास तयार नसल्यामुळे ग्रामीण भागातील जनतेस योग्य औषधोपचार उपलब्ध व्हावे याकरीता राज्यातील भूमिपुत्र विद्यार्थी यांना ६७.५ टक्के प्रवेश देण्याकरीता कायदयात तरतूद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) तसेच मेडिकल प्रवेश प्रकरणी महाविद्यालयातील ६७ टक्के अधिवास कोट्याला मा. उच्च न्यायालयाने दिलेली स्थगिती मा.सर्वोच्च न्यायालयाने कायम ठेवून महाराष्ट्र शासनाची याचिका फेटाळली, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, राज्यात आरोग्य सेवा अधिक चांगली व सक्षम होण्यासाठी राज्यातील उमेदवारांना जास्तीत जास्त जागा मिळण्याच्या हेतुने या कोट्याच्या बाबतीत युक्तीवाद केला होता, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील भूमिपुत्रांना न्याय मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय, हे अंशत: खरे आहे. दिनांक २७/०४/२०१७ रोजीच्या शासन निर्णयास मा.उच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे.

(२) मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल झालेल्या रिट याचिका क्रमांक ५२८३/२०१७ च्या संदर्भात शासनातर्फे बाजू मांडण्यासाठी 'विशेष अभियोक्ता' यांची नेमणूक करण्यात आली होती. तथापि, दिनांक २७/०१/२०१७ पासून पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी उमेदवारांचे ऑनलाईन अर्ज भरुन घेण्याची प्रक्रिया सुरु झाली होती व पुढील प्रवेश प्रक्रिया ही दिनांक ०४/०४/२०१७ रोजी सुरु झाली होती. त्यामुळे प्रवेशप्रक्रियेच्या मध्यावरच प्रवेशाच्या पात्रतेचे निकष बदलण्याची कृती योग्य नसल्याचे कारण नमूद करुन मा.उच्च न्यायालयाने शासन निर्णय दिनांक २७/०४/२०१७ यास स्थगिती दिली आहे.

(३) राज्यातील अधिवासी विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यासाठी शासन निर्णय दिनांक २७/०४/२०१७ अन्वये आदेश निर्गमित करण्यात आले होते. सदर शासन निर्णयास मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या स्थगिती विरोधात मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका क्रमांक १४४४७/२०१७ दाखल करण्यात आली होती. परंतु सदर याचिका मा.सर्वोच्च न्यायालयाने निकाली काढली आहे. तथापि, मूळ याचिका अद्याप मा.उच्च न्यायालयात प्रलंबित आहे. दरम्यान प्रवेश नियमात बदल करता येईल का, याबाबत विधी व न्याय विभागाशी सल्लामसलत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) विशेष अनुमती याचिका क्रमांक १४४४७/२०१७ या प्रकरणातील मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार मा.उच्च न्यायालयाने दिलेली स्थगिती कायम राहिली आहे.

(५) होय, हे खरे आहे.

(६) मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल मूळ रिट याचिका प्रलंबित असून राज्याची बाजू विशेष अभियोक्त्यांमार्फत मांडण्यात येत आहे. तसेच, दरम्यान पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमांमध्ये सुधारणा करुन अधिवासी उमेदवारांकरिता जास्त जागा राखीव ठेवण्याची तरतूद करता येईल का, याबाबत विधी व न्याय विभागाशी सल्लामसलत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**खाडीकिनारी होत असलेल्या वाढत्या अतिक्रमणामुळे कांदळवनांच्या हद्दीच्याबाहेर संरक्षण भिंत उभारण्याबाबत**

**(११) * ३२२२९ ॲड.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खाडीकिनारी होत असलेल्या वाढत्या अतिक्रमणामुळे मुंबई, अंधेरी, वर्सोवा, ठाणे, वसई, नवी मुंबई परिसरातील कांदळवने नष्ट होत असल्याने ती वाचविण्याकरिता कांदळवनांच्या हद्दीच्याबाहेर संरक्षण भिंत उभारण्याचा निर्णय वन विभागाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई, अंधेरी, वर्सोवा येथील कांदळवनांच्या करण्यात आलेल्या कत्तलीची शासनामार्फत होत असलेली चौकशी पूर्ण झाली आहे काय,

(३) असल्यास, प्रश्नोक्त बाब क्र. १ बाबत शासनाने चौकशी करुन सदर कामाकरिता निधीची तरतूद करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच कांदळवनाची कत्तल करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) मुंबई, मुंबई उपनगर आणि नवी मुंबई येथील कांदळवन क्षेत्राचे संरक्षण करण्याकरिता तारेचे कुंपण व संरक्षक भिंत बांधण्याचा निर्णय घेतलेला आहे, हे खरे आहे.

(२) मुंबई शहर येथील कुलाब्यातील वन विभागाच्या ताब्यातील क्षेत्रात असणारे अतिक्रमणाविरुद्ध चौकशी करुन निष्कासनाची कार्यवाही करण्यात आलेली आहे. अंधेरी, वर्सोवा येथील वन विभागाच्या ताब्यातील क्षेत्रात कांदळवनाची कत्तल केल्याचे आढळून आलेले नाही.

(३) कांदळवन संवर्धन प्रतिष्ठान यांच्या निधीमधून संरक्षण भिंत बांधण्याकरिता ३ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. याशिवाय एम.एम.आर.डी.ए. यांच्याकडील प्राप्त निधीतून १० कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे.

(४) शासन स्तरावरुन खाडी किनाऱ्यावरील कांदळवनाचे संरक्षण व संवर्धन करण्याकरिता पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत :-

१. वन विभागाच्या ताब्यातील कांदळवन क्षेत्रात कांदळवनाची तोड, अनधिकृत भराव, अतिक्रमणाविरुद्ध वन गुन्ह्याची नोंद करण्यात आलेली असून त्यांच्याविरुद्ध न्यायालयामध्ये ७ खटले दाखल करण्यात आलेले आहेत. तसेच कांदळवन क्षेत्रात अनधिकृत भराव करताना ८ वाहने जप्त करण्यात आलेली आहेत.

२. महसूल विभाग, पोलीस विभाग आणि महानगरपालिका यांच्या सहकार्याने विविध ठिकाणी अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. मुंबई कांदळवन संधारण घटकाकडून मुंबई, मुंबई उपनगरातील अनधिकृत झोपड्यांचे निष्कासन करण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**वस्तू व सेवा कर (जीएसटी) मधून जीवनावश्यक असलेल्या खाद्यांन्नाच्या वस्तू वगळण्याबाबत**

**(१२) * ३२३८७ श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वस्तू व सेवा कर (जीएसटी) मधून जीवनावश्यक असलेल्या खाद्यांन्नाच्या वस्तू वगळाव्यात व इतर मागण्यांसाठी राज्यभरातील व्यापाऱ्यांनी दिनांक १५ जून, २०१७ रोजी लाक्षणिक बंद पुकारल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील व्यापाऱ्यांच्या प्रमुख मागण्यांबाबत शासनाने कोणती भूमिका घेतली आहे,

(३) तसेच जीवनाश्यक असलेल्या खाद्यांन्नांना जीएसटी मधून वगळावे याबाबत शासनाने केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) होय.

(२) व्यापाऱ्यांची मिरची, हळद, चिंच, खजूर, मनुका, सुटा चहा, सुका मेवा इ.वस्तूवर जीएसटी आकारणी करु नये ही प्रमुख मागणी होती. वस्तू व सेवा कर प्रणालींतर्गत वस्तूवरील कराच्या दराची शिफारस करण्याचे अधिकार वस्तू व सेवा कर परिषदेस आहे. परिषदेने शिफारस केलेल्या कराच्या दरापासून वेगळे कर ठरविण्यात येऊ नयेत अशी शासनाची भूमिका आहे.

(३) होय. जीवनाश्यक असलेल्या खाद्यांन्नाना जीएसटी अंतर्गत करमाफी देण्याबाबतचे प्रस्ताव शासनाने वस्तू व सेवा कर परिषदेकडे विचारार्थ पाठविले होते.

(४) लागू नाही.

-----------------

## पंचायत समिती (जि.हिंगोली) यांच्या गोदामात लाखो रुपयांचे कृषी साहित्य व अवजारांचा अपहार झाल्याबाबत

**(१३) * ३२२८४ श्री.रामराव वडकुते :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंचायत समिती (जि.हिंगोली) यांच्या गोदामात लाखो रुपयांचे कृषी साहित्य व अवजारांचा अपहार झाल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

अपहार झाल्याचे दिनांक २९ नोव्हेंबर, २०१६ रोजी आढळून आले आहे.

(२) व (३) पंचायत समिती स्तरावरून चौकशी केली असता दोषी असलेले श्री.बी.डी. सावके, गोदामपाल यांच्याविरूध्द विभागीय चौकशी आदेशित करून सदरची रक्कम वसूल करण्याची कार्यवाही सुरू आहे.

-----------------

## जिल्हा सामान्य रुग्णालय (जि.गडचिरोली) येथील सिटी स्कॅन मशिन बंद असल्याबाबत

**(१४) * ३२७३५ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा सामान्य रुग्णालय (जि.गडचिरोली) येथील सिटी स्कॅन मशिन गेल्या ७-८ महिन्यांपासून बंद असल्याने स्थानिक रुग्णांची गैरसोय होत असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सिटी स्कॅन मशिन जुनी झाली असून नवीन मशिन उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव रुग्णालय प्रशासनाने शासनाकडे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

जिल्हा सामान्य रुग्णालय, गडचिरोली येथील सी.टी. स्कॅन मशिन दिनांक २७/०६/२०१६ पासून बंद आहे. सदर मशिन १० वर्षापूर्वी खरेदी करण्यात आली असून, मशिनच्या दुरुस्तीवरील खर्च जास्त असल्याने नवीन मशिन खरेदी करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२) व (३) हे खरे आहे.

जिल्हा रुग्णालय गडचिरोलीसह एकूण ३१ रुग्णालयांना सी.टी. स्कॅन मशिन उपलब्ध करण्याचा प्रस्ताव शासनास प्राप्त असून याबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वैद्यकीय पदव्युत्तर शिक्षण (पॅथॉलॉजी) न घेतलेल्या व्यक्ती पॅथॉलॉजी लॅब चालवून तपासणी अहवाल देत असल्याबाबत

**(१५) * ३१८३३ श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, ॲड.जयदेव गायकवाड, श्रीमती स्मिता वाघ, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.राहुल नार्वेकर, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे : तारांकित प्रश्न क्रमांक २६८९३ ला दिनांक ९ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैद्यकीय पदव्युत्तर शिक्षण (पॅथॉलॉजी) न घेतलेल्या व्यक्ती या पॅथॉलॉजी लॅब चालवून तपासणी अहवाल देत असल्याने रुग्णांच्या जिवीताला धोका निर्माण होऊ शकतो असे इंडियन मेडिकल असोसिएशनने (आय.एम.ए.) मा.मुख्यमंत्री यांना माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान पत्राद्वारे कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने पॅथॉलॉजीमध्ये रुग्णांच्या केल्या जाणाऱ्या तपासण्यांचे निष्कर्ष काढण्याचा अधिकार नेमका कुणाला असावा यासाठी डॉ.पी.टी.वाकोडे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार वाकोडे समितीच्या महत्वपूर्ण सूचना व शिफारशीवर राज्य शासनाने अद्याप कोणतीच कार्यवाही केलेली नसल्याचे दिनांक १ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आहे, हे खरे आहे काय,

(४) तसेच रुबी मेडिकल सेंटर, विक्रोळी (मुंबई) मध्ये होणारे अवैध प्रकरण एफडीएने निदर्शनास आणल्यानंतर शहरातील इतर बोगस पॅथॉलॉजी संदर्भात तसेच उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही.
(२) तथापि, हे खरे आहे.
(३) नाही, हे खरे नाही.
(४) मे. रुबी मेडिकल सेंटर, विक्रोळी (मुंबई) या ठिकाणी अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी दिनांक २६/०४/२०१७ रोजी छापा टाकला होता. सदर छापा हा बोगस पॅथॉलॉजी लॅब चालविण्यासंदर्भात नसून गर्भपातासाठी बेकायदेशीररित्या वापरण्यात येत असलेल्या एम.टी.पी. किट्स या औषधाच्या संदर्भात केलेल्या कारवाईच्या संदर्भात आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**यवतमाळ जिल्ह्यात जलयुक्त शिवार योजनेंतर्गत कामे अपूर्ण राहिल्याबाबत**

**(१६) * ३०८९६ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्याग्रस्त असून सन २०१५-१६ या आर्थिक वर्षातील ४१३ गावांपैकी बहुतांश गावातील जलयुक्त शिवार योजनेची कामे अपूर्ण असल्याचे माहे एप्रिल-मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामे माहे मार्च, २०१७ पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश असूनही कामे अपूर्ण आहेत तसेच सन २०१६-१७ मधील कामे देखील अपूर्ण असून त्यांना माहे जून पर्यंत वाढीव मुदत दिली आहे या कामांचे अहवाल तात्काळ सादर करावयाचे निर्देश जलसंधारण मंत्री यांनी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच पुसद तालुक्यात (जि.यवतमाळ) कृषी कार्यालयामार्फत जलयुक्त शिवार योजनेच्या कामात गैरव्यवहार झाल्याची तक्रार ग्राहक संरक्षण संस्था यांनी माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर तालुक्यातील अनेक गावात जलयुक्त शिवाराची कामे निकृष्ट दर्जाची करण्यात आल्याने हर्षी, दहीवड शिवारात बांधलेला बंधारा एका पावसात वाहून गेला, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२) व (३) होय, हे खरे आहे.
(४) हे खरे नाही.
(५) ग्राहक संरक्षण संस्थेच्या तक्रारीच्या अनुषंगाने उपविभागीय कृषी अधिकारी, पांढरकवढा यांचेमार्फत चौकशी करण्यात आली असून बंधाऱ्याचे बांधकाम पूर्णावस्थेत आढळून आले आहे.

तसेच तक्रारदार ग्राहक संरक्षण संस्था व संबंधित शेतकरी यांनी संबंधित कंत्राटदाराने बंधाऱ्याचे सुरूवातीस पायाभरणीचे केलेले काम काढून सर्व नविन व चांगले बांधकाम केले असल्याचे लेखी कळविले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कालमपाडा (ता.मोखाडा, जि.पालघर) येथे कुपोषणाने मृत्यू झालेल्या मुलाच्या कुटूंबियांना आर्थिक मदत मिळण्याबाबत**

**(१७) * ३२३१४ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.राहुल नार्वेकर : तारांकित प्रश्न क्रमांक २९३२७ ला दिनांक १६ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कालमपाडा (ता.मोखाडा, जि.पालघर) येथील सागर वाघ या मुलाचा माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये मृत्यू झाला असता शासनाने सदर मुलाच्या कुटूंबियांना आर्थिक मदत देण्याचे मान्य केल्यानंतर ९ महिन्याचा कालावधी उलटूनही माहे मे, २०१७ अखेर आर्थिक मदत दिली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन मान्य केलेली आर्थिक मदत सागर वाघ यांच्या कुटूंबियांना देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.
मयत सागर वाघ मुलाच्या कुटूंबियांना घोषित केलेली मदत देण्यात आलेली आहे.
(२) व (३) कार्यवाही करण्यात आली असल्यामुळे चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**ढेबेवाडी (ता.पाटण, जि.सातारा) येथील दक्षिण वांग नदीवरील धरणाचे बांधकाम अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(१८) * ३१२०४ श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अमरसिंह पंडित, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ढेबेवाडी (ता.पाटण, जि.सातारा) येथील दक्षिण वांग नदीवरील वांग मराठवाडी धरणाचे बांधकाम अद्यापपर्यंत अपूर्णावस्थेत असून तेथील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन झाले नसल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर धरणाची पाणी साठवण क्षमता २.७३ टी.एम.सी. असून धरणात मोठया प्रमाणात गाळ साचल्याने सद्य:स्थिती ०.६० टी.एम.सी.पाणी साठा होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या धरणासाठी शासनाने तेथील अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करुन त्या गावांना धरणाचे पाणी न देणे, तसेच तेथील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसित करुन संपूर्ण पायाभूत सुविधा न देणे व धरणाच्या घळभरणीच्या कामासाठी जिल्हाधिकारी व दंडाधिकारी याची पूर्व परवानगी न घेताच धरणाच्या घळभरणीचे काम सुरु केले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वांग-मराठवाडी प्रकल्पग्रस्तांना सन २००७ च्या शासन निर्णयाप्रमाणे जमीन वाटपासह प्रलंबित मागण्यांच्या पूर्ततेसाठी जलाशयात उतरुन ठिय्या आंदोलन केल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळवून देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) वांग मराठवाडी धरणाचे बांधकाम ८० टक्के पूर्ण झाले आहे. १० पैकी ८ को.प. बंधारे पूर्ण झाले आहेत. प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाची कार्यवाही ५० टक्के पूर्ण झाली आहे.

(२) नाही.

(३) पुनर्वसनाची कामे अद्याप प्रगतीपथावर आहेत व घळभरणीच्या कामासाठी मुख्य अभियंता यांनी दिनांक १८/०३/२०१० रोजीच्या पत्रान्वये मान्यता दिलेली आहे.

(४) होय.

(५) प्रकल्पग्रस्तांसमवेत बैठका घेऊन त्यांचे उर्वरित प्रश्न सोडविण्यात येत आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**महालगाव- मोरगाव (ता.मोहाडी, जि.गोंदिया) येथील बंधाऱ्यासाठी निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरल्याबाबत**

**(१९) * ३२९५९ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महालगाव-मोरगाव (ता.मोहाडी, जि.गोंदिया) येथील गायमुख नाल्यावर जलयुक्त शिवार योजनेतून बांधण्यात येत असलेल्या बंधाऱ्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरुन होत असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बंधाऱ्याचे काम निकृष्ट दर्जाचे असल्यामुळे बंधारा एक-दोन पुरात वाहून जाण्याची शक्यता असून त्यामुळे जीवीत हानी होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबतची तक्रार व निवेदन स्थानिक रहिवाशांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांकडे केली असून सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) यासंदर्भात लघु सिंचन विभाग, जिल्हा परिषद, भंडारा कार्यालयात तक्रार प्राप्त झाली होती.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी लघुसिंचन (जि.प.) उपविभाग, भंडारा यांनी सदर कामांची चौकशी केली असून काम दर्जात्मक असल्याचे आढळून आले आहे. तसेच ए.एफ.सी.इंडिया लिमीटेड या त्रयस्थ यंत्रणेने कामांची पाहणी केली असून कामांची गुणवत्ता व दर्जाबाबत शेरे उपस्थित केलेले नाहीत. फक्त महालगाव-१ बंधाऱ्याचे बांधकाम व जमीन यामधील पोकळी मातीने भरावी व दबाई नीट करण्यात यावी असे नमूद केले होते. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात दुष्काळ नसतानाही इंधनावर दुष्काळ उपकर लावल्याबाबत**

**(२०) * ३०९०३ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, आर्कि.अनंत गाडगीळ, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पेट्रोलची मूळ किंमत २९ रुपये व त्यावरील टॅक्स ४८ रुपये असून देशात सर्वात महाग पेट्रोल राज्यात विकले जात असल्याचे दिनांक २५ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी पेट्रोलवर बसत असलेल्या टॅक्समुळे ग्राहक अडचणीत आला असून दारुबंदीमुळे बुडालेल्या महसूलाची तूट भरुन काढण्यासाठी शासनाने पेट्रोलवर ३ रुपये अधिभार लावल्यामुळे सर्वसामान्य जनतेत नाराजी पसरली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच शासनाने इंधनावर प्रति लिटर तीन रुपयांचा दुष्काळ उपकर लावून मागील आर्थिक वर्षामध्ये केंद्र शासनाकडे दुष्काळ नाही असे गृहीत धरुन दुष्काळ निधी मागितला नसल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, त्याच न्यायाने दुष्काळ नसतानाही इंधनावर दुष्काळी उपकर वाढविण्याच्या शासनाच्या निर्णयावर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, यामुळे इंधनावर लावलेला उपकर रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) पेट्रोलच्या उत्पादनावर केंद्र शासनामार्फत उत्पादन शुल्क (Excise Duty) आकारणी होते तर पेट्रोलच्या विक्रीवर सद्यस्थितीत मुंबई, ठाणे, नवी मुंबई, औरंगाबाद, नागपूर, नंदुरबार, सोलापूर व अमरावती शहरामध्ये २६% + रुपये ११ प्रति लिटर व महाराष्ट्रातील इतर ठिकाणी २५% + रुपये ११ प्रति लिटर या दराने कराची आकारणी करण्यात येते. आयात केलेल्या कच्च्या तेलावर (Crude Oil) तेल कंपनी भरणा केलेल्या जकातीची वसूली राज्यात होणाऱ्या पेट्रोलच्या विक्रीतून करते या कारणास्तव महाराष्ट्रात पेट्रोलच्या किंमती इतर राज्यापेक्षा अधिक आहेत.
(२) हे खरे नाही. कच्च्या तेलाचे कमी झालेल्या दरामुळे पेट्रोलच्या किंमतीत घट होऊन त्याचा परिणाम राज्याच्या महसूलावर झाला. त्यामुळे शासनाने पेट्रोलवर मूल्यवर्धित कराच्या दरामध्ये रुपये ३/- प्रति लिटर अशी वाढ दिनांक २२ एप्रिल, २०१७ रोजी केली.
(३) सन २०१६-१७ या आर्थिक वर्षामध्ये राज्यात पेट्रोलवरील करांच्या दरामध्ये रुपये ३/- प्रति लिटर वृद्धी करण्यात आली. सदर वाढ दुष्काळ उपकर या कारणामुळे करण्यात आलेली नाही. सन २०१६-१७ मध्ये केंद्र शासनाकडे दुष्काळ निधी मागितला नाही.
(४) नाही. कच्च्या तेलाचे कमी झालेल्या दरांमुळे पेट्रोलच्या किंमतीत घट झाली व त्यामुळे त्यावरील कर संकलनात घट होऊन, त्याचा परिणाम राज्याच्या महसुलावर झाला. त्यामुळे पेट्रोलवरील मूल्यवर्धित कराचा दर वाढविण्यात आला आहे. सदर वाढ दुष्काळ उपकर या कारणामुळे करण्यात आलेली नाही.

(५) इंधनावर महसूल निर्मितीकरता मूल्यवर्धित कराच्या दरात वृद्धी करण्यात आली असून, दुष्काळ उपकर या कारणामुळे नसल्याने करामध्ये करण्यात आलेली वाढ रद्द करण्यात आली नाही.
(६) लागू नाही.

-----------------

## राज्यात कुपोषण व बालमृत्यू रोखण्यासाठी कृती आराखडा तयार करण्याबाबत

**(२१) * ३११७७ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रकाश गजभिये, श्री.नागोराव गाणार, श्री.बाळाराम पाटील, श्री.जयंत पाटील, श्री.नारायण राणे, श्री.सतिश चव्हाण, श्री.जगन्नाथ शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक २३७२५ ला दिनांक ६ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या ग्रामीण भागातील विशेषत: आदिवासी बहुल भागांसह सुमारे १२५ तालुक्यांचा मानव विकास निर्देशांक कमी असताना सदर आदिवासी पाडयांवरील कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी विविध योजना राबविल्या जात असताना सन २०१५-१६ या वर्षी आदिवासी भागांमध्ये २७ हजार ४३२ तीव्र कमी वजनाची कुपोषित बालके आढळून आल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यातील १६ आदिवासी जिल्हयात सुमारे साडे अकरा हजार बालके कुपोषित असून सन २००४ ते २०१७ या १३ वर्षांच्या काळात ७० हजारांहून अधिक बालमृत्यूची नोंद करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गत ३ वर्षात नवसंजीवन योजनेंतर्गत ० ते १ वयोगटातील साडेसहा हजार बालकांचे मृत्यू झाले असून सदर १६ आदिवासी जिल्हयात दरवर्षी कुपोषणामुळे बालमृत्यू, गर्भवती माता मृत्यूचे प्रमाण वाढत असूनही आदिवासी भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रे दूरवस्थेत आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, महिला व बालविकास विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग आणि आदिवासी विकास विभाग यांना कुपोषण व बालमृत्यू रोखण्यासाठी एकत्रितपणे कृती आराखडा तयार करण्याबाबतचे आदेश मा.मुख्यमंत्री यांनी दिले असता, उक्त विभागांनी त्यानुसार कुपोषण व बालमृत्यू रोखण्यासाठी कृती आराखडा तयार करुन मा.मुख्यमंत्री यांना सादर केलेला नाही, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यातील कुपोषणाच्या गंभीर समस्येचे निवारण करण्यासाठी मा. उच्च न्यायालयाने कुपोषणग्रस्त भागांमध्ये काम करणाऱ्या डॉ.अभय बंग यांच्या उपाययोजनांचा कुपोषणमुक्त महाराष्ट्रासाठीच्या धोरणात समावेश करण्यात यावा असे आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन त्यानुषंगाने धोरणांचा आराखडा तयार करण्यासंदर्भात तसेच कुपोषण, गर्भवती माता मृत्यू व बालमृत्यूस आळा घालण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.
(२) व (३) नवसंजीवनी अंतर्गत जिल्हयाकडील सन २०१४-१५, २०१५-१६ व २०१६-१७ च्या प्राप्त अहवालानुसार ० ते १ वर्ष वयोगटातील बालमृत्यूची संख्या अनुक्रमे ३०२२, १९१२ व २०७० एवढी असून तीन वर्षाची एकूण संख्या ७००४ आहे. वरील बालमृत्यू हे कमी जन्म वजन, जन्मता श्‍वसनास अडचण, न्युमोनिया व जंतुसंसर्ग इ. कारणामुळे झाल्याचे दिसून येते. तसेच सन २०१४-१५, २०१५-१६ व २०१६-१७ च्या प्राप्त अहवालानुसार मातामृत्यूची संख्या अनुक्रमे २८५, २९६ व २८३ इतकी आहे.

आदिवासी भागातील प्राथमिक आरोग्य केंद्र दुरवस्थेत नसून या भागातील एकूण ३१५ प्राथमिक आरोग्य केंद्रापैकी २७४ केंद्रे स्वत:च्या इमारतीत असून ४५ प्रा.आ. केंद्रासाठी नवीन इमारत बांधकाम प्रस्तावित आहे.
(४) मा.मंत्री, सार्वजनिक आरोग्य यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय टास्क फोर्स स्थापन करण्याची घोषणा माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये करण्यात आली होती. त्यानंतर या समितीच्या ४ बैठका मंत्रालय, मुंबई येथे घेण्यात आल्या. या बैठकांमध्ये पालघर जिल्हयामध्ये कुपोषणामुळे होणारे बालमृत्यू कमी करण्यासाठी कृती आराखडा तयार करुन शासनास सादर करण्यात आला. पालघर कृती आराखड्यानुसार जिल्हाधिकारी, पालघर यांना उपाययोजना राबविण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. पालघर कृती आराखडा राबविण्याच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर येथे मा.मंत्री सार्वजनिक आरोग्य यांच्या उपस्थितीमध्ये दिनांक ११/०५/२०१७ रोजी जिल्हयातील सर्व विभाग प्रमुखांची बैठक घेण्यात आली. या बैठकीत सर्व विभागांनी करावयाच्या उपाययोजनांची अंमलबजावणी करण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या असून या अनुषंगाने जिल्हयामध्ये अंमलबजावणी करण्यात येत आहे.

(५) हे खरे आहे.

आरोग्य विभागामार्फत सर्वसमावेशक पोषण धोरणाचा मसुदा तयार करण्यात येऊन शासनास सादर करण्यात आला आहे.

(६) सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या उपाययोजना पुढील प्रमाणे :- माता मृत्यू टाळण्यासाठी गरोदरपणा मध्ये कमीत कमी ४ तपासण्या, लसीकरण, रक्तदाब/ हिमोग्लोबीन/ लघवीची तपासणी करुन वजन वाढीवर नियमित देखरेख, जननी सुरक्षा योजना मानविकास अंतर्गत बुडीत मजुरी, मातृत्व अनुदान व औषधोपचार तसेच जननी सुरक्षा योजना जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमांतर्गत मोफत सेवा (संदर्भ, आहार, औषधोपचार, तपासण्या व रक्तपुरवठा) प्रधानमंत्री मातृत्व सुरक्षा अभियांनातर्गत दर महिन्याच्या ९ तारखेला सर्व गरोदर मातांची व अतिजोखमीच्या मातांची तपासणी करुन औषधोपचार व आवश्यकेनुसार संदर्भ सेवा, नवसंजीवनी योजनेंतर्गत मातृत्व अनुदान योजना या योजना राबविण्यात येतात.

तसेच बालमृत्यू टाळण्यासाठी आजारी सॅम बालकांना बालउपचार केंद्र व पोषण पुनर्वसन केंद्रामध्ये भरती करुन पोषण व उपचार, द्विवार्षिक जीवनसत्व अ व जंतनाशक मोहिम, या कार्यक्रमाद्वारे स्तनपानास प्रोत्साहन, नीपी कार्यक्रमाद्वारे सर्व वयोगटांना लोहयुक्त गोळ्या व जंतनाशक गोळ्या, पालघर जिल्ह्यामध्ये कुपोषणाने होणारे बालमृत्यू टाळण्यासाठी विशेष कृती दलाची स्थापना, नवजात बालकांच्या तपासणी व उपचाराकरीता विशेष नवजात काळजी कक्ष, नवजात स्थिरीकरण कक्ष व नवजात काळजी कोपरा, एचबीएनसी अंतर्गत गृहभेटीद्वारे आजार ओळखून उपचार व संदर्भ सेप्सीस/ अतिसार/ न्युमोनिया व इतर आजाराचे व्यवस्थापन इत्यादी.

----------------

**राज्य बालहक्क संरक्षण आयोगाच्या अध्यक्ष पदावर**
**बेकायदेशीर नियुक्ती केल्याबाबत**

**(२२) * ३३४८१ ॲड.अनिल परब, श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अमरनाथ राजूरकर : तारांकित प्रश्न क्रमांक २१८६० ला दिनांक १ ऑगस्ट, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या महिला व बालकल्याण विभागाने राज्य बालहक्क संरक्षण आयोगाचे अध्यक्ष व सदस्य नेमण्यासाठी दिनांक २१ जुलै, २०१६ रोजी वा त्यासुमारास इच्छुकांकडून नामांकने मागविण्याची जाहिरात दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जाहिरातीत अध्यक्ष वा सदस्यांविरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा असू नये तसेच कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंधित असू नये अशीही अट घातली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वरील जाहिरातीमधील दोन्ही अटींकडे दुर्लक्ष करुन राज्य बालहक्क संरक्षण आयोगाच्या अध्यक्ष पदावर नियम व अटींना डावलून गुन्ह्यांची नोंद असलेल्या व्यक्तीची बेकायदेशीररित्या नेमणूक करण्यात आल्याची बाब माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू आयोगावर नियुक्त केलेल्या अध्यक्षांवर बीडच्या शिवाजीनगर पोलीस ठाण्यात भादंवि कलम ४७, १४३, ३५३ आणि ३३२ अन्वये गुन्हे असून सदरहू अध्यक्ष एका राजकीय पक्षाशी संबंधित आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.

(२) सदर जाहिरातीमध्ये अध्यक्ष व सदस्य कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंधीत असू नये, अशी अट घालण्यात आलेली नाही. तसेच कोणताही फौजदारी गुन्हा नसावा, अशी अट होती. तथापि महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग

नियम २०१० नुसार मानवी हक्क व बाल हक्काचे उल्लंघन केल्याचा कोणताही पूर्वेतिहास नसलेली कोणतीही व्यक्ती अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून नियुक्ती करण्यास पात्र असेल असे अपेक्षित आहे.

(३) महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगावरील अध्यक्ष व सदस्य यांची शिफारस शासनास करण्याकरिता त्रिसदस्यीय निवड समिती शासन निर्णय दिनांक २० जुलै, २०१६ अन्वये गठित करण्यात आली होती, सदर निवड समितीने विभागामार्फत शासनस्तरावर प्राप्त अध्यक्ष व सदस्य यांच्या अर्जाच्या पात्र-अपात्रतेची शहानिशा करुन, अधिनियमातील तरतुदीनुसार, आयोगाच्या अध्यक्ष व सदस्यपदी नियुक्ती केली आहे.

(४), (५) व (६) महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्त करण्यात आलेल्या अध्यक्षांवर बीड जिल्हयामध्ये दिनांक ०६/०४/२०१४ रोजी पोलीस ठाणे शिवाजीनगर येथे गु.र.नं.६१/२०१४ कलम १४३, १४७, १४९, ३५३, ३३२ भा.दं.वि सह कलम ७ क्रि.ला. अ.का. १३५ मु.पो.का. प्रमाणे गुन्हयाची नोंद असून, सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ट आहे.

-----------------

**मराठवाडा विभागातील शेतकऱ्यांना लघु व मध्यम सिंचन प्रकल्पांतर्गत संपादित जमिनींचा मावेजा देणेबाबत**

**(२३) * ३२१६६ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक २८१६६ ला दिनांक १६ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडा विभागात सिंचन विभागाकडून लघु व मध्यम २८६ सिंचन प्रकल्पासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करुन प्रकल्पाची कामे पूर्ण केली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांना संपादित जमिनीचा मावेजा रुपये १२५० कोटी असून अद्याप तो दिला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मराठवाडयातील शेतकरी आर्थिक अडचणीत आहे शिवाय काही प्रकरणात मा.न्यायालयाने आदेश देऊनही शेतकऱ्यांना मावेजा दिला नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर शेतकऱ्यांच्या मावेजा देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे.
(२) नाही.

दिनांक ०४/१०/२०१६ रोजी औरंगाबाद येथे झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत ठेवलेल्या विषयानुसार रूपये १२५४.०० कोटीच्या मागण्या महामंडळाच्या विविधस्तरावर प्रलंबित आहेत. तरतुद उपलब्ध नसलेल्या प्रकल्पासाठी भुसंपादन व न्यायालयीन प्रकरणे ठोक तरतुद मराठवाडा अंतर्गत अनुक्रमे सन २०१६-१७ या वर्षातील रूपये ७८.३३०७ कोटी तसेच विशेष बाब म्हणून प्राप्त निधी रूपये २५.३४४९ कोटी व तरतुद उपलब्ध असलेल्या प्रकल्पांच्या भुसंपादनासाठी रुपये ३०२.४९८० कोटी निधी वितरीत करण्यात आला आहे.

सन २०१७-१८ या आर्थिक वर्षातील भुसंपादन व न्यायालयीन प्रकरणे ठोक तरतुद मराठवाडा अंतर्गत रूपये ३२५.२७०० कोटी व भुसंपादनासाठी पुनर्वितरणाव्दारे मराठवाड्यासाठी एकूण रूपये ८७.६०४३ कोटी असा एकूण रूपये ४१२.८७४३ कोटी निधी वितरीत करण्यात आलेला आहे व तरतुद उपलब्ध असलेल्या प्रकल्पांच्या भुसंपादनासाठी रूपये २२९.०१ कोटी निधी वितरीत करण्यात आला आहे.

सन २०१६-१७ व २०१७-१८ करिता एकूण रूपये १०४८.०५७९ कोटी भुसंपादनासाठी वितरीत केलेला आहे. तथापि, मराठवाडा अंतर्गत तरतूद असलेल्या प्रकल्पांचे तसेच तरतूद नसलेल्या प्रकल्पांसाठी एकूण रुपये ५६३.६४ कोटीचे दायित्व प्रलंबित आहे.

(३) अंशत: खरे आहे.
(४) न्यायालयाच्या निर्णयानुसार प्राप्त निधीच्या उपलब्धतेनूसार प्रलंबित मावेजा अदा करण्याची योग्य कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील वैद्यकिय व दंत वैद्यकिय अभ्यासक्रमाच्या खाजगी तसेच अभिमत संस्थामधील जागा विद्यार्थ्यांना राखून ठेवण्याबाबत

**(२४) * ३३२६४ श्री.तानाजी सावंत :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वैद्यकिय व दंत वैद्यकिय अभ्यासक्रमाच्या खाजगी तसेच अभिमत संस्थामधील ८५ टक्के जागा शासकीय, पालिका महाविद्यालयाप्रमाणे विद्यार्थ्यांकरीता राखीव ठेवण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, अभिमत विद्यापिठांना मागासवर्गीय प्रवर्गासाठीचे आरक्षणही येत्या शैक्षणिक वर्षापासून लागू करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बाब क्र.१ व २ बाबत न्यायालयीन प्रक्रिया होऊ नये म्हणून शासकीय अध्यादेशात किंवा कायद्यात योग्य ती दुरुस्ती करण्यात येणार होती, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय, हे अंशत: खरे आहे. सन २०१७-१८ वर्षाकरिता अभिमत विद्यापीठ वगळून राज्यातील शासकीय, महानगरपालिका तसेच खाजगी विनाअनुदानित वैद्यकीय व दंत महाविद्यालयातील पदवीपूर्व अभ्यासक्रमासाठी ८५ टक्के जागा राज्यातील विद्यार्थ्यांसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत.

(२) नाही, हे खरे नाही. सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षामधील अभिमत विद्यापीठांच्या वैद्यकीय व दंत महाविद्यालयातील पदवीपूर्व अभ्यासक्रमाचे प्रवेश केंद्र शासनाच्या मेडिकल कॉन्सिलिंग कमिटीमार्फत करण्यात येत आहेत. त्यासाठी कोणत्याही मागासप्रवर्गाचे आरक्षण ठेवण्यात आलेले नाही.

(३) व (४) अभिमत विद्यापीठांतील प्रवेश राज्य शासनाच्या अखत्यारित आणण्यासाठी कायद्यात दुरुस्ती प्रस्तावित करण्यात आली होती. तथापि, मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार सन २०१७-१८ चे अभिमत विद्यापीठाचे प्रवेश हे अखिल भारतीय स्तरावर केंद्र शासनामार्फत करण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## येवला व निफाड तालुक्यांचा (जि.नाशिक) राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्न्ती अभियानाच्या इंटेन्सिव्ह तालुक्यात समावेश करण्याबाबत

**(२५) * ३०९४३ श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला व निफाड तालुक्यांमध्ये (जि.नाशिक) दारिद्रयरेषेखालील महिलांना बचत गटाच्या माध्यमातून स्वावलंबी करण्यासाठी या तालुक्यांचा राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्न्ती अभियानाच्या इंटेन्सिव्ह तालुक्यात समावेश करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १२ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानामध्ये सध्या एकूण १३४ तालुक्यांमध्ये इंटेन्सिव्ह कार्यपध्दतीने तर उर्वरित तालुक्यांमध्ये नॉन इंटेन्सिव्ह व सेमी इंटेन्सिव्ह कार्यपध्दतीने अंमलबजावणी सुरु आहे. येवला व निफाड या तालुक्यांमध्ये नॉन इंटेन्सिव्ह तसेच सेमी इंटेन्सिव्ह पध्दतीने अंमलबजावणी करण्यात येत असून या माध्यमातून गरीब महिलांचे स्वयं सहाय्यता गट बनवून त्यांचा आर्थिक विकास करण्याचे कार्य करण्यात येत आहे.

इंटेन्सिव्ह कार्यपध्दतीमध्ये सन २०११ च्या मानव विकास निर्देशांकानुसार (HDI) राज्यातील मागासलेल्या १४ जिल्हयांचा समावेश केंद्र शासनाच्या मंजूरीने करण्यात आलेला आहे. सन २०१७-१८ चा वार्षिक कृती आराखडा अर्थसंकल्प २०१७ मध्ये केंद्र शासनाकडून मंजूर करण्यात आलेला आहे.

-----------------

## अमरावती येथील डॉ.पंजाबराव देशमुख वैद्यकिय रुग्णालयात नवजात बालकांचा मृत्यू झाल्याबाबत

**(२६) * ३२८५५ श्री.रविंद्र फाटक, ॲड.अनिल परब, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती येथील डॉ.पंजाबराव देशमुख वैद्यकीय रुग्णालयात (पीडीएमसी) या खासगी रुग्णालयातील ४ नवजात बालकांचा संशयास्पद मृत्यू झाल्याचे व एका परिचारिकेने चुकीचे इंजेक्शन दिल्याने ३ शिशुंचा मृत्यू झाल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी समिती नेमली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त चौकशी समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय, त्यानुसार शासनाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय, हे खरे आहे.

अमरावती येथील डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय रुग्णालयात (पीडीएमसी) या खाजगी रुग्णालयातील ४ नवजात बालकांचा मृत्यू झाला आहे.

(२) होय, हे खरे आहे.

या प्रकरणी शासनाने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अकोला येथील तज्ञ डॉक्टरांची चौकशी समिती गठीत केली आहे.

(३) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अकोला येथील तज्ञ डॉक्टरांच्या समितीने सादर केलेल्या लेखी अहवालात पुढील निष्कर्ष नमूद केले आहेत :-

१. ४ नवजात शिशुंचा मृत्यू हा Injection Kesol (Potassium Chloride) २cc IV याद्वारे झाला असू शकतो.
२. नवजात शिशुच्या अतिदक्षता विभागात जंतु संसर्ग मुक्त वातावरण ठेवणेबाबत निष्काळजीपणा संबंधित शिशु विभागाचे अधिकारी यांनी केल्याचे दिसून येते.

३. सदर महाविद्यालय हे संपूर्ण अमरावती जिल्हयाकरिता आरोग्य दृष्टीने प्राथमिक काळजीचे केंद्र आहे. त्यामध्ये बालमृत्यूचे प्रमाण अधिक असलेला मेळघाट भाग सुध्दा समाविष्ट होतो. त्यामुळे नवजात शिशु अतिदक्षता विभागातील सोयीमध्ये व देखरेखीमध्ये कोणतीही कमतरता राहु नये असे अपेक्षित आहे.

त्यामुळे सदर समितीने संबंधित विभागाचे वैद्यकीय अधिकारी (डॉ.आर.एच.निस्ताने व डॉ. भुषण कट्टा) आणि स्टाफ नर्स (श्रीमती विद्या थोरात व श्रीमती प्रिती जामनीक) यांच्याविरुध्द योग्य कारवाई करण्याचे सुचविले आहे.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अकोला, जिल्हा शल्यचिकित्सक अमरावती व डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयाचे डीन यांनी दिलेल्या अहवालावरुन गुन्हयात आरोपी १) डॉ. भुषण ब्रिजमोहन कट्टा निवासी वैद्यकीय अधिकारी, २) सौ.विद्या भानुदास थोरात, स्टाफ नर्स यांना दिनांक ३०/५/२०१७ रोजी अटक करण्यात आली आहे, ३) कु. प्रिती रविन्द्र जामनीक, स्टाफ नर्स हिस दिनांक ११/०६/२०१७ रोजी अटक करण्यात आली. अधिक तपास सुरु आहे.

तसेच, उपरोक्त अहवालाच्या आधारावर डॉ. निस्ताने बालरोग विभाग प्रमुख (पेडीआट्रिक्स), व डॉ. कट्टा, निवासी वैद्यकीय अधिकारी, यांच्यावर कार्यवाही करण्याबाबत प्रबंधक, महाराष्ट्र वैद्यकीय परिषद व श्रीमती विद्या थोराव व श्रीमती प्रिती जामनीक स्टाफ नर्स यांच्यावर कार्यवाही करण्याबाबत महाराष्ट्र परिचर्या परिषद यांना कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील जिल्हा परिषद शिक्षकांच्या बदल्यांसाठी**
**सर्व समावेशक आणि स्वतंत्र धोरण आखल्याबाबत**

**(२७) * ३३१२० श्री.नागोराव गाणार, श्री.विक्रम काळे, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा परिषद शिक्षकांच्या बदल्यांचा गोंधळ टाळण्यासाठी अवघड व सर्वसाधारण क्षेत्र या दोन प्रकारात बदल्यांचे नियोजन करण्याचा नवा अध्यादेश शासनाने काढलेला असून, ग्रामविकास विभागाने याबाबत सर्व समावेशक आणि स्वतंत्र धोरण आखल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त धोरणातील अवघड व सर्वसाधारण या भागाचे निकष काय आहेत, तसेच प्रत्येक जिल्ह्यातील मुख्य कार्यकारी अधिकारी अवघड व सर्वसाधारण क्षेत्रच अद्याप निश्चित करु शकले नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात नवीन शिक्षक बदली धोरणात जाचक अटी असल्याने शिक्षकांनी आंदोलन करण्याचा निर्णय घेतला असल्याचे व सातारा जिल्हयात सर्वात कमी दुर्गम शाळा माणमध्ये निवडल्याने तालुक्यावर अन्याय झाला असून बदली धोरणाविरोधात येथील शिक्षकांनी मोर्चा काढल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जिल्हा परिषद शिक्षकांच्या बदली धोरणातील जाचक अटीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.
(२) सर्वसाधारणपणे जे क्षेत्र तालुका मुख्यालयापासून दूर आहे, दळणवळणाच्या दृष्टीने त्या शाळेत अथवा गावात पोहोचण्यास सोईसुविधा नाहीत, दुर्गम व डोंगराळ भागातील गावे तसेच काम करण्यास प्रतिकूल परिस्थिती असलेली गावे ही अवघड क्षेत्रे म्हणून निश्चित करण्यात येणार असून अवघड क्षेत्रात न मोडणारी गावे ही सर्वसाधारण क्षेत्रात समाविष्ट होणार आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तालुक्यातील सर्वसाधारण तसेच भौगोलिक परिस्थितीचा विचार करून निर्णय घ्यावयाचा आहे.

प्रत्येक जिल्ह्यातील मुख्य कार्यकारी अधिकारी अद्याप अवघड व सर्वसाधारण क्षेत्र निश्चित करू शकले नाहीत ही बाब खरी नाही.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नागपूर येथील गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणी संग्रहालयातील विकास कामांबाबत**

**(२८) * ३२९०४ श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथील गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणी संग्रहालयातील विकास कामांना शासनाने रुपये २५ कोटी मंजूर केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संग्रहालयास आणखी रुपये १०० कोटी वाढीव निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, या निधीतून प्राणी संग्रहालयातील कोणकोणत्या कामांवर निधी खर्च करण्यात येणार आहे,
(४) असल्यास, आतापर्यंत विकास कामांवर किती खर्च करण्यात आला आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१), (२) व (३) सन २०१७-१८ राज्य योजनांतर्गत गोरेवाडा प्राणी संग्रहालयाच्या प्राथमिक कामांकरीता मंजूर व अर्थसंकल्पित करण्यात आलेला रुपये २५००.०० लक्ष नियतव्यय दिनांक ३०/०५/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आला आहे. सदर वितरीत करण्यात आलेल्या निधीमधून खालील प्रमाणे कामे करण्यात येणार आहेत.
• वन्यप्राणी बचाव केंद्राचे परिरक्षण करणे.
• आफ्रिकन सफारीचे बांधकाम करणे.
• अधिवास विकासाची कामे करणे.
• संरक्षण कामे करणे.
• गोरेवाडा प्रकल्प ५६४.०० हेक्टर वनजमिनीचे वळतीकरणाचे नक्त नगद मूल्य (NPV) व पर्यायी वनीकरणाची कामे करणे.
(४) सन २०११-१२ ते सन २०१७-१८ जून अखेर गोरेवाडा प्रकल्पांतर्गत विकास कामांवर रुपये ५८१८.९५ लक्ष निधी खर्च करण्यात आला आहे.

-----------------

**दौलताबाद आरोग्य केंद्रांतर्गत (जि.औरंगाबाद) पंढरपूर येथे सुरु करण्यात आलेले आरोग्य उपकेंद्र सुरु करण्याबाबत**

**(२९) * ३२४०२ श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दौलताबाद आरोग्य केंद्रांतर्गत (जि.औरंगाबाद) पंढरपूर येथे सुरु करण्यात आलेले आरोग्य उपकेंद्रात डॉक्टर व कर्मचारी नसल्याने सदर केंद्र माहे मे, २०१७ पासून बंद आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आरोग्य उपकेंद्र बंद असल्याने उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर आरोग्य उपकेंद्र नियमित सुरु ठेवण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

उपकेंद्रांच्या ठिकाणी वैद्यकीय अधिकाऱ्यांचे पद मंजुर नसून दोन आरोग्य सेवक (महिला) व एक आरोग्य सेवक (पुरुष) नियमित कार्यरत आहेत.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नंदुरबार व धुळे जिल्हयातील तापी नदीवरील तापी बुराई व सुलवाडे-जामफळ किनोली या उपसा सिंचन योजनेच्या कामाबाबत

**(३०) * ३२९५३ श्री.चंद्रकांत रघुवंशी : तारांकित प्रश्न क्रमांक २९००३ ला दिनांक ९ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नंदुरबार व धुळे जिल्हयातील तापी नदीवरील सुलवाडे जामफळ उसिंयो-प्रकल्पास सन २०१६-१७ मध्ये रुपये १५.५० कोटी इतका निधी उपलब्ध करण्यात आला व प्रकाशा बुराई उपसा सिंचन योजनेच्या कामासाठी रुपये १.५ कोटी इतका निधी उपलब्ध केला असला तरी अद्याप या प्रकल्पाचे काम संथगतीने सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर प्रकल्प त्वरीत पूर्ण करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय,
(२) नंदुरबार व धुळे जिल्हयातील तापी नदीवरील सुलवाडे जामफळ कनोली उपसा सिंचन योजनेच्या सुधारित प्रकल्प अहवालास प्रशासकिय मान्यता देण्याबाबतची बाब शासनस्तरावर प्रगतीत आहे. सदर योजनेची संकल्पने मुल्यार्पित झाली आहेत. वन जमीन संपादनास अंतिम मान्यता प्राप्त झाली असून वन जमीन हस्तांतरीत करण्यासाठी आवश्यक निधी वर्ग करण्यात आला आहे. तसेच वन जमीन हस्तांतराची व भूसंपादनाची कार्यवाही प्रगतीत आहे.

प्रकाशा बुराई उपसा सिंचन योजनेचे काम प्रगतीत असून सदर प्रकल्पासाठी आवश्यक भूसंपादन सरळ खरेदीने सुरू करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कामण (ता.वसई, जि.पालघर) गावातील अंगणवाडीची दुरुस्ती करण्याबाबत**

**(३१) * ३२००२ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कामण (ता.वसई, जि.पालघर) गावातील कामण नंबर १ ची अंगणवाडी मोडकळीस आली असून अंगणवाडीतील बालकांच्या जीवितास धोका निर्माण झाल्याचे दिनांक १ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडे पाठपुरावा करुनही शासन याकडे दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अंगणवाडीची दूरवस्था दूर करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) ता.वसई, जि.पालघर येथील कामण १ ची अंगणवाडी केंद्र स्वतंत्र इमारत नसून ही अंगणवाडी ग्रामपंचायतच्या समाजमंदीराच्या इमारतीत भरत होती. १ मे २०१७ पुर्वी हे समाजमंदीर मोडकळीस येत असल्याचे लक्षात येताच तेथील अंगणवाडी केंद्र हे गावातील दत्तमंदीरमध्ये स्थलांतरीत करण्यात आले आहे. त्यामुळे बालकांच्या जिवितास कोणत्याही प्रकारचा धोका निर्माण झालेला नाही.

(२) सदरची अंगणवाडी स्थलांतरीत करण्यात आली आहे. त्यामुळे याबाबत दुर्लक्ष करण्यात आलेले नाही.

(३) व (४) कामण १ अंगणवाडी केंद्रातील मुलांना त्वरीत दत्तमंदीर मध्ये स्थलांतरीत केले आहे. तसेच कामण १ चे क्षेत्र महानगरपालिका हद्दीत येत असल्यामुळे महानगरपालिकेस दिनांक २४/०५/२०१७ व दिनांक २०/०६/२०१७ चे पत्रान्वये महानगरपालिका /नगरपरिषद/ नगरपंचायत कार्यक्षेत्रातील अंगणवाडी केंद्र दुरुस्ती/ नवीन बांधकाम त्यांचेस्तरावरुन करण्याबाबत जिल्हापरिषदेकडून कळविण्यात आलेले आहे.

-----------------

## राज्यात कुपोषण मुक्तीसाठी ईझी नट पेस्ट पाकीटाचे वाटप करण्याबाबत

**(३२) * ३०९१८ श्री.नारायण राणे, श्री.प्रविण दरेकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या आदिवासी भागातील तीव्र कुपोषित गटातील मुलांना कुपोषण मुक्त करण्यासाठी ईझी नट पेस्ट पाकीट देण्यात येणार असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ताज्या आहाराच्या तुलनेत ही पेस्ट आरोग्याला हानीकारक असून प्रत्यक्षात कुपोषित बालकांना याचा फायदा होणार नसल्याचा दावा जनआरोग्य अभियान व अन्न अधिकारी यांनी केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, पोषण हक्क गट व विविध सामाजिक संघटनांनी केलेल्या सर्वेक्षणात टी.एच.आर. सारखे आहार कुपोषण निर्मुलनात अयशस्वी ठरत असल्याचे निदर्शनास आल्याने ईझी नट पेस्ट पाकीट पुरवठा करण्याबाबतच्या योजनेचा फेरविचार करण्याचे पत्र लोकप्रतिनिधींनी माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पोषण हक्क गट या संस्थेने तसेच विविध अन्य संस्थांनी केलेल्या सर्वेक्षणात पाकीट बंद आहारापैकी फक्त ५% आहार खाल्ला जातो व उर्वरीत ९५% टी.एच.आर. हा एकतर फेकून दिला जातो किंवा जनावरांना खाऊ घातला जातो असा निष्कर्ष निघालेला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, तसेच हजारो कोटी खर्च करुन आहार खाला जात नसताना कार्यवाही न करणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली व महिला बचतगटांमार्फत कुपोषित मुलींना स्थानिक भागांतून मिळणाऱ्या भाज्या व धान्यापासून तयार केलेला ताजा आहार देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

कुपोषित बालकांना द्यावयाचा आहार हा ईजी नट पेस्ट नसून Energy Dense Nutritious Food (EDNF) आहार आहे.

(२) नाही.

बालरोग तज्ञ, आहार तज्ञ व युनिसेफचे प्रतिनिधी यांनी राज्यातील कुपोषित बालकांना Energy Dense Nutritious Food (EDNF) देणेबाबत शिफारशी विचारात घेऊन विभागाने EDNF ही पेस्ट देण्याचा निर्णय घेतलेला आहे.

(३) Energy Dense Nutritious Food (EDNF) पाकीट पुरवठा करण्याबाबतच्या योजनेचा फेरविचार करण्याचे कोणत्याही लोकप्रतिनिधीचे पत्र प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(४) नाही. असा कुठलाही निष्कर्ष विभागाकडे प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अत्याचार पिडितांच्या मुलांसाठी कल्याणकारी योजना किंवा विशेष धोरण राबविण्याबाबत

**(३३) * ३२५९१ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.जनार्दन चांदूरकर :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अत्याचार पिडितांच्या पोटी जन्माला आलेल्या अपत्याच्या संगोपनासाठी कल्याणकारी योजना किंवा विशेष धोरण आखण्याचे शासनाला मा.उच्च न्यायालयाने आदेश दिल्याचे दिनांक २१ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याची दखल घेऊन अत्याचार पिडितांच्या पोटी जन्माला आलेल्या मुलांसाठी शासनाने कल्याणकारी योजना किंवा विशेष धोरण राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही,

(२) अत्याचार पीडितेच्या पोटी जन्माला आलेल्या अपत्याच्या संगोपनासाठी महिला व बाल विकास विभागामार्फत खालीलप्रमाणे योजना राबविण्यात येत आहेत.

- अत्याचार पीडित महिलेस बालकास जन्म द्यावयाचा असल्यास तिला अल्प मुदतीचे निवासगृहामध्ये/राज्यगृह येथे बालक वयाच्या १० वर्षापर्यंत त्याच्या आई सोबत राहू शकते.

- अत्याचार पीडितेच्यापोटी जन्माला येणाऱ्या बालकास सदर महिलेस सांभाळायचे नसल्यास बालकल्याण समितीच्या आदेशान्वये बाल न्याय मुलांची काळजी व संरक्षण अधिनियमान्वये विहित प्रक्रिया पूर्ण करुन सदर बालक अभ्यर्पित/परित्यागीत (surrender of children) करुन शकते.
- बालकल्याण समिती सदर बालकाच्या कल्याणाकरीता व पुनर्वसनाकरीता बाल न्याय मुलांची काळजी व संरक्षण अधिनियमान्वये विहित प्रक्रिया पूर्ण करुन सदर बालक दत्तकासाठी मुक्त करुन शकते.
- अत्याचार पीडित महिलेस अपत्याचा त्याग न करता सांभाळायचे असल्यास बालकल्याण समितीमार्फत सदर बालकास बालगृहामध्ये प्रवेश देण्यात येतो.
- अत्याचार पीडित महिला अपत्यास बालगृहामध्ये दाखल करावयाचे नसल्यास त्या बालकास बालसंगोपन योजनेचा लाभ देण्यात येतो.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**शंकरगाव (पुळूज) (ता.पंढरपूर) येथील बंधाऱ्यातून पाणीगळती झाल्याबाबत**

**(३४) * ३३७५० श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे : तारांकित प्रश्न क्रमांक २९६६० ला दिनांक ३० मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे शंकरगाव (पुळूज) (ता.पंढरपूर) येथे पाणी अडविण्यासाठी भीमा नदीवर कोल्हापूर पद्धतीचा बंधारा बांधण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे चळे, आंबे, मुंढेवाडी, सुस्ते, पोहरगाव, विटे, तारापूर, खरसोळी या गावातील हजारो हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आणण्यास मदत झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर बंधाऱ्यातून मोठ्या प्रमाणात पाण्याची गळती झाल्यामुळे स्थानिक नागरिकाकडून संबंधित अधिकाऱ्यासोबत लेखी व तोंडी चर्चा निवेदने दिली आहेत, हे खरे आहे काय,
(४) सदर बंधाऱ्याच्या दुरुस्तीसाठी शासनाने ठेकेदाराची नेमणूक केली आहे, हे खरे आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) होय.

(३) अंशतः खरे आहे.

कोल्हापुरी पध्दतीच्या बंधाऱ्यातून पाणी गळती झाल्यामुळे स्थानिक नागरिकाकडून संबंधित कार्यकारी अभियंता यांच्यासोबत दिनांक १९/०५/२०१७ रोजीच्या क्षेत्रिय भेटीच्या वेळी तोंडी चर्चा झालेली आहे.

(४) सन २०१६-१७ मध्ये को.प. बंधारा दुरूस्तीचे काम, पाणी अडविणे, बर्गे बसविणे व काढणे या कामासाठी ठेकेदाराची नेमणूक केलेली आहे. या को.प.बंधाऱ्याची आवश्यक ती दुरूस्ती तसेच पाणी अडविणे व पाण्याची गळती थांबविणे ही कामे संबंधित ठेकेदाराकडून करून घेण्यात आलेली आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**भंडारा जिल्हयात पाणी अडवा पाणी जिरवा या संकल्पनेतून वनराई बंधारे, सिमेंट बंधारे, शेततळीची कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत**

**(३५) * ३१०९८ प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्हयात शासनाने सिंचनाची सोय उपलब्ध होण्याकरीता पाणी अडवा पाणी जिरवा या संकल्पनेतून केलेली वनराई बंधारे, सिमेंट बंधारे, शेततळी इत्यादी कामे निकृष्ट दर्जाची होत असल्याचे दिनांक १५ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निकृष्ट बांधकामाची शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील परिचरांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(३६) * ३१०१२ श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया** : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात ४५ वार्डाकरीता केवळ १०० परिचर काम करीत असल्याने रुग्णांच्या नातेवाईकांना स्ट्रेचर, ऑक्सिजन सिलिंडर ओढण्याची वेळ येत असल्याचे दिनांक २५ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच नागपूर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय (मेडीकल) व इंदिरा गांधी महाविद्यालय व रूग्णालय (मेयो) येथील चतुर्थ श्रेणी कर्मचारी, सफाई कामगार, स्वयपांकी, धोबी, शिपाई, कक्षसेवक यांची ३५० पदे रिक्त असून फक्त १०० परिचर कार्यरत असल्यामुळे रूग्णाची गैरसोय व रूग्णालयात अस्वच्छता निर्माण झाल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, सदर महाविद्यालय व रुग्णालयात परिचरची ३७२ पदे रिक्त असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, परिचर व सफाई कर्मचाऱ्यांची जाहिरात काढून उक्त पदे भरण्याचा निर्णय घेण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, यासंदर्भात वारंवार मेडिकल प्रशासनाने शासनाकडे प्रस्ताव पाठवूनही दुर्लक्ष होत आहे, याबाबत शासनाने चौकशी करुन रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथे चतुर्थश्रेणीतील कक्ष परिचर संवर्गातील मंजूर २२१ पदांपैकी १६५ पदे भरलेली असून रिक्त असलेल्या ५६ पदांपैकी ४९ पदांवर बाहयस्त्रोतामार्फत कंत्राटी कर्मचारी सेवा घेण्यात आली आहे.

(२) चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांची पदे काही प्रमाणात रिक्त असली तरी ही पदे बाहयस्त्रोतामार्फत कंत्राटी पध्दतीने भरण्यास परवानगी देऊन रुग्णांची सोय व स्वच्छता यावर परिणाम होणार नाही याची दक्षता घेण्यात आली आहे.

(३) हे खरे नाही.
(४) चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांची पदे निविदा प्रक्रियाद्वारे बाहयस्त्रोतामार्फत भरण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वर्सोवा खाडीवर नवीन पुलाच्या बांधकामास वन विभागाने ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत

**(३७) * ३१३९७ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.जयवंतराव जाधव, श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्सोवा खाडीवरील मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील जुना पुल कमकुवत झाल्यामुळे मागणीनुसार नवीन पुलाच्या बांधकामासाठी निविदा प्रक्रिया पूर्ण होऊनही वन विभागाने ना हरकत प्रमाणपत्र मागील १ वर्षापासुन दिले नसल्याने नवीन पुलाचे बांधकाम सुरु झाले नसल्याचे दिनांक १ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निर्दशनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वन विभागाने ना हरकत प्रमाणपत्र देण्यास विलंब केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ना हरकत प्रमाणपत्र विनाविलंब देऊन सदर पुलाचे बांधकाम सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१), (२) व (३) प्रकल्प यंत्रणा, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाने सर्वप्रथम दिनांक १६/०७/२०१६ रोजी वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत नवीन वर्सोवा पुलाचे बांधकामाकरीता ०.०५२३ हेक्टर कांदळवन क्षेत्र वळतेकरणाचा प्रस्ताव ऑनलाईन प्रणालीवर सादर केला होता. सदर प्रस्तावानुषंगाने प्रकल्प यंत्रणा व वन विभागाच्या क्षेत्रीय अधिका-यांसमवेत झालेल्या संयुक्त पाहणी नंतर प्रकल्प यंत्रणेने दिनांक ०९/०५/२०१७ रोजी ०.५५२५ हेक्टर वनक्षेत्र वळतीकरणाचा सुधारीत प्रस्ताव वन विभागाकडे सादर केला आहे.

सदर प्रकरणी आवश्यक त्रुटींची पूर्तता करून अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी दिनांक १७/०७/२०१७ रोजीच्या पत्रान्वये प्रस्ताव केंद्र शासनाच्या मान्यतेसाठी सादर केला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**किल्लेधारूर वनक्षेत्रातील वन्यप्राण्यांसाठी उन्हाळयात पाण्याची सोय करण्याबाबत**

**(३८) * ३३२४० श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) किल्लेधारूर (जि.बीड) वनक्षेत्रातील वन्यप्राण्यांसाठी भर उन्हाळयात पिण्याच्या पाण्यासाठी सोय करण्यात आली नसल्याचे माहे मार्च, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माहे मार्च ते मे, २०१७ या कालावधीत सदर वनक्षेत्रातील सर्व पाणवठे कोरडे पडल्याने वनक्षेत्रातील वन्य प्राणी पाण्यासाठी भटकंती करताना विहीरीत पडल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वनक्षेत्रातील वन्यप्राण्यांसाठी पाण्याची सोय करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) हे खरे नाही.

तथापि धारुर वनक्षेत्रात वन्यप्राण्यांना माहे मार्च, २०१७ मध्ये पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे याकरीता नैसर्गिक पाणीसाठा उपलब्ध नसलेल्या ८ ठिकाणच्या पाणवठ्यांमध्ये दर २ दिवसाला पाणी टाकून पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## धुळे जिल्हयात वैद्यकीय अधिकारी यांच्या बदल्या नियमबाहय पध्दतीने केल्याबाबत

**(३९) * ३०८८३ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्हयात सन २०१७ मध्ये जिल्हास्तरावर करण्यात आलेल्या गट-अ व गट-ब मधील वैद्यकीय अधिका-यांच्या बदल्या नियमबाहय पध्दतीने करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बहुतांश वैद्यकीय अधिकाऱ्यांना बदली हवी असल्यास विनंती अर्ज देण्याबाबत कोणतीही सूचना देण्यात आली नव्हती, तसेच बदल्यांचे आदेश अत्यंत घाईमध्ये काढण्यात आलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बदल्या करताना शासनाच्या दिनांक २० एप्रिल, २०१७ च्या परिपत्रकाचे उल्लंघन करुन बदल्यांबाबतच्या सामान्य तत्वाचे पालन करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र.बदली-१३१४/प्र.क्र.५१९/सेवा-२, दिनांक ३०/११/२०१६ अन्वये वैद्यकीय अधिकारी गट-अ (ग्रेड पे रु.५४००) तसेच रुग्णसेवा कर्मचारी ( गट-ब ते ड) यांचे जिल्हा अंतर्गत बदल्यांचे अधिकार संबंधीत जिल्हयाच्या जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील गठीत समितीस देण्यात आले आहेत.

जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद धुळे यांनी संबंधीत वैद्यकीय अधिकारी व तालुका आरोग्य अधिकारी यांना बदलीच्या अनुषंगाने ई-मेलद्वारे अर्ज करण्याच्या सूचना त्यांच्या दिनांक २७/०४/२०१७ च्या पत्रान्वये दिलेल्या आहेत.

दिनांक २०/०४/२०१७ रोजीचे परिपत्रक नसून ते शासन पत्र आहे. सदर दिनांक २०/०४/२०१७ च्या शासन पत्रात नमूद निकषांनुसार जिल्हाधिकारी, धुळे यांनी त्यांच्या दिनांक २९/०४/२०१७ च्या आदेशान्वये बदल्या केलेल्या आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील जलयुक्त शिवार प्रकल्प योजनाबध्द आणि शास्त्रीय पध्दतीने राबविण्याची शहानिशा करण्यासाठी समिती नेमल्याबाबत

**(४०) * ३१४१९ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या जलयुक्त शिवार योजनेमध्ये मोठया प्रमाणात यंत्र व तंत्राचा वापर करुन प्रत्यक्षात जलसिंचन कमी होऊन फक्त या प्रकल्पासाठी मोठया रक्कमेचा निधी खर्च होत असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील गतवर्षातील दुष्काळ व अवर्षणग्रस्त परिस्थिती निर्मुलनासाठी शासनाने जलयुक्त शिवार प्रकल्प शास्त्रशुध्द, एकात्मिकपणे लोकसहभाग, लोकविज्ञानाच्या सामाजिक, पर्यावरणीय तत्वावर आधारित योजनाबध्द आणि शास्त्रीय पध्दतीने राबविण्यात येत आहे की नाही याची शहानिशा करण्यासाठी माजी प्रशासकीय अधिकारी जॉनी जॉसेफ यांच्या अध्यक्षतेखाली ११ सदस्यांची समिती नेमली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर समितीचे काम सुरु झाले आहे काय, तसेच सदर समितीला याबाबतचा अहवाल सादर करण्यासाठी किती महिन्याचा कालावधी देण्यात आला आहे वा त्यानुषंगाने कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) हे अंशत : खरे आहे.

मा.उच्च न्यायालयात दाखल झालेल्या जनहित याचिका क्र.१५४/२०१५ वर मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यासाठी श्री.जॉनी जोसेफ, माजी प्रशासकिय अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली ०९ सदस्यीय समिती नेमण्यात आली आहे.

(३) होय.

सदर समितीस अहवाल सादर करण्यास ०२ महिन्यांचा कालावधी देण्यात आला असून समितीची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

**फलोद्‌यान योजना यशस्वी करण्यासाठी पांगरे (ता.राजापूर, जि.रत्नागरी) येथील धरणाला रिंगरोड करण्याबाबत**

**(४१) * ३२४४८ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रोजगार हमी योजनेंतर्गत फलोद्‌यान योजना यशस्वी करण्यासाठी पांगरे (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथे असलेल्या धरणाला रिंगरोड नसल्याने पलिकडे जाता येत नसल्याने धरणग्रस्त शेतक-यांनी प्रथम धरणाला रिंगरोड करण्याची मागणी राजापूर तहसिलदारांकडे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी तहसिलदार यांनी संबंधित अधिका-यांशी चर्चा करुन समस्या मार्गी लावल्या जातील असे आश्वासन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन धरणाला रिंगरोड करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**बार्शी, एकरुख, दहीगाव (जि.सोलापूर) या अवर्षणप्रवण भागातील उपसा सिंचन योजनांना निधी पुरविण्याबाबत**

**(४२) * ३२४१८ श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयातील कायम अवर्षणप्रवण भागातील बार्शी, एकरुख, दहीगाव इत्यादी उपसा सिंचन योजनांना शासनाने अपुरा निधी उपलब्ध करुन दिल्यामुळे सदर योजना रखडल्याचे माहे मार्च, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने निधी उपलब्ध करुन रखडलेल्या उपसा सिंचन योजनांची कामे पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.

(२) सन २०१७-१८ मध्ये बार्शी उपसा सिंचन योजनेस रुपये १० कोटी, एकरुख उसियो रुपये २२ कोटी व दहीगाव उसियोस रुपये १६ कोटी इतकी तरतूद करण्यात आली असून निधीच्या उपलब्धतेनुसार सदरहू योजनेची कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य शासकीय कर्मचारी व सेवानिवृत्त कर्मचारी यांना सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करण्याबाबत

**(४३) * ३१३०९ श्री.संजय दत्त, श्री.कपिल पाटील, प्रा.जोगेन्द्र कवाडे, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक २६७७२ ला दिनांक ९ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करावा, ५ दिवसांचा आठवडा, १ जानेवारी २०१७ पासून वाढीव महागाई भत्ता विनाविलंब द्यावा, अंशदायी पेन्शन योजना रद्द करावी, केंद्राप्रमाणे वाहतूक भत्ता, शैक्षणिक भत्ता शासकीय कर्मचाऱ्यांना लागू करावा, केंद्राप्रमाणे निवृत्तीचे वय ६० वर्षे करावे या मागण्यांचे निवेदन राज्य शासकीय कर्मचारी संघटनेने मा.मुख्यमंत्री महोदयांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनातील मागण्या मान्य न झाल्यास दिनांक १२ ते १४ जुलैअखेर तीन दिवसांचा संप पुकारण्याचा इशाराही दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच राज्यातील सर्व आस्थापनातील शासकीय कर्मचारी आणि निमशासकीय कर्मचारी आणि अनुदानित शाळा व ज्युनिअर कॉलेजातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांना सातवा वेतन आयोग लागू करण्यासाठी गठीत केलेल्या वेतन निश्चित समितीचा अहवाल शासनाला प्राप्त झाला आहे काय,

(४) असल्यास, शासकीय कर्मचारी व सेवानिवृत्त कर्मचारी यांना सदर अहवालाच्या सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करण्याबाबत निर्णय घेण्यात आल्यास सदर निर्णयाचे स्वरुप काय आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) असल्यास, सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करण्यासाठी किती निधीची आवश्यकता आहे व सदर निधी कशाप्रकारे उपलब्ध करण्यात येणार आहे, तसेच सातवा वेतन आयोग लागू करण्याबाबत शासनाने निश्चित केलेल्या वेळापत्रकाचा तपशिल काय आहे,
(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) होय.
(२) होय, तथापि अधिकारी/ कर्मचारी संघटनांशी शासनाने चर्चा केली असून सदर संप मागे घेण्यात आला आहे.
(३) नाही.
(४), (५) व (६) राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ चा अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यावर निर्णय घेण्यात येईल व आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

-----------------

## कामशेत जवळील मुंधावरे गावात (ता.मावळ, जि.पुणे) बिसलेरी कंपनीने इंद्रायणी नदीच्या पाण्यावर वॉटर प्लांट सुरु केल्याबाबत

**(४४) * ३२४८८ श्री.जयंत पाटील, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कामशेत जवळील मुंधावरे गावात (ता.मावळ, जि.पुणे) बिसलेरी कंपनीने सन २०११ मध्ये मिनरल वॉटर प्लांट सुरू केला असून सदर प्लांटसाठी इंद्रायणी नदीच्या पाण्याचा वापर करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, इंद्रायणी नदीच्या पाण्यावर बिसलेरीचा प्लांट सन २०११ सुरू झाल्यापासून ते माहे एप्रिल, २०१७ पर्यंत इंद्रायणी नदी परिसरातील गावांना पाणी टंचाई निर्माण झाली असून शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणीपुरवठा होत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तेथील गावकऱ्यांना इंद्रायणी नदीच्या पाण्यावर घेण्यात येणाऱ्या पिकासाठी सिंचनासाठी रूपये ४००/- प्रति तास दराने पाणी विकत घ्यावे लागत आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन इंद्रायणी नदी परिसरातील शेतीला व गावांना पाणीपुरवठा होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :**
(१), (२) व (३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्ह्यातील कुपोषित बालकांवर उपचार व आहार देताना मातांना बुडीत मजुरी मिळण्याबाबत

**(४५) * ३२०५४ डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील बालकांमध्ये कुपोषणाच्या प्रमाणात वाढ होवून जिल्ह्यात तीव्र कुपोषित (सॅम) बालकांची संख्या १७८ तर अति तीव्र कुपोषित (मॅम) बालकांची संख्या ७३८ असे एकुण ९१६ कुपोषित बालके नाशिक जिल्हा परिषदेच्या सर्वेक्षणात आढळून आल्याचे दिनांक १५ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कुपोषित बालकांवर उपचार व आहार देताना मातांना बुडीत मजुरी देण्याची तरतुद केंद्राच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या व्ही.सी.डी.सी. योजनेत असताना त्यासाठी निधीच उपलब्ध नसल्याने या योजनेचा कुपोषित बालकांसाठी सद्यस्थितीत लाभ मिळत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नाशिक जिल्ह्यात बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांची २६ पदे मंजुर असून प्रत्यक्षात ४ अधिकारी कार्यरत असून २२ पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, आदिवासी भागातील कुपोषित बालकांवर प्राथमिक आरोग्य केंद्र व त्यानंतर ग्रामीण रुग्णालयात उपचार शक्य नसल्याने जिल्हा शासकीय रुग्णालयात पाठविण्यात येते, मात्र आदिवासींकडे प्रवास व अन्य गरजपूर्तीसाठी पुरेसा पैसा नसल्याने कुपोषणाचा प्रश्न गंभीर होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, नाशिक जिल्ह्यातील बालकांचे कुपोषण रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही करण्यात केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) नाशिक जिल्हयात सॅम बालकांसाठी केंद्र सरकारच्या राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान योजनेंतर्गत माहे ऑगस्ट, २०१५ पर्यंत VCDC कार्यान्वित होती. सदरची योजना आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येत होती. परंतु ऑगस्ट, २०१५ नंतर आरोग्य विभागास निधी उपलब्ध न झाल्याने VCDC चे नियोजन करता आलेले नाही.

जिल्हयातील सन २०१६-१७ व २०१७-१८ या वर्षातील बालकांची संभाव्य आकडेवारी लक्षात घेवून सॅम बालकांसाठी VCDC चे नियोजन करण्यात आले आहे. आयुक्त एकात्मिक आदिवासी विकास विभागाकडे दिनांक ४/२/२०१७ चे पत्रानुसार निधी रक्कम रुपये ८७.७६ लक्षचा मागणी प्रस्ताव सादर करणेत आलेला होता त्यानुसार सन २०१७-१८ मध्ये जिल्हाधिकारी, नाशिक यांचेकडील दिनांक २७/४/२०१७ चे पत्रानुसार रक्कम रुपये ८७.७६ लक्ष नियतव्यय मंजूर झालेले आहे.

(३) नाशिक जिल्ह्यात बाल विकास प्रकल्प अधिकारी यांची २६ पदे मंजुर असुन प्रत्यक्षात १५ बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यरत आहेत. उर्वरीत ११ पदे रिक्त आहेत.

(४) हे खरे नाही.

आदिवासी भागातील कुपोषित बालकांवर प्राथमिक आरोग्य केंद्र व त्यानंतर ग्रामीण रुग्णालयात उपचार शक्य नसल्यास जिल्हा शासकीय रुग्णालयात पाठविण्यात येत आहे. सन २०१६-१७ या वर्षात मार्च २०१७ अखेर NRC मध्ये २२८ व CTC मध्ये १६७ SAM बालकावर उपचार करणेत आले आहेत. तसेच सन २०१७-१८ वर्षात जून, २०१७ अखेर NRC मध्ये ७० व CTC मध्ये ११ SAM बालकावर उपचार करणेत आले आहे.

(५) कुपोषणाला आळा घालण्याच्या दृष्टीने एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत अंगणवाडयातील ०-६ वर्षे वयोगटातील बालके, गर्भवती, स्तनदा माता, किशोरवयीन मुली यांना - १) पुरक पोषण आहार, २) आरोग्य तपासणी, ३) संदर्भ सेवा, ४) अनौपचारीक पूर्व शालेय शिक्षण, ५) लसीकरण, ६) आहार व आरोग्य इ. सेवा नियमित देण्याच्या विविध योजना राबविण्यात येत आहेत.

-----------------

## मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या स्थगित शिष्यवृत्या त्वरीत अदा करण्याबाबत

**(४६) * ३२२०६ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इतर मागासवर्ग/विशेष मागासप्रवर्ग/विमुक्त जाती, भटक्या जमाती/अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या स्थगित शिष्यवृत्या त्वरीत अदा करण्याबाबत छात्र भारतीने समाजकल्याण आयुक्तांकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच शिष्यवृत्तीची प्रलंबित प्रकरणे ऑनलाईन करण्यासाठी आणि प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती फॉर्म ऑनलाईनने भरण्यासाठी आवश्यक सुविधा सर्व महाविद्यालयात उपलब्ध करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) नाही, अशा स्वरुपाचे निवेदन आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे अथवा संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे यांचेकडे प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) शिष्यवृत्ती योजनेंतर्गत पात्र विद्यार्थ्यांची प्रलंबित प्रकरणे निकाली काढणेबाबत कार्यवाही सुरु असून सन २०१७-१८ पासून शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क परीक्षा शुल्क योजनेची कार्यवाही ऑनलाईन पध्दतीने शासनाच्या DBT पोर्टलवरुन कार्यान्वित करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## अंतरगाव (ता.सावली, जि.चंद्रपूर) प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकाऱ्यांची भरती करण्याबाबत

**(४७) * ३३७५६ श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंतरगाव (ता.सावली, जि.चंद्रपूर) प्राथमिक आरोग्य केंद्रात सहा उपकेंद्र मिळून सुमारे २४,३६५ लोकांच्या आरोग्याच्या व्यवस्थेसाठी फक्त एक डॉक्टर कार्यरत असल्याचे दिनांक २६ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्राथमिक आरोग्य केंद्रामधील वैद्यकीय अधिकारी यांच्या अनुपस्थितीत दिनांक ३० एप्रिल, २०१७ पर्यंत बी.ए.एम.एस. डॉक्टरवर तालुक्याची जबाबदारी देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर आरोग्य केंद्रामध्ये वैद्यकीय अधिकाऱ्यांची भरती करण्यास कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशतः खरे आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र, अंतरगाव येथे वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गाची दोन पदे मंजूर असून त्यापैकी एका पदावर स्थायी वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत. तसेच, रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार प्रा. आ. केंद्र, व्याहाड बु. येथील वैद्यकीय अधिकारी यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.

(२) सदर प्राथमिक आरोग्य केंद्रातील रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार दिनांक ३०/०४/२०१७ पर्यंत बी.ए.एम.एस. अर्हताधारक वैद्यकीय अधिकारी यांच्याकडे सोपविण्यात आला होता.

तालुका आरोग्य अधिकारी, सावली या पदावर एम.बी.बी.एस. अर्हताधारक वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कराड तालुक्यातील (जि.सातारा) वाकुलडे बु.ll योजनेचे पाणी**
**कराड दक्षिण मधील टंचाईग्रस्त गावात मिळण्याबाबत**

**(४८) * ३१०९५ श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कराड तालुक्यातील (जि.सातारा) वाकुलडे बु.ll योजनेचे पाणी वारणा पाटबंधारे विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या योग्य नियोजनाअभावी कराड दक्षिण मधील टंचाईग्रस्त गावात अद्याप पोहचू शकले नसल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन कराड दक्षिणसाठी पाणी देताना ते ऐनपे बोगदयातून सोडण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**परभणी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी शासन परिपत्रकाचे उल्लंघन करुन निलंबित शिक्षकांना नियुक्ती दिल्याबाबत**

**(४९) * ३३८६० श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी खोडवेकर यांनी निलंबित शिक्षकांना नियुक्ती देण्याच्या प्रकरणी दिनांक २८ फेब्रुवारी, २०१७ च्या शासन परिपत्रकाचे उल्लंघन करीत तसेच गैरप्रकार केल्यावरून शिक्षक संघटनेचे नेते श्री. कादरी यांनी प्रधान सचिव, ग्रामविकास यांच्याकडे सन २०१७ दरम्यान लेखी तक्रार नोंदविलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन परिपत्रकाचे उल्लंघन व आर्थिक गैरप्रकाराची प्रधान सचिव स्तरावरून चौकशी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने संबंधित दोषींवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) प्रस्तुत तक्रार अर्जाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करणेबाबत विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्य कामगार विमा योजनेच्या विमा रुग्णालयांमध्ये**
**सोयी-सुविधांचा अभाव असल्याबाबत**

**(५०) * ३१५९३ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कामगार विमा योजनेच्या रुग्णालयांमध्ये रुग्णांवर उपचार करण्यासाठी लागणाऱ्या सोयी सुविधांचा अभाव असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरोग्य संचालनालयातून प्राप्त माहितीनुसार राज्यातील १४ विमा रुग्णालयातील ४ हजार १२५ खाटांपैकी केवळ २ हजार ३२० खाटा कार्यरत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विमा रुग्णालयात वैद्यकीय चाचण्या करण्यासाठी तंत्रज्ञ नेमलेले नसून तज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विमा रुग्णालयाचे प्रशासन सार्वजनिक आरोग्य विभागाकडे नसून आरोग्य विभागाने दुसऱ्या विभागाकडे दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील कामगारांच्या आरोग्याच्यादृष्टीने राज्यातील विमा रुग्णालयांमध्ये अद्यावत सोयी सुविधा पुरविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

सद्यस्थितीत १३ राज्य कामगार विमा रुग्णालयामध्ये एकूण ४१०० खाटांची क्षमता असून शासन निर्णय दिनांक १/१०/२००७ अन्वये सदर रुग्णालयात एकूण २०५० खाटा मंजुर करण्यात आल्या आहेत.

(३) हे अंशत: खरे आहे.

सद्यस्थितीत राज्य कामगार विमा योजनेंतर्गत प्रयोगशाळा तंत्रज्ञांचे २० पदे भरलेली असून वैद्यकीय अधिकारी गट-अ ची एकूण १३३ पदे भरलेली आहेत.

तथापि, जेथे तंत्रज्ञांचे पद रिक्त आहे, तेथे विमाधारकांच्या वैद्यकीय सेवेत अडथळा येऊ नये याकरीता खाजगी संस्थेमार्फत विनामूल्य वैद्यकीय चाचण्यांचा लाभ देण्यात येतो.
(४) हे खरे नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**उपजिल्हा रुग्णालय, गेवराई येथील वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरणेबाबत**

**(५१) * ३१५३९ श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.सतिश चव्हाण, श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उपजिल्हा रुग्णालय, गेवराई (जि.बीड) हे दोन राष्ट्रीय महामार्गावरील रुग्णालय असल्यामुळे येथील कामाची व्याप्ती लक्षात घेवून शासनाने ११ वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे भरली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मंजूर पदांपैकी ६ वैद्यकीय अधिकारी प्रतिनियुक्तीवर, २ पदव्युत्तर शिक्षणासाठी पाठविल्यामुळे व इतर कारणांमुळे वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या रिक्त पदांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपजिल्हा रुग्णालयातील कामाची व्याप्ती, रुग्णांची होणारी हेळसांड, गैरसोय आदी बाबी लक्षात घेवून वैद्यकीय अधिकाऱ्यांसह इतर कर्मचारी यांची रिक्त पदे भरण्याची मागणी लोकप्रतिनिधी यांनी माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांची रिक्त पदे भरून गेवराई उपजिल्हा रुग्णालयातील इतर आरोग्य सुविधा व ट्रामा केअर युनिट सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

उप जिल्हा रुग्णालय, गेवराई,जि.बीड हे ५० खाटांचे रुग्णालय कार्यान्वित आहे. सदर रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गाची एकूण ७ पदे मंजूर असून ७ पदे भरलेली आहेत.

शासन निर्णय दिनांक ८/३/२००६ अन्वये गेवराई जि.बीड येथील मंजूर ट्रामा केअर युनिटसाठी वैद्यकीय अधिकारी गट-अ ची ५ पदे मंजूर असून सर्व पदे भरलेली आहेत.

(२) हे खरे नाही.

२ वैद्यकीय अधिकारी पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरीता अनधिकृत गैरहजर आहेत. त्यांचेविरुध्द कारवाई सुरु असून त्यांचे जागी बंधपत्रीत वैद्यकीय अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. रुग्णांना आरोग्य सेवा पुरविण्यात येत आहेत.

(३) हे खरे आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**राज्यातील स्वाईन फ्ल्यूच्या आजारावर नियंत्रण ठेवण्याबाबत**

**(५२) * ३१२१७ आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, ॲड.जयदेव गायकवाड, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, डॉ.सुधीर तांबे, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.रामनिवास सिंह, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, ॲड.निरंजन डावखरे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.प्रकाश गजभिये, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती स्मिता वाघ, श्री.सतिश चव्हाण, डॉ.अपूर्व हिरे, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दिनांक १ जानेवारी, २०१७ ते मे, २०१७ अखेरपर्यंत स्वाईन फ्ल्यूच्या रोगाचे सुमारे ३०९१ संशयित रुग्ण विविध रुग्णालयात दाखल असून त्यापैकी सुमारे १०५८ स्वाईन फ्लूच्या रुग्णांची नोंद झालेली असून सुमारे २१० रुग्णांचा मृत्यू व १९ रुग्ण व्हेंटिलेटरवर असणे व तसेच मुंबईत स्वाईन फ्ल्यूमुळे एकाचा मृत्यू झाल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यातील विशेषत: पुणे जिल्ह्यात स्वाईन फ्ल्यूमुळे ३४ व नाशिक, औरंगाबाद, अहमदनगर आणि नागपूर या जिल्ह्यांमध्ये सुमारे १०६ रुग्ण व डाऊच (ता.कोपरगांव, जि.अहमदनगर) येथे एका रुग्णाचा मृत्यू झाल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील शासकीय रुग्णालयात स्वाईन फ्ल्यूच्या रुग्णांना वेळेवर औषधे दिली जात नाहीत तसेच आरोग्य अधिकारी घटनास्थळी जात नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर आजारावर आळा घालण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

१ जानेवारी ते ३१ मे, २०१७ या कालावधीत इन्फल्यूएंझा ए एच१ एन१ आजाराचे संशयित तसेच बाधित असे एकूण ३६८१ रुग्ण राज्यभरातील विविध रुग्णालयात भरती झाले होते. यापैकी ११४५ रुग्ण इन्फल्यूएंझा ए एच१ एन१ बाधित आढळले असून त्यापैकी २२६ रुग्णांचा मृत्यू झाला आहे. ३१ मे, २०१७ रोजी १० रुग्ण व्हेंटीलेटरवर होते. मुंबईतील फ्ल्यूचा पहिला बळी एप्रिल, २०१७ मध्ये गेला, हे खरे आहे.

(२) हे ही अंशत: खरे आहे.

पुणे जिल्ह्यात (शहरी व ग्रामीण) १ जानेवारी ते ३१ मे, २०१७ या कालावधीत ६१ मृत्यू झाले असून याच कालावधीत नाशिक, औरंगाबाद, अहमदनगर आणि नागपूर या जिल्ह्यामध्ये एकूण ८८ मृत्यू झाले आहेत.

डाऊच, ता.कोपरगाव, जि.अहमदनगर येथील दिपक बबनराव ठोंबरे या ३५ वर्षीय पुरुषाचा मृत्यू दिनांक १५ एप्रिल, २०१७ रोजी इन्फल्यूएंझा ए एच१ एन१ मुळे झाला, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

राज्यात फ्ल्यूवरील ऑसेलटॅमीवीर हे औषध पुरेशा प्रमाणात उपलब्ध असून रुग्णांवर लक्षणाच्या वर्गवारीनुसार उपचार करण्यात येतात. ज्या भागात या आजाराचे मृत्यू होतात अथवा बाधित रुग्ण आढळतात तेथे प्रत्यक्ष भागात जाऊन सर्वेक्षण करण्यात येते. अधिकारी देखील आवश्यकतेनुसार क्षेत्रिय भेटी देतात.

(४) इन्फ्ल्यूएंझा ए एच१ एन१ प्रतिबंध व उपचारासाठी पुढील उपाययोजना करण्यात येतात :-

* फ्ल्यू सदृश्य रुग्णांचे नियमित सर्वेक्षण.
* रुग्णांवर वर्गीकरणानुसार विनाविलंब उपचार.
* उपजिल्हा रुग्णालयात तसेच वैद्यकीय महाविद्यालयांच्या रुग्णालयात विलगीकरण कक्षाची स्थापना.
* उपचार सुविधा असणाऱ्या सर्व खाजगी रुग्णालयांना स्वाईन फ्ल्यू उपचाराची मान्यता.
* राज्यातील ४ शासकीय प्रयोगशाळा मार्फत मोफत निदान सुविधा.
* रेलिगेअर आणि डॉ. लाल पॅथॉलॉजी लॅब शिवाय इतर खाजगी प्रयोगशाळांना मान्यता देण्यासाठी तज्ञ समित्यांची स्थापना.
* ऑसेलटॅमीवीरचा पुरेसासाठा.
* दुसऱ्या व तिसऱ्या तिमाहितील गरोदर मातांना तसेच उच्च रक्तदाब व मधुमेह असणाऱ्या रुग्णांना आणि आरोग्य कर्मचाऱ्यांना फ्ल्यू प्रतिबंधक लसीकरण.
* महाराष्ट्र साथरोग प्रतिबंध व नियंत्रण तांत्रिक समितीची स्थापना.
* अन्न व औषध प्रशासनामार्फत खाजगी औषध दुकांनामध्ये ऑसेलटॅमीवीर उपलब्ध ठेवण्यासाठी समन्वय.
* शासकीय आणि खाजगी डॉक्टरांच्या स्वाईन फ्ल्यू कार्यशाळा.
* फ्ल्यू प्रतिबंधांसाठी जनतेचे आरोग्य शिक्षण.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**श्री क्षेत्र टिटवाळा (ता.कल्याण, जि.ठाणे) या स्थळाचा पर्यटनदृष्टया विकास करण्याबाबत**

**(५३) * ३१२५२ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.हेमंत टकले, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर दिनांक ६ एप्रिल, २०१७ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ७ मधील प्रश्न क्रमांक २०१९९ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री क्षेत्र टिटवाळा (ता.कल्याण, जि.ठाणे) येथे पर्यटन विकास महामंडळाची सुमारे १४.४७ एकर जागा अस्तित्वात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू जागेचा पर्यटन विकास करण्याच्यादृष्टीने सन २०१३ मध्ये सर्वेक्षण करण्यात आले असून पर्यटन विकास आराखडाही तयार करण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर विकास आराखड्यात दोन लॉन्स, मुलांसाठी खेळणी, प्रदर्शन विभाग, व्याख्यान कक्ष, शास्त्र संग्रहालय, इनडोअर गेम्स, लोकनिवास, बोटॅनिकल गार्डन, जलतरण तलाव, थीम पार्क, बाग-बगीचा इत्यादीसह स्वागत कक्ष, प्रशासकीय इमारत, उपाहारगृह, गुरुकुल व पर्यटक निवास कक्ष उभारण्याची योजना प्रस्तावित असल्याचे पत्र तत्कालीन व्यवस्थापकीय संचालकांनी तत्कालीन स्थानिक लोकप्रतिनिधींना दिनांक २२ मार्च, २०१३ रोजी वा त्यासुमारास दिलेले होते, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकल्प उभारण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) श्री क्षेत्र टिटवाळा येथे महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या नावावर १५.५६ एकर जागा आहे.

(२) व (३) होय.

(४) व (५) टिटवाळा येथील पर्यटक निवासाच्या श्रेणीवाढीचे व संरक्षक भिंतीचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे व दोन अतिरिक्त कक्षांची कामे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेची काम सुरु करण्याची परवानगी प्राप्त झाल्यानंतर हाती घेण्यात येणार आहेत.

-----------------

## पिंपरी (जि.पुणे) येथे डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे पाय गमावलेल्या रुग्णास नुकसान भरपाई देण्याबाबत

**(५४) * ३२९२३ श्री.प्रविण दरेकर** : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी (जि.पुणे) येथील रुग्णाला डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे पाय गमवावा लागलेल्या संबधित रुग्णाला रुपये पाच लाख नुकसान भरपाई तसेच अकार्यक्षम व वैद्यकिय हलगर्जी करणाऱ्या डॉक्टरांवर कारवाई करण्याचे आदेश राज्य मानवी हक्क आयोगाने माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलला दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन या आदेशानुसार संबधित डॉक्टरवर कोणत्या कलमान्वये कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री. गिरीष महाजन :** (१) होय, हे खरे आहे.
(२) महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम, १९६५ मधील कलम २२ व महाराष्ट्र वैद्यकीय परिषद नियम, १९६७ मधील नियम ६२ ते ७५ अन्वये महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेमार्फत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबईतील गोराई येथील 'एस्सेल वर्ल्ड' कंपनीने कांदळवनांची तोड केल्याबाबत**

**(५५) * ३३६०३ श्री.सुजितसिंह ठाकूर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोराई (मुंबई) येथील 'एस्सेल वर्ल्ड' कंपनीने रिसोर्टचे काम सुरु करण्यासाठी कांदळवनांची तोड करुन भराव टाकून अतिक्रमण केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू कंपनीवर यापूर्वी देखील अनेकवेळा अतिक्रमण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार 'एस्सेल वर्ल्ड' कंपनीविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) गोराई (मुंबई) येथील एस्सेल वर्ल्ड/पॅन इंडिया कंपनीने कांदळवनाची तोड करुन भराव टाकल्याबाबत गोराई पोलीस ठाणे येथे वि.स्था.गु.र.क्र. ०२/१४ कलम १५(१), १६ पर्यावरण संरक्षण व प्रदुषण नियंत्रण कायदा, १९८६ सह कलम ८, २१ तसेच वृक्ष संवर्धन अधिनियम, १९७५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर प्रकरणी पोलीसांनी चौकशी करुन दाखल केलेल्या अहवालावरुन मा. २६ वे न्यायालय, बोरीवली यांनी दिनांक १५/१/२०१५ रोजी “क” वर्गीकरण समरी मंजूर केला आहे.

(३) सदर प्रकरणी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कांदळवन कक्ष), मुंबई यांचे दिनांक २१/७/२०१६ रोजीच्या चौकशी अहवालानुसार कार्यवाही करण्यासाठी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना शासन स्तरावरुन सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात क्लिनिकल एस्टॅब्लिशमेंट ॲक्ट लागू करण्याबाबत**

**(५६) * ३२२५७ ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.विक्रम काळे : दिनांक ४ ऑगस्ट, २०१६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ६ मधील प्रश्न क्रमांक १४६४८ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाने सन २०१२ मध्ये क्लिनिकल एस्टॅब्लिशमेंट ॲक्ट (रजिस्ट्रेशन ॲंड रेग्युलेशन) लागू केला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या विधेयकाचा मसूदा तयार करण्यासाठी शासनाने माहे डिसेंबर, २०१३ मध्ये १९ सदस्यांची समिती गठीत करुनही कोणतीही कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सदर कायदयाची अंमलबजावणी किती कालावधीत करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही. समितीच्या बैठका होवून मागविण्यात आलेल्या हरकती व सुचना विचारात घेऊन तसेच वित्त, नियोजन, विधी व न्याय विभागांची सहमती घेऊन पुढील कार्यवाही केली जात आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**गोंदिया जिल्हयात बालमृत्यू व मातामृत्यूचे प्रमाण वाढत असल्याबाबत**

**(५७) * ३३२११ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शून्य मातामृत्यू व बालमृत्यू आणण्यासाठी शासन प्रयत्न करीत असले तरी गोंदिया जिल्हयात बालमृत्यू व मातामृत्यूचे प्रमाण वाढत असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे काय,

(२) असल्यास, मागील दिड महिन्यात गोंदिया जिल्हयातील ग्रामीण भागात ६ तर शेंडा प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत ३ गर्भवती मातांचा मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गर्भवती मातांच्या उपचारात हेळसांड करणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

गोंदिया जिल्हयात २०१७-१८ या वर्षामध्ये एप्रिल ते जून या कालावधीतील झालेल्या मातामृत्यूची संख्या २०१६-१७ मधील मातामृत्यूच्या तुलनेमध्ये ३ ने वाढली आहे. तथापि बाल मृत्यूचे प्रमाण कमी झाले आहे.

| वर्ष | मातामृत्यू | बालमृत्यू |
|---|---|---|
| वर्ष २०१६-१७ | ४ | ८५ |
| वर्ष २०१७-१८ | ७ | ७५ |

(२) गोंदिया जिल्हयात माहे मे, २०१७ मध्ये ४ व माहे जून, २०१७ मध्ये ३ असे एकूण ७ मातामृत्यू झालेले आहेत, त्यापैकी शेंडा प्रा.आ. केंद्र कार्यकक्षेतील ३ गर्भवती मातांचा मृत्यू झालेला आहे.
(३) जिल्हा गुणवता अभिवचन समितीने सादर केलेल्या मातामृत्यू अन्वेषण अहवालानुसार प्रा.आ. केंद्र, शेंडा स्तरावर उपचारात हेळसांड झाल्याचे आढळून येत नाही. तथापि सदरहू माता मृत्यू संदर्भात उपसंचालक, आरोग्य सेवा, नागपूर मंडळ स्तरावरील समितीने अन्वेषण करून खातरजमा करण्याबाबत सूचित करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बानायात (ता.दारव्हा, जि.यवतमाळ) येथील खासगी फायनान्स कंपनीच्या जाचाला कंटाळून एका तरुणाने आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याबाबत**

**(५८) * ३०९०० श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बानायात (ता.दारव्हा, जि.यवतमाळ) येथील खासगी फायनान्स कंपनीकडून कर्ज घेतल्यामुळे कंपनीच्या वसुलीच्या जाचाला कंटाळून श्री. संतोष शिंदे याने जिल्हाधिकारी यवतमाळ कक्षासमोर विष प्राशन करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वसुलीसाठी तगादा लावणाऱ्या खासगी फायनान्स कंपनीविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) सदर व्यक्तीने आत्महत्येचा प्रयत्न केला हे खरे आहे. परंतू, त्यांनी कोणत्या कारणावरुन आत्महत्येचा प्रयत्न केला हे अद्याप निष्पन्न झालेले नाही. सदर प्रकरणाचा तपास सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**डहाणू (जि.पालघर) येथील ट्रामा सेंटर सुरु करण्याबाबत**

**(५९) * ३२३२३ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (जि. पालघर) येथे शासनाने रुपये ५४ लाख खर्च करुन बांधलेली ट्रामा सेंटर इमारत बांधून एक वर्षाचा कालावधी उलटून सुरु केले नसल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन तालुक्यातील नागरीकांना आरोग्य सेवा मिळावी म्हणून ट्रामा सेंटर सुरु करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) सदर ट्रामा केअर सेंटरसाठी लागणारा ३ फेज वीज पुरवठा, पाणी पुरवठा यांच्या सोयी करणे बाकी आहे. तसेच डहाणू नगरपरिषदेचे भोगवटा प्रमाणपत्र (Occupancy Certificate) अद्याप प्राप्त झालेले नाही. त्यामुळे सदर इमारत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अद्याप विभागास हस्तांतरीत करण्यात आलेली नाही. याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मंचर (जि.पुणे) उपजिल्हा रुग्णालयातील गैरसोईबाबत**

**(६०) * ३१४४९ श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, ॲड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंचर उपजिल्हा रुग्णालय (जि.पुणे) येथे डॉक्टर तसेच भूलतज्ञांची पदे रिक्त असणे, १० बेड्सचे आयसीयू (ICU) यूनिट बंद असणे, एक्सरे मशीन बंद असणे, ECG तंत्रज्ञ नसणे, क व ड वर्गातील कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याने रुग्णांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णालयांतील या त्रुटींमुळे अनेक रुग्णांना खाजगी रुग्णालयाकडे जावे लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

उपजिल्हा रुग्णालय मंचर, जि. पुणे येथे मंजूर पदांपैकी ४० ते ५० टक्के पदे भरलेली आहेत. राष्ट्रीय आरोग्य अभियान व आयपीएचएस अंतर्गत कॉल बेसीसवर भुलतज्ञाच्या सेवा उपलब्ध करुन दिल्या जात आहेत. रुग्णांची गैरसोय होत नाही.

सदर रुग्णालयामध्ये ५ खाटांचा अतिदक्षता विभाग, डायलिसिस विभाग व नवजात बालक अतिदक्षता विभाग कार्यान्वित आहे. उपलब्ध मनुष्यबळातून कामकाज सुरु आहे. एक्स रे मशिन सुस्थितीत असून ग्रामीण रुग्णालय, घोडेगाव येथील एक्स-रे टेक्नीशियनच्या सेवा अधिग्रहीत करुन त्यांच्यामार्फत सेवा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. तसेच काही टेक्नीशियनचे पद रिक्त असले तरी, राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत खाजगी डायग्नॉस्टीक सेंटर यांच्याबरोबर करार करुन सवलतीच्या दरात सेवा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**गोंदिया जिल्हयातील कालीमाटी बाघ सिंचन व्यवस्थापन शाखेतील टेकरी वितरिकेला नियमित पाणीपुरवठा करण्याबाबत**

**(६१) * ३३२९१ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्हयातील कालीमाटी बाघ सिंचन व्यवस्थापन शाखेतील टेकरी वितरिकेला अनियमित पाणीपुरवठा होत असल्यामुळे ३० हेक्टर कोरडवाहू शेतजमिनीतील उभे पीक नष्ट होण्याच्या मार्गावर असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोटार पंप लावून पाण्याची चोरी होत असल्याने शेतीस पाणी मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शेतकऱ्यांनी वेळोवेळी संबंधितांकडे तक्रार करुनही कोणतीही कार्यवाही होत नसल्याने याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशतः खरे आहे,

बाघ प्रकल्पाच्या डावा मुख्य कालव्याच्या कालीमाटी बाघ सिंचन व्यवस्थापन शाखेतील टेकरी वितरीकेवरील माहे एप्रिल, २०१७ मध्ये उन्हाळी हंगामाचे नियोजित ४०४ हेक्टर करीता सिंचन सुरू होते. प्रश्नातील नमुद लाभक्षेत्र टेकरी वितरीकेवरील भोसा लघु कालवा क्र. २ चे पुच्छ भागातील मौजा भोसा येथील आहे. सदर क्षेत्र पुच्छ भागात असल्याने त्यास उन्हाळी सिंचनाचे

पाणी उशीरा मिळालेले होते. सर्व लाभधारकांना सिंचनासाठी मागणीप्रमाणे पाणी पुरविण्यात आल्याचे श्री गीतगंगा पाणी वापर संस्थेने दिनांक ०५/०७/२०१७ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

तथापि, टेकरी वितरीकेवरील संपूर्ण ४०४ हेक्टर क्षेत्रास उन्हाळी हंगाम २०१७ मध्ये सिंचन करण्यात आले असून कोणतेही उभे पीक नष्ट झालेले नाही.

(२) नाही. टेकरी वितरीकेवरील ४०४ हेक्टर क्षेत्राकरीता सहकार कायदा अंतर्गत स्थापित पाणी वापर संस्थेद्वारे उन्हाळी हंगामात संपूर्ण ४०४ हेक्टर क्षेत्रास सुरळीत सिंचन करण्यात आले आहे. संस्थेचे लाभक्षेत्रात लाभधारकांना मोटार पंप लावून कोणाच्याही शेतास सिंचन करण्यात आलेले नाही

(३) उपरोक्त प्रकरणी शेतक-यांकडून कोणतीही लेखी तक्रार पाणी वापर संस्थेकडे तसेच संबंधीत बाघ ईटीयाडोह पाटबंधारे विभाग, गोंदिया यांचेकडे वा त्या अंतर्गत उप विभाग व कालीमाटी सिंचन शाखा कार्यालयाकडे प्राप्त झालेली नाही. त्यामुळे चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

## राज्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत

**(६२) * ३१११२० श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.विनायकराव मेटे, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.बाळाराम पाटील, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.नारायण राणे : तारांकित प्रश्न क्रमांक २७६९७ ला दिनांक २३ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात एकूण १ लाख ८० हजार अंगणवाडी सेविका, मदतनीस व मिनी अंगणवाडीच्या २० हजार सेविका असून त्यांना शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे दर्जा देणे, मानधनवाढ, सेवाशर्तीसह वेतनश्रेणी, बैठक भत्ता मिळणे, मिनी अंगणवाडी सेविकेला नियमित अंगणवाडी सेविकाचा दर्जा मिळून मानधन तसेच प्रवास व बैठक भत्ता दर महिन्याला मिळावा या मागण्या अद्याप प्रलंबित असल्याचे निवेदन लोकप्रतिनिधी यांनी मा.ग्रामविकास मंत्री यांना दिल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १ एप्रिल, २०१७ पासून संपावर जाणार असल्याचा इशारा अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी दिला असल्याने, त्यापूर्वी दोन दिवस अगोदर मा.महिला व बालविकास मंत्री यांनी कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांबरोबर बैठक घेवून अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या मागण्यासंदर्भात विचारविनिमय करून काही निर्णय घेतले आहेत, त्याचे थोडक्यात स्वरूप काय आहे,

(३) असल्यास, सदरहू बैठकीत घेतलेल्या निर्णयाची अद्याप अंमलबजावणी झालेली नसल्याने स्थगित केलेला संप पुन्हा सुरू करण्याचा इशारा दिनांक ३० मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास कोल्हापूर जिल्हा परिषदेवर मोर्चा काढून मागण्यांचे एक निवेदन मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांसदर्भात शासनाने समिती नेमली आहे काय व या समितीने शासनास अहवाल सादर केला असून अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन त्यांना न्याय देण्यासाठी अहवालावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) दिनांक ३० मार्च, २०१७ रोजी मा.मंत्री, महिला व बाल विकास विभाग यांचे अध्यक्षतेखाली कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांबरोबर बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत मानधनी कर्मचाऱ्यांच्या मानधनवाढीबाबतचा निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व मंत्रीमंडळाच्या मान्यतेने घेणे आवश्यक असल्याने त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

१. अंगणवाडी सेविका/मदतनीस/मिनी अंगणवाडी सेविका यांच्या मानधनात वाढ करणेबाबत.
२. सेवानिवृत्तीनंतर एकरकमी लाभ देण्याच्या कार्यपध्दतीत सुलभीकरण करणेबाबत.
३. सेविकांच्या सेवानिवृत्तीचे वय ६५ वर्षे वरुन ६० वर्षे करणेबाबत.
४. सेविकांना अन्य विभागाची कामे न देण्याबाबत तसेच अन्य विभागांची कामे दिल्यास मोबदला देण्याचे विचाराधीन आहे.
५. सेविकांची ५ वर्षे सेवा झाल्यानंतर वेतन वाढीमध्ये दर पाच वर्षानी १०% वेतनवाढ करण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे.
६. अंगणवाडी सेविकांना देण्यात येणाऱ्या भाऊबीज भेट मध्ये वाढ करण्याबाबतची बाब विचाराधीन आहे.

(३) होय, हे खरे आहे. अंगणवाडी संघटनेच्या मागण्यांबाबत धोरणात्मक निर्णय झाल्यानंतर त्याची अंमलबजावणी करण्यात येईल.
(४) व (५) अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत शासनाने समिती नेमली होती. समितीच्या अहवालावर कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

**वायरी भूतनाथ, जाधववाडी (ता.मालवण, सिंधुदुर्ग) येथील समुद्रात पर्यटकांचा मृत्यू झाल्याबाबत**

**(६३) * ३०९८६ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.जयंत पाटील, श्री.बाळाराम पाटील, श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वायरी-भूतनाथ, जाधववाडी (ता.मालवण, सिंधुदुर्ग) येथील समुद्रकिनाऱ्यावर बेळगांवमधील मराठा मंडळ अभियांत्रिकी महाविद्यालयातील सहलीसाठी आलेल्या एका प्राध्यापकाचा व ७ विद्यार्थ्यांचा बुडून मृत्यू झाल्याची घटना दिनांक १५ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास घडली, हे ही खरे आहे काय,
(२) तसेच रायगड जिल्ह्यात माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान तिघांचा समुद्रात बुडून मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, समुद्रकिनाऱ्यावर पर्यटकांच्या सुरक्षेसाठी जीवरक्षकांची नियुक्ती करण्याच्या शासनाच्या सूचना संबधित विभागास करण्यात येवूनही मागील काही वर्षात अनेक पर्यटकांचा जीवरक्षकाअभावी बुडून मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कोकणातील किती समुद्रकिनाऱ्यांवर जीवरक्षकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे व किती समुद्रकिनारी स्पीडबोट, वॉटर स्कूटर, प्रथमोपचार अशा सुविधा पुरविण्यात आल्या आहेत,
(५) असल्यास, माहे मार्च, २०१७ पासून जीवरक्षकांचे मानधन हे जिल्हा प्रशासनाऐवजी संबधित ग्रामपंचायती व नगरपरिषदांना द्यावे लागणार असून त्यांच्याकडे जीवरक्षकांचे मानधन देण्याची आर्थिक क्षमता आहे काय,
(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन समुद्रकिनारी पर्यटनासाठी येणाऱ्या पर्यटकांच्या सुरक्षेच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) व (२) होय.

(३) जीवरक्षक नसल्यानेच बुडून मृत्यू झाले अशी बाब नाही. धोक्याच्या दिलेल्या सूचनांकडे दुर्लक्ष केल्यामुळेही काही ठिकाणी पर्यटकांचे मृत्यू झाल्याच्या घटना घडल्या आहेत.

(४) कोकणातील पालघर जिल्ह्यातील १३ समुद्र किनाऱ्यांवर, रत्नागिरी जिल्ह्यातील १९ समुद्र किनाऱ्यांवर, रायगड जिल्ह्यातील १० समुद्र किनाऱ्यांवर, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील १३ समुद्र किनाऱ्यांवर जीवरक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. स्पीड बोट, वॉटर स्कूटर या सुविधा पुरविण्यात आलेल्या नाहीत. प्रथमोपचाराबाबत नजीकच्या प्राथमिक आरोग्य केंद्राची माहिती फलकावर लावण्यात आली आहे.

(५) काही ग्रामपंचायती व नगरपरिषदा आर्थिकदृष्ट्या सक्षम आहेत तर काही ग्रामपंचायती व नगरपरिषदा सक्षम नाहीत.

(६) वरील ४ जिल्ह्यांसाठी प्रत्येकी २५ प्रमाणे १०० जीवरक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले आहे व त्यासाठी एकूण रुपये २५.८४ लक्ष इतका खर्च करण्यात आला आहे. तसेच सदर ४ जिल्ह्यांसाठी लाईफ जॅकेट कोट टाईप, लाईफ बोए, मेगा फोन, बीओबी रोप, डायव्हिंग गॉगल्स, वुलन ब्लँकेट, दुर्बीण, शिट्या, इलेक्ट्रिकल वॉल माऊंटेड सायरन, हॅलोजन सर्च लाईट, फायबर स्ट्रेचर्स, वॉच टॉवर्स व वॉच टॉवर केबीन इत्यादी साधनसामग्री खरेदी करण्यासाठी रुपये २१६.७० लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. समुद्र किनाऱ्यांवरील पर्यटकांच्या सुरक्षा व्यवस्थेसंदर्भात मा.मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल असून ती न्यायप्रविष्ट आहे.

-----------------

## औरंगाबाद शहरातील अंगणवाडयांना स्वत:च्या इमारती उपलब्ध करण्याबाबत

**(६४) * ३२१६७ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक २८८८३ ला दिनांक ९ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरात प्रकल्प क्र.१, २ व ३ अंतर्गत ३२३ अंगणवाडया कार्यरत असून त्यापैकी २२३ अंगणवाडया भाडयाच्या जागेत चालविल्या जातात, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, २२३ अंगणवाडया भाडयाच्या जागेत चालत असल्याने तेथे कोणत्याच सोयी सुविधा नसून त्यास प्रतिमहा फक्त रुपये ७००/- भाडे दिले जाते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने उपरोक्त सर्व अंगणवाडयांना स्वत:च्या मालकीच्या इमारती उपलब्ध करुन देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर अंगणवाडयांना सोयी सुविधा उपलब्ध आहेत व त्यांना भाडयापोटी दरमहा रुपये ७५०/- प्रमाणे रक्कम अदा करण्यात येते.
(३) सदरील अंगणवाडयांना स्वत:च्या मालकीच्या इमारती उपलब्ध होण्यासाठी अंगणवाडी ज्या महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रात कार्यरत आहेत त्यांचेकडून इमारती बांधण्यासाठी जागा उपलब्ध होण्यासाठी पाठपुरावा करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**येवला (जि.नाशिक) येथे विद्यार्थी आणि विद्यार्थीनींकरिता स्वतंत्र वसतिगृहे बांधण्याबाबत**

**(६५) * ३०९४४ श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) येवला (जि.नाशिक) येथे विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थी आणि विद्यार्थीनींकरिता स्वतंत्र वसतिगृहे बांधण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १२ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) प्रस्तुत प्रकरणी क्षेत्रिय कार्यालयाकडून अहवाल मागविण्यात आला आहे.

-----------------

**मोखाडा (जि.पालघर) येथील डोल्हारा साठवण तलावाचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(६६) * ३३६५२ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे डोल्हारा (ता.मोखाडा, जि.पालघर) येथील साठवण तलावाचे काम शासनाच्या अनास्थेमुळे अनेक वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू डोल्हारा साठवण तलावाचे काम त्वरित चालू करावे व पाण्याची अडचण दूर करावी यासाठी डोल्हारा ग्रामस्थांनी आंदोलन सुरु केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर तलावाचे कामास निधी उपलब्ध करुन काम सुरु करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

डोल्हारा ग्रामस्थांनी काम लवकर पूर्ण व्हावे यासाठी आंदोलन केले होते.

(३) निधी उपलब्धतेबाबत अडचण नाही, सांडवा संकल्पन व काटच्छेद संकल्पनाची सक्षम स्तरावर मंजुरी मिळणे बाकी होते. त्यामुळे सदर काम बंद स्थितीमध्ये होते. सद्यस्थितीमध्ये सांडवा संकल्पन व काटच्छेद संकल्पन प्राप्त झाले असून, सांडवा संकल्पनास मुख्य अभियंता यांनी तत्वत: मान्यता दिली आहे. सद्य:स्थितीमध्ये सांडवा खोदाईचे काम सुरु करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विदर्भातील प्रकल्पांना केंद्र शासनाकडून एआयबीपी योजनेंतर्गत आर्थिक मदत देण्याबाबत**

**(६७) * ३२९०९ श्री.प्रकाश गजभिये : तारांकित प्रश्न क्रमांक १५३८४ ला दिनांक ११ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील गोसीखुर्द प्रकल्प, निम्न वर्धा, बावनथडी, डोंगरगाव, निम्न पेढी, बेंबळा, उर्ध्व पैनगंगा व खडकपूर्णा या प्रकल्पांना केंद्र शासनाकडून एआयबीपी योजनेंतर्गत किती आर्थिक मदत देण्यात आली आहे,

(२) अद्याप मदत दिली नसल्यास त्याची कारणे काय आहेत,
(३) तसेच या प्रकल्पांना केंद्र शासनाकडून मिळणारी मदत मिळविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) पूर्णत्वाच्या प्रगत अवस्थेतील निवडलेले पाटबंधारे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी केंद्र शासन सन-१९९६ पासून वेगवर्धीत सिंचन लाभ कार्यक्रमांतर्गत (AIBP) केंद्रीय कर्जसहाय्य/अर्थसहाय्य देत आहे.

अेआयबीपी योजनेत समाविष्ट खालील प्रकल्पांना सन-१९९६ ते मार्च-२०१७ या कालावधीत प्राप्त झालेले एकूण केंद्रीय अर्थसहाय्य याप्रमाणे आहे.

रुपये कोटीत

| | प्रकल्प | सन १९९६ ते मार्च-२०१७ पर्यंत प्राप्त केंद्रीय अर्थसहाय्य |
|---|---|---|
| १ | गोसीखुर्द प्रकल्प | २,९८७.९४ |
| २ | निम्न वर्धा | ३५४.५४ |
| ३ | बावनथडी | १७८.१९ |
| ४ | डोंगरगाव | २१.५९ |
| ५ | निम्नपेढी | २२३.६० |
| ६ | बेंबळा | ७४५.२३ |
| ७ | उर्ध्व पैनगंगा | ३४६.१६ |
| ८ | खडकपूर्णा | ५७७.०६ |
| | एकूण | ५,४३४.३१ |

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) केंद्र शासनाकडून एआयबीपी योजनेंतर्गत आर्थिक मदत मिळण्यासाठी दरवर्षी सलगता प्रस्ताव सादर करण्यात येतो. सलगता प्रस्तावात मागणी केलेला निधी प्राप्त होणेसाठी केंद्रीय जल आयोग व केंद्रीय जलसंसाधन विभागाच्या कार्यालयात पाठपुरावा करण्यात येतो.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### औरंगाबाद येथील घाटी शासकीय रुग्णालयातील उपकरणे बंद असल्याबाबत

**(६८) * ३२४०३ श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील घाटी शासकीय रुग्णालयातील क्ष-किरण (रेडिऑलॉजी) एमआरआय, सिटी स्कॅन, मॅमोग्राफी ही महत्वाची उपकरणे माहे एप्रिल, २०१७ पासून बंद आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उपकरणे बंद असल्यामुळे रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे गरीब रुग्णांना बाहेरुन क्ष-किरण व सिटी स्कॅन करावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे अंशत: खरे आहे.

प्रश्नात नमूद केलेल्या उपकरणांपैकी फक्त ६-स्लाईस सी.टी. स्कॅन यंत्राची सी.टी. टयूब निकामी झाल्याने दिनांक २०/०५/२०१७ पासून बंद आहे. तथापि आता शासनस्तरावरुन सी.टी. टयूब खरेदीस मान्यता दिली असून खरेदी प्रक्रिया पूर्ण होताच मशीन सुरु करण्यात येईल.

(२) हे खरे नाही.

विभागामध्ये उपलब्ध असलेल्या अन्य अत्याधुनिक ६४-स्लाईस सी.टी. स्कॅन यंत्राच्या व इतर उपकरणांच्या साहाय्याने रुग्ण चाचण्या सुरु आहेत.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### नंदुरबार तालुक्यातील अमरावती नदीचे पाणी बलदाने येथील एम.आय.टँकमध्ये टाकण्याबाबत

**(६९) * ३२९८० श्री.चंद्रकांत रघुवंशी : तारांकित प्रश्न क्रमांक ३०५७६ ला दिनांक ३० मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार तालुक्यातील अमरावती नदीचे पाणी बलदाने येथील एम.आय.टँक मध्ये टाकावे अशी मागणी शेतक-यांनी अनेक वर्षापासून करुनही अद्‌याप याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतक-यांच्या या मागणीबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कांदिवली (मुंबई) येथील कांदळवन जमिनीवर अतिक्रमण झाल्याबाबत**

**(७०) * ३३७८९ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कांदिवली (मुंबई) येथील कांदळवन जमिनीवर अतिक्रमण करुन उभारलेल्या ३०० घरांवर वनविभागाने बुलडोझर फिरवून वस्ती जमिनदोस्त केल्याने तेथील रहिवाशांवर भर उन्हात उघडयावर राहण्याची वेळ आल्याचे दिनांक २६ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू वस्ती किमान १० ते १५ वर्षापूर्वीपासून तेथे अस्तित्वात असून वनविभागाने व महानगरपालिकेने दुर्लक्ष केल्याने इथे प्रस्थापित झालेले निवासी व अनिवासी नागरिक बेघर झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बेघर झालेल्या रहिवाशांना घरे मिळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) मौजे कांदिवली मधील वन विभागाच्या ताब्यातील भारतीय वन अधिनियम, १९२७ चे कलम ४ अंतर्गत “राखीव वने” म्हणून अधिसूचित झालेल्या सर्वे क्र. १४९, न.भु.क्र. १/ब मधील वन क्षेत्रात २१६ अनधिकृत अतिक्रमणे (३० व्यापारी गाळे व १८६ रहिवाशी झोपड्या) निदर्शनास आले होते. सदर अतिक्रमकांना महाराष्ट्र महसूल संहिता, १९६६ च्या कलम ५३ व ५४ अंतर्गत नोटीसा देऊन त्यांच्या सुनावण्या घेण्यात आल्या होत्या. सुनावणी अंती अनधिकृत अतिक्रमणाविरुध्द दिनांक २४/४/२०१७ रोजी कारवाई करण्यात आलेली आहे.

(३) मा.उच्च न्यायालयाने कांदळवन व कांदळवनापासून ५० मीटर अंतरावर बांधकाम प्रतिबंधित केलेले आहे. त्यानुषंगाने वनक्षेत्रावरील अतिक्रमण निष्कासनाची झालेली कारवाई ही कायदेशीर असून अनधिकृत अतिक्रमण धारकांसाठी कोणत्याही प्रकारच्या पुनर्वसनाच्या तरतूदी नाहीत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सिंधुदुर्ग जिल्हयातील माकडतापाचा प्रादुर्भाव रोखण्याबाबत

**(७१) * ३०९१९ श्री.नारायण राणे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावंतवाडी व दोडामार्ग तालुक्यात (जि.सिंधुदुर्ग) माकडतापाने गतवर्षीपेक्षा दुप्पट म्हणजे १२ रुग्णांचा मृत्यू झाला असून ८० रुग्ण या साथीने बाधित असल्याचे दिनांक १८ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच सटमटवाडी बांदा (जि.सिंधुदुर्ग) येथे माकडतापाच्या साथीने मृत्यूमुखी पडलेल्या सात रुग्णांच्या नातेवाईकास विशेष बाब म्हणून प्रत्येकी दोन लाख रुपयांचे अर्थसहाय्य दिले जाणार असल्याचे पालकमंत्री यांनी सांगितल्याचे दिनांक ११ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सिंधुदुर्ग जिल्हयात मागील ३ वर्षापासून माकडतापाने स्थानिकांचे बळी जात असूनही माकडतापाची लागण रोखण्यास स्थानिक आरोग्य विभागाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सिंधुदुर्ग जिल्हयातील माकडतापाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी कोणती प्रतिबंधात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच मृत्यू व बाधित रुग्णांच्या कुटुंबास कोणती आर्थिक मदत देण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.दीपक सावंत :** (१) होय, हे खरे आहे.

सिंधुदुर्ग जिल्हयातील सावंतवाडी व दोडामार्ग तालुक्यात माकडतापाचे (केएफडी) दिनांक १८ मे, २०१७ अखेर १९२ एवढे रुग्ण केएफडी बाधित आढळले असून त्यापैकी १२ व्यक्तींचा मृत्यू झाला आहे. उर्वरीत सर्व रुग्ण उपचाराअंती पूर्ण बरे झाले आहेत.

(२) हे अंशत: खरे आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये सन २०१७ मध्ये केएफडीच्या आजाराने मृत्यूमुखी पडलेल्या १२ पैकी १० रुग्णांच्या नातेवाईकांस विशेष बाब म्हणून प्रत्येकी एक लाख रुपयांचे अर्थसहाय्य मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत देण्यात आले आहेत.

(३) नाही, हे खरे नाही.

सिंधुदुर्ग जिल्हयात सन २०१६ पासून केएफडी या रोगाचा प्रादुर्भाव सुरु झाल्यापासून स्थानिक आरोग्य विभागाने तातडीने वरिष्ठ कार्यालयाच्या मार्गदर्शन व सहकार्याने शिमोगा, कर्नाटक येथील केएफडी साथ नियंत्रण पथकाशी समन्वय ठेवून सदर साथग्रस्त भागात आवश्यक त्या प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविलेल्या आहेत. रुग्णांचे जलद सर्वेक्षण तसेच रुग्णांचे निदान करणेसाठी मणिपाल विषाणू केंद्रामार्फत तपासणी व दुषित आढळून आलेल्या रुग्णांना आवश्यकतेनुसार उपचार त्वरीत सुरु करणेत आले आहेत. तसेच मंत्री, सार्वजनिक आरोग्य, संचालक, सहसंचालक, आरोग्य सेवा व अन्य वरिष्ठ अधिकारी यांनी सिंधुदुर्गातील साथग्रस्त भागास वेळोवेळी भेटी देऊन मार्गदर्शन केलेले असून, साथीच्या नियंत्रणासाठी कटाक्षाने लक्ष पुरविलेले आहे.

(४) सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये सावंतवाडी व दोडामार्ग या केएफडी बाधित भागात आरोग्य विभागामार्फत नियमित ताप रुग्ण सर्व्हेक्षण सुरु असून, जलद सर्वेक्षण तसेच रुग्णांचे निदान करण्यासाठी मणिपाल विषाणू केंद्रामार्फत तपासणी व दुषित आढळून आलेल्या रुग्णांना आवश्यकतेनुसार उपचार त्वरीत सुरु करण्यात आले आहेत. प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून बाधित भागात मॅलेथिऑन पावडर डस्टींग करण्यात आलेले आहे. तसेच जंगलात/शेतात काम करणाऱ्या व्यक्तींना शरीरावर लावणेकरीता डीएमपी ऑईल देण्यात आलेले आहे. या आजाराबाबत लोकांना स्लाईड शो, हस्तपत्रिका व घरभेटीद्वारे माहिती देण्यात येते. संदर्भसेवेकरिता गोवा मेडीकल कॉलेज येथे पाठविण्यात येणाऱ्या रुग्णांसाठी गोवा मेडीकल कॉलेज येथे संदर्भसेवा कक्ष स्थापन करण्यात आलेला आहे. रुग्णांना त्वरीत आरोग्य सेवा मिळावी म्हणून बांदा, सटमटवाडी येथे वैद्यकीय उपचार केंद्र सुरु करण्यात आलेले आहे.

बाधित भाग तसेच त्यालगतच्या भागातील जोखीमग्रस्त लोकांना केएफडी प्रतिबंधात्मक लसीकरण करण्यात आले आहे. या आजाराच्या उपचारासाठी आवश्यक औषधसाठा पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहे.

सन २०१६ मध्ये केएफडी आजाराने मृत पावलेल्या ७, तर सन २०१७ मधील १२ मृत रुग्णांपैकी १० रुग्णांच्या नातेवाईकांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून प्रत्येकी १ लाख रुपयाचे आर्थिक सहाय्य देण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**गोंदिया जिल्हा परिषदेंतर्गत अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या विद्यार्थीनीना सायकल वाटप करण्याबाबत**

**(७२) * ३११०६ प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.मितेश भांगडिया, श्री.गिरीशचंद्र व्यास** : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्हा परिषदेंतर्गत शासनाने मानव विकास कार्यक्रम व महिला आणि बालकल्याण विभागांतर्गत जिल्हा परिषदेच्या माध्यमातून अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या विद्यार्थीनींना मागील एक वर्षापासून सायकलचे वाटप झाले नसल्याचे दिनांक १३ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी करुन गरजू व वंचित विद्यार्थीनींना सायकलचे वाटप करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे** : (१), (२) व (३) प्रकल्पस्तरावरुन प्राप्त झालेल्या लाभार्थ्यांच्या याद्या विषय समिती पुढे मंजूर न झाल्यामुळे स्थायी समिती सभा दिनांक १७/२/२०१७ रोजी अतिरिक्त विषय क्र.४/१ नुसार याद्या मंजूर झालेल्या आहेत.

गरजू व वंचित विद्यार्थीनीना सायकलचे वाटप दिनांक १०/३/२०१७ ते दिनांक २५/०४/२०१७ या कालावधीत करण्यात आले आहे.

----------------

**औरंगाबाद जिल्हयातील रोजगार हमी योजनेतून मंजुर झालेल्या विहिरींबाबत**

**(७३) * ३१३९८ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, ॲड.राहुल नार्वेकर, श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयात रोजगार हमी योजनेतून मंजुर झालेल्या ३५६१ विहिरीचे काम ७ वर्षापासून प्रलंबित असून ५६२ मंजुर विहिरीचे काम सुरु झालेले नसल्याने त्याची चौकशी करण्यासाठी लोकप्रतिनिधीनी दिनांक १४ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.रोजगार हमी मंत्री यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदन संदर्भीय वृत्तांमध्ये दिलेल्या तक्रारीचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) हे खरे आहे.

(२) वैयक्तिक सिंचन विहिरींना प्रशासकीय मान्यता देतांना आर्थिक अनियमितता झाल्याबाबत तक्रार करण्यात आली आहे.

(३) अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद औरंगाबाद यांनी सदर प्रकरणी चौकशी करुन चौकशीचा अहवाल विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना दिनांक १६/६/२०१७ रोजी सादर केला आहे. चौकशी अहवालाच्या अनुषंगाने विभागीय आयुक्तांकडुन प्राप्त होणाऱ्या निष्कर्षाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शीबदरा (ता.हिमायत नगर, जि.नांदेड) येथील खिचडीत अळया निघाल्याबाबत**

**(७४) * ३३३५६ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शीबदरा (ता.हिमायत नगर, जि.नांदेड) येथील अंगणवाडीमार्फत मुलांना दिल्या जाणाऱ्या खिचडीत अळया आढळल्याचे दिनांक २९ मे २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आश्रमशाळेत यापूर्वीही अन्नात (मुलांच्या खाऊत) अळया आढळून आल्या होत्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) चौकशी करण्यात आली असून घटनेची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून संबंधित अंगणवाडी सेविकांना सक्त ताकीद देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परळी तालुक्यात (जि.बीड) जलयुक्त शिवार योजनेंतर्गत करण्यात आलेली कामे बोगस असल्याबाबत

**(७५) * ३०८८७ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, ॲड.निरंजन डावखरे,** श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त : सन्माननीय जलसंधारण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हयात जलयुक्त शिवार योजनेत १५ कोटी रुपयांची कामे ही कागदोपत्री करण्यात आली असून परळी तालुक्यात १० कोटींच्या बोगस कामांचा समावेश असल्याचे दिनांक ३१ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असून याच्या तक्रारी शेतकऱ्यांनी कृषी आयुक्तांकडे केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी स्थानिक शेतक-यांनी माहितीच्या अधिकारात सर्व तपशील मिळवून बीडचे तत्कालीन जिल्हाधिकारी, नवलकिशोर राम यांच्याकडे एप्रिल महिन्यात परळी तालुक्यातील हाळंब, हेळंब, खोडवा, सावरगाव, धर्मापुरी गावातील जलयुक्त शिवार योजनेच्या बोगस कामांची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी केली होती, हे ही खरे आहे,

(३) असल्यास, सदर कामे करताना कृषी अधिकाऱ्यांनी निविदेला डावलून रुपये २ लाख ९९ हजाराची कामे मनमानी पध्दतीने वाटप केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर तक्रारीनुसार कृषी आयुक्तांनी जिल्हास्तरीय चौकशी पथक नियुक्त करण्याचे आदेश दिले आहेत काय, चौकशी पथकाच्या अहवालानुसार शासनाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.राम शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) होय, हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) प्रस्तुत तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, बीड यांचे सूचनेनूसार जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, बीड यांनी दोन चौकशी पथकाची नियुक्ती केली आहे. या चौकशी पथकाच्या अहवालानूसार प्रस्तुत प्रकरणातील संबंधित ०४ दोषी कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे. तसेच कंपाटमेंट बंडींगच्या कामात आढळून आलेल्या तफावतीच्या वसुलपात्र रक्कमेची वसुली करण्याबाबतची नोटीस संबंधितांना देण्यात आल्या आहेत.

तसेच याप्रकरणी जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांचेविरूद्ध शिस्तभंगविषयक कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पनवेल तालुक्यातील २३ ग्रामपंचायतींच्या कर्मचाऱ्यांचे वेतन प्रलंबित असल्याबाबत**

**(७६) * ३१५७७ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवनिर्वाचित पनवेल महानगरपालिकेत पनवेल तालुक्यातील २३ ग्रामपंचायतींचे विलिनीकरण करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या २३ ग्रामपंचायतीमधील कर्मचाऱ्यांना मागील ६ महिन्यांपासून वेतनापासून वंचित ठेवण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कर्मचाऱ्यांना वेतन अदा न करण्याची कारणे काय आहेत व त्यांना तात्काळ ६ महिन्यांचे वेतन अदा करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.
(२) पनवेल महानगरपालिकने २३ ग्रामपंचायतीमधील कर्मचाऱ्यांना दिनांक ०१/१०/२०१६ ते दिनांक ३१/०३/२०१७ अखेर पर्यंतचे वेतन दिनांक १९/०४/२०१७ रोजी अदा केले आहे.

(३) व (४) दिनांक २६/०९/२०१६ रोजीच्या शासन अधिसूचनेद्वारे दिनांक ०१/१०/२०१६ पासून पनवेल महानगरपालिका नव्याने स्थापन करण्यात आली आहे.

पनवेल महानगरपालिकेमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या २९ गावांच्या २३ ग्रामपंचायतींमधील सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांचे समावेशन करण्यासाठी धोरण निश्चित करण्याकरीता दिनांक २७/०२/२०१७ च्या शासन परिपत्रकाद्वारे विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखालील समिती गठीत करण्यात आली आहे.

-----------------

**तिलारी धरण (ता.दोडामार्ग, जि.सिंधुदुर्ग) येथील परिसरात जंगली हत्तींच्या कळपाने शेतकऱ्यांच्या बागायतींचे नुकसान केल्याबाबत**

**(७७) * ३२४८७ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिलारी धरण (ता.दोडामार्ग, जि.सिंधुदुर्ग) परिसरात जंगली हत्तींनी हेवाळे-बाबरवाडीत धुडघूस घालून दोन तासात बाग नष्ट करुन, सुपारीची २०७ झाडे जमीनदोस्त केल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी वन खात्याकडे बागायतदारांनी तक्रार करुनही कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, या परिसरात हत्तींना रोखण्यासाठी टोकदार खिळयांच्या भिंती उभारण्याचा प्रस्ताव शासनास सादर करावा यासाठी पालकमंत्री यांनी दोडामार्ग, वनक्षेत्रपाल यांना आदेश दिल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे काय व त्यावर शासनाने मंजूरी व निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, तद्नुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत तसेच हत्तींचा बंदोबस्त करण्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) दोडामार्ग वनपरिक्षेत्रामध्ये तिलारी धरण परिसरात हेवाळे, बाबरवाडी येथे मे, २०१७ मध्ये वन्यहत्तीने शेतपिकांचे/ बागायतींचे नुकसान केल्याच्या १५ घटना निदर्शनास आल्या असून त्यामध्ये नारळ-४०, सुपारी-६८, केळी-१०५४ व काजू-५ झाडांचे नुकसान झालेले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) हत्तींना रोखण्यासाठी मौजे हेवाळे, स. क्र. ७८ मध्ये ३०० मी लांबीची टोकदार खिळ्यांची भिंत बांधण्याचे रु. २३,७४,२८०/- चे अंदाजपत्रक वनक्षेत्रपाल, दोडामार्ग यांनी तयार करुन तांत्रिक मंजूरीसाठी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सांवतवाडी यांना सादर केले असून जिल्हा नियोजन मंडळाकडून प्रशासकीय मान्यता व निधी प्राप्त करुन घेणेचे दृष्टीने पुढील आवश्यक कार्यवाही उप वनसंरक्षक, सावंतवाडी यांचे स्तरावर सूरु आहे.

(५) वन्यहत्तीनी नुकसान केलेल्या ६८ सुपारीच्या झाडांच्या नुकसानीच्या प्रकरणात प्रचलित शासन निर्णयातील तरतूदींच्या अनुषंगाने संबंधित शेतकऱ्यास रुपये १,२९,२००/- इतक्या नुकसान भरपाईचे वाटप धनादेशाद्वारे करण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सांगोला जिल्हा रुग्णालय (जि.सोलापूर) येथे वैद्यकीय अधिक्षक पदासह विविध संवर्गातील पदे रिक्त असल्याबाबत

**(७८) * ३२४३२ श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगोला जिल्हा रुग्णालय (जि.सोलापूर) केवळ एका डॉक्टरवर सुरु असून रुग्णालयात वैद्यकीय अधिक्षक पदासह विविध संवर्गातील ११ पदे रिक्त असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रुग्णालयात सोयी सुविधा उपलब्ध असताना कर्मचाऱ्यांच्या रिक्त पदांमुळे लाखो किंमतीच्या सामुग्री विनावापर आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे येथील गरीब रुग्णांना खाजगी रुग्णालयात उपचार करुन घ्यावा लागल्याने त्यांचे आर्थिक नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रुग्णांची गैरसोय लक्षात घेऊन रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) सांगोला ग्रामीण रुग्णालयात विविध संवर्गातील एकूण मंजूर २६ पदांपैकी ९ पदे रिक्त आहेत. वैद्यकीय अधिकारी संवर्गातील २ पदे भरलेली आहेत.
(२) हे खरे नाही.

उपलब्ध अधिकारी/ कर्मचारी व इतर रुग्णालयातील प्रतिनियुक्त केलेले अधिकारी/ कर्मचारी यांचेकडून साधन सामुग्रीचा रुग्णांकरिता वापर केला जात आहे.
(३) हे खरे नाही.

या रुग्णालयात आलेल्या प्रत्येक रुग्णांना आवश्यक त्या सर्व आरोग्य सेवा पुरविण्यात येत आहेत.
(४) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (ग्रेड पे-६६००) मधील रिक्त पदे पदोन्नती/ नामनिर्देशनाने भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (ग्रेड पे-५४००) मधील नियमित वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे, जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीमार्फत मुलाखतीद्वारे भरण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर सुरु आहे.

गट-क व गट-ड संवर्गातील उपसंचालक, आरोग्य सेवा मंडळे यांच्यास्तरावर रिक्त पदे भरण्यासाठी माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये लेखी परिक्षा घेण्यात आली असून सदरहू पदे भरण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात असून लवकरच पदे भरण्यात येत आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थाच्या वाढत्या प्रसार व प्रचाराला आळा घालण्याबाबत

**(७९) * ३१७०३ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर : तारांकित प्रश्न क्रमांक २७१६३ ला दिनांक ९ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई कॅन्सर रजिस्ट्रीने केलेल्या सर्व्हेक्षणानुसार तंबाखूसह तंबाखूजन्य पदार्थाच्या वाढत्या सेवनामुळे राज्यातील ग्रामीण भागात महिलांमध्ये व तरुणांमध्ये तोंडाच्या कॅन्सरचे प्रमाण वाढल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिगारेट, तंबाखूजन्य पदार्थ आणि गुटख्याच्या सेवनावर कायदयाच्या स्वरुपात शासनाने निर्बंध घालण्याचा प्रयत्न केला तरी त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने राज्यात तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थाच्या वाढत्या प्रसार व प्रचाराला आळा घालण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) राज्यात तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थाच्या वाढत्या प्रसार व प्रचाराला आळा घालण्याकरिता शासनामार्फत खालील उपाययोजना करण्यात येत आहेत :-

* सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम हा ३४ जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येत आहे.
* सिगारेट व अन्य तंबाखूजन्य उत्पादने कायदा (COTPA), २००३ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्याचे मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय समन्वय समितीची स्थापना करण्यात आली आहे.
* जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समन्वयक समिती स्थापन करण्यात आल्या आहेत.
* जिल्हास्तरीय समन्वयक समितीने स्थापन केलेल्या तंबाखू विरोधी पथकामार्फत COTPA कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कार्यवाही करुन दंड वसूल करण्यात येतो.
* राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत तंबाखू मुक्त शाळा व संस्था अभियान राबविले जाते.

* जनजागृतीसाठी विविध प्रकारचे उपक्रम (उदा. रेडीओ जिंगल्स, दूरदर्शन वरील कार्यक्रम इ.) करण्यात येतात.
* कर्करोगाचे वेळेत निदान व उपचार होण्यासाठी कर्करोग तपासणी शिबीरे घेण्यात येतात.
* प्रत्येक जिल्हा रुग्णालय व उपजिल्हा रुग्णालयात तंबाखू मुक्ती केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील घरकुल योजनेतील लाभार्थ्यांची जनधन खात्यातून अनुदान काढताना गैरसोय होत असल्याबाबत

**(८०) * ३२४९७ श्री.जयंत पाटील, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मोलमजूरी करणारे व आर्थिकदृष्ट्या सक्षम नसणाऱ्या नागरिकांना केंद्र शासनाने सुरू केलेल्या जनधन योजनेचे खाते शासकीय बँकेत उघडण्यात आले असून या जनधन खात्यातून महिन्याला फक्त रुपये १० हजार काढण्याची मुभा आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने आर्थिकस्तर कमी असलेले बहुजन समाज व आदिवासी समाजातील घटकांना घरकुल योजनेतून रमाई आवास योजना, शबरी व आदिम या योजनांचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांना शासनाकडून रुपये १ लाख २० हजाराचे अनुदान दिले जाते आणि हे अनुदान लाभार्थ्यांच्या जनधन खात्यात जमा करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, जनधन खात्यात महिन्यातून फक्त रूपये १० हजार काढण्याची मुभा असल्यामुळे घरकुल योजनेंतर्गत आलेले अनुदान काढताना लाभार्थ्यांना अनेक अडचणी येत असून पैसे असूनही घराचे काम पूर्ण करता येत नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) होय.

योजनांच्या ऑनलाईन नोंदणीसाठी व अनुदान जमा करण्यासाठी लाभार्थी जो बँक खाते क्रमांक उपलब्ध करुन देतात अशा खात्यामध्ये निधी वर्ग करण्यात येतो. लाभार्थ्याने जन धन योजनेअंतर्गतचा खाते क्रमांक दिला असल्यास अशा खात्यामध्ये निधी जमा होतो.

(३) होय.

(४) सदर प्रकरणी यापूर्वी कागदपत्रांच्या पडताळणीअभावी उघडलेली जनधन योजनेंतर्गतची खाती लाभार्थ्यांकडून आवश्यक कागदपत्रांची तसेच KYC पूर्तता करुन सामान्य खात्यांमध्ये रुपांतरीत करण्याबाबतच्या सूचना जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणांना तसेच बँकर्स मिटींगमध्ये बँकांना देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नाशिक व अहमदनगर वन विभागात वन्यप्राण्यांचे मृत्यू होत असल्याबाबत**

**(८१) * ३२०७२ डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक व अहमदनगर वन विभागात गेल्या दोन वर्षात मानवी चुका आणि अन्य कारणांमुळे सुमारे ३०८ वन्य प्राण्यांचा मृत्यू झाल्याचे दिनांक २५ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रस्ते अपघातात ८९, विहीरीत पडून ४१, वीजेच्या धक्क्याने १४, उपासमारीने ५ आणि अन्य कारणाने १५९ अशा एकुण ३०८ वन्य प्राण्यांचा सन २०१५-२०१६ तसेच २०१६-२०१७ या दोन वर्षात मृत्यू झाला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वरीलप्रमाणे दोन वर्षात मृत झालेल्या प्राण्यांमध्ये सर्वाधिक ९५ बिबट्यांचे मृत्यू झाले असून त्याखालोखाल हरीण, काळवीट, तरस, चिंकारा, मोर यांचे सर्वाधिक मृत्यू झाले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पर्यावरण बचाव व वन्य प्राण्यांचे संरक्षण या बाबी ह्या विभागात केवळ कागदोपत्री असून प्रत्यक्षात वन्य प्राण्यांसाठी आवश्यक व्यवस्था करण्यात आलेली नसल्याने सदर प्राण्यांचे मृत्यू झालेले आहेत, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) नाशिक व अहमदनगर या जिल्ह्याचा नाशिक वनवृत्तात समावेश होतो. सन २०१५-१६ व सन २०१६-१७ या दोन वर्षाच्या कालावधीत रस्ता अपघातात-७९, विहिरीत पडून-५७, विजेच्या धक्क्याने-१४, उपासमारीने-२ व अन्य कारणाने-१६९ असे एकूण ३२१ वन्यप्राण्यांचा मृत्यू झाला आहे.

(३) सन २०१५-१६ व सन २०१६-१७ या दोन वर्षाच्या कालावधीत बिबट-१०४, हरीण-७३, काळवीट-६२, चिंकारा-७, तरस-११, मोर-४१ व इतर वन्यप्राणी-२३ अशा एकूण ३२१ वन्यप्राण्यांचा मृत्यू झाला आहे.

(४) हे खरे नाही.

वन्यप्राण्यांचे होणारे मृत्यू रोखण्याच्यादृष्टीने क्षेत्रियस्तरावर खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

- नाशिक वनवृत्तातील ५ उपवनविभागात रेस्क्यु पथके निर्माण करण्यात आलेली आहेत.
- पथकातील कर्मचाऱ्यांना विशेष प्रशिक्षण देण्यात आलेले आहे.
- सदर पथकातील सदस्यांना वन्यप्राण्यास बेशुध्द करण्याकरिता विशेष ट्रॅन्क्युलायझिंग गन तसेच वन्यप्राण्यांची ओळख पटविण्याकरिता कॅमेरा ट्रप इत्यादि साहित्य उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.
- ऊस शेतीमध्ये अधिवास करणाऱ्या बिबट्यांबाबत जनजागृती अभिमान राबविण्यात आले आहे.
- वन्यप्राण्यांचे रस्ता अपघातात मृत्यू होऊ नये म्हणुन रस्त्याचे बाजुला, महत्वाच्या वळणावर सावधानतेचे फलक लावणेत आलेले आहे.
- बिबट प्रवण क्षेत्रातील गावात घडीपत्रिका वाटप करून सार्वजनिक ठिकाणी पोस्टर्स लावण्यात आले आहेत.
- जंगलामध्ये आवश्यक त्या ठिकाणी निरीक्षण मनोरे उभारण्यात आले आहेत.
- वन्यप्राण्यांच्या हालचालींचे सनियंत्रण ठेवण्याकरीता कॅमेरा ट्रॅप, जीपीएसचा वापर केला जातो.
- संरक्षित क्षेत्रातील नैसर्गिक पाणवठे, कृत्रिम पाणवठ्याची वन कर्मचाऱ्यामार्फत नियमित तपासणी करण्यात येते.
- शिकाऱ्यांबाबत गोपनियरित्या माहिती संकलित करण्यात येते.
- सन २०१५-१६ व २०१६-१७ या दोन वर्षाच्या कालावधीत नाशिक वनवृत्तामध्ये विविध योजनेतुन उपलब्ध अनुदानातून वन्यप्राण्यांना वनक्षेत्रातच पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे म्हणून एकूण २६८३ वनतळे /वनबंधारे /सिमेंट बंधारे/पाणवठे इत्यादी कामे करण्यात आली आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील महिला कर्मचाऱ्यांना बालसंगोपन रजा व पुरुष कर्मचाऱ्यांना पॅटर्निटी लिव्ह देण्याबाबत

**(८२) * ३२२७२ श्री.कपिल पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक २९२२८ ला दिनांक ९ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या सेवेतील व स्थानिक स्वराज्य संस्थांमधील महिला कर्मचारी व अधिकारी तसेच अनुदानित शाळा, महाविद्यालयातील महिला शिक्षक व शिक्षकेतर यांना बालसंगोपनासाठी दोन वर्षापर्यंत केंद्राप्रमाणे भरपगारी रजा, लहान बाळांच्या स्तनपानासाठी व्यवस्था आणि पुरुष कर्मचाऱ्यांना पॅटर्निटी लिव्ह देण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन आहे काय,

(२) असल्यास, त्याबाबतचे स्वरुप आणि सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार** : (१) व (२) होय, बालसंगोपन रजा व पुरुष कर्मचाऱ्यांना पॅटर्निटी लिव्ह देण्याबाबतची बाब विचाराधीन असून योग्य तो निर्णय घेतला जाईल.

लहान बाळांच्या स्तनपानासाठी व्यवस्थेसाठी मागणी आल्यास सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत कार्यवाही करण्यात येते.

-----------------

## परभणी जिल्हयातील ग्रामपंचायतीमधील अधिकारी व ग्रामसेवक यांनी लेखापरिक्षण न करता गैरप्रकार केल्याबाबत

**(८३) * ३३८६४ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : तारांकित प्रश्न क्रमांक २७६३५ ला दिनांक ६ एप्रिल, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हयातील ग्रामपंचायतींनी लेखा परिक्षण करून न घेणे व इतर गैरप्रकार केल्याने त्यांच्याविरूध्द लेखा परिक्षा कायदा, १९३० मधील तरतूदीनुसार जिल्हयातील १६५ ग्रामसेवकांना दंड आकारून त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याबाबतचे आदेश मा. ग्रामविकास मंत्री यांनी दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित ग्रामसेवकाकडून दंड वसूल करुन त्यांच्यावर शिस्तभंगाची कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे.

शासन परिपत्रक ग्रामविकास विभागाच्या दिनांक २९ ऑक्टोबर, २०१३ अन्वये लेखा परिक्षणास अभिलेखे उपलब्ध न केल्यास रुपये २५०००/- दंडात्मक कार्यवाही करणे तसेच दिनांक १८ नोव्हेंबर, २०१४ च्या परिपत्रकामध्ये दिलेल्या सूचनेनुसार अभिलेखे उपलब्ध करून न देणाऱ्या संबंधित ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी व पर्यवेक्षकीय अधिकारी यांचेविरूध्द शिस्तभंग विषयक कार्यवाही करणे बाबतचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांनी निर्देश दिले आहेत. मा.मंत्री (ग्रामविकास) यांनी आदेश दिलेले नाहीत.

(२) व (३) जिल्ह्यातील ग्रामपंचायत अभिलेखे लेखा परिक्षणास उपलब्ध न करून दिलेल्या १६५ ग्रामपंचायतीचे ग्राम विकास अधिकारी व ग्रामसेवक यांना दिनांक ६ मार्च, २०१७ च्या पत्रान्वये त्यांचेविरूध्द दंडात्मक व शिस्तभंग विषयक कारवाई का करण्यात येऊ नये ? याबाबत कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली आहे.

तसेच, दिनांक ६ जुलै, २०१७ अन्वये प्रकरणात सर्व गट विकास अधिकारी यांना प्रलंबित ग्रामपंचायतीचे अभिलेखे अद्याप ही लेखापरिक्षणास सादर न केलेल्या जबाबदार ग्रामविकास अधिकारी व ग्रामसेवक यांचेविरुध्द रुपये २५०००/- दंडात्मक कार्यवाही करणेसाठी प्रस्ताव सादर करणेबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

-----------------

## राज्यातील १४ दुष्काळग्रस्त जिल्ह्यांसाठी केंद्र शासनाकडे विशेष पॅकेजची मागणी करण्याबाबत

**(८४) * ३१३१२ आर्कि.अनंत गाडगीळ, डॉ.अपूर्व हिरे, श्री.अमरनाथ राजूरकर : तारांकित प्रश्न क्रमांक २७७६३ ला दिनांक ६ एप्रिल, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दुष्काळग्रस्त १४ जिल्ह्यांसाठी तसेच आत्महत्याग्रस्त व अवर्षणप्रवण जिल्ह्यातील प्रलंबित सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी रुपये १०६८७ कोटी रुपयांचा निधी मिळणेबाबत राज्य शासनाकडून केंद्र शासनाकडे करण्यात आलेल्या विनंतीस अनुसरुन सदरहू निधी प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पॅकेजमध्ये प्रामुख्याने मराठवाडा आणि विदर्भातील अपूर्ण सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी लागणाऱ्या दीर्घकालीन निधीचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच प्रस्तुत पॅकेजमध्ये कोणकोणत्या कामांचा अंतर्भाव आहे व या कामांची सद्य:स्थिती काय आहे,
(४) नसल्यास, सदरहू निधी केंद्र शासनाकडून लवकरात लवकर मिळण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही. विदर्भ व मराठवाड्यातील १४ आत्महत्याग्रस्त जिल्ह्यातील आणि उर्वरीत महाराष्ट्रातील अवर्षणप्रवण जिल्ह्यातील प्रकल्प/ प्रकल्प घटक पुर्ण करण्याकरीता निधी उपलब्ध करुन देण्यासाठी राज्य शासनाकडून केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. परंतू अद्याप निधी प्राप्त झालेला नाही.
(२) होय. सदर प्रस्तावात विदर्भ व मराठवाड्यातील १४ आत्महत्याग्रस्त जिल्ह्यातील १०४ प्रकल्पांचा समावेश आहे. तसेच उर्वरीत महाराष्ट्रातील अवर्षणप्रवण जिल्ह्यातील ७ प्रकल्पांचा समावेश आहे.
(३) सदर प्रस्तावात विदर्भ व मराठवाड्यातील १४ आत्महत्याग्रस्त जिल्ह्यातील १०४ प्रकल्पांचा समावेश आहे. तसेच उर्वरीत महाराष्ट्रातील अवर्षणप्रवण जिल्ह्यातील ७ प्रकल्पांचा समावेश आहे. सदर प्रकल्प बांधकामाधीन असून सदर प्रस्तावात त्यांच्या उर्वरीत कामांचा समावेश साहे.
(४) याबाबत केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. मा.मुख्यमंत्री महोदयांनी मा. पंतप्रधानांना, मा.सुश्री.उमा भारती, केंद्रीय जलसंसाधन मंत्री व मा.श्री.अरुण जेटली, केंद्रीय वित्त मंत्री यांना निधी मिळणेसाठी पत्राद्वारे विनंती केली आहे. तसेच मा.पंतप्रधान, मा.सुश्री.उमा भारती, केंद्रीय जलसंसाधन मंत्री व मा.श्री.अरुण जेटली, केंद्रीय वित्त मंत्री यांची नवी दिल्ली येथे प्रत्यक्ष भेट घेऊन सदर पॅकेज मंजुरीसाठी विनंती केली आहे. मा.जलसंपदा मंत्र्यांनी सुद्धा याबाबत पत्रान्वये व प्रत्यक्ष भेटून पाठपुरावा केला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या गावांना पाणीपुरवठा करण्याबाबत

**(८५) * ३१२५५ श्री.जगन्नाथ शिंदे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.हेमंत टकले, श्री.रविंद्र फाटक, श्री.आनंद ठाकूर, श्री.किरण पावसकर, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या २७ गावांत पाण्याचे दुर्भिक्ष असल्याने या गावांना २५ दशलक्ष आणि दिवा शहराला १० दशलक्ष लिटर अतिरिक्त पाणीपुरवठा करण्याचे आदेश मा.जलसंपदा मंत्री महोदयांनी दिनांक २ मे, २०१७ रोजीच्या बैठकीत दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०११ मध्ये दिवा शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी कोटयवधी रूपये खर्चून १५ दशलक्ष लिटर क्षमतेचे बांधण्यात आलेले दोन जलकुंभ अदयापी वापराविना पडून असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अद्यापही २७ गावांना एमआयडीसीकडून पाणीपुरवठा करण्यात न येणे, दिवा शहराला उच्च दाबाने पाणीपुरवठा होत नसणे तसेच त्याकरिता आवश्यक असलेले पंपिंग स्टेशन या परिसरामध्ये नसल्याने जलकुंभाच्या तळाला भूमिगत पाण्याच्या टाक्यांची निर्मिती करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने जबाबदार असणाऱ्या व्यक्तींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत हे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

मा. जलसंपदा मंत्री यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ०२/०५/२०१७ रोजी झालेल्या बैठकीत दिलेल्या आदेशानुसार महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळास दिनांक ०४/०५/२०१७ पासून ३५ दललि/ दिन इतके जादा पाणी जून, २०१७ पर्यंत उचलण्यास परवानगी दिलेली आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

सदरचे जलकुंभ काही कालावधीसाठी कार्यान्वित करण्यात आले होते. मात्र एम.आय.डी.सी. मार्फत होणाऱ्या पाणीपुरवठयाचा दाब कमी असल्यामुळे जलकुंभ भरण्यास अंदाजे ५ ते ६ तास इतका कालावधी लागत होता व सदरचे जलकुंभ एक ते दीड तासात रिकामे होत होते. यामुळे जलकुंभ बायपास करुन सद्य :स्थितीत पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

(३) हे खरे नाही.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत समाविष्ट झालेल्या २७ गावांना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत पूर्वी साधारण ३० ते ३५ दललि/दिन पाणीपुरवठा करण्यात येत होता.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्यात दिनांक ०९/०९/२०१६ रोजी झालेल्या बैठकीत ठरल्यानुसार २० जोडण्यांचा आकार वाढविणे, १ जोडणी स्थलांतरीत करणे व ४ नविन जोडण्यांचे काम पूर्ण झाले असून या गावांना सरासरी ५०.०० द.ल.लि./दिन प्रमाणे पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

सध्या दिवा शहराला ३९.५० दललि/दिन पाणीपुरवठा होत असून सदरचा पाणीपुरवठा समाधानकारक आहे.

दिवा शहरासाठी बांधण्यात आलेल्या जलकुंभांच्या बांधण्याच्या कामात संप (भूमिगत टाक्या) व पंप हाऊसचा समावेश नसल्यामुळे जलकुंभाच्या तळाला भूमिगत पाण्याच्या टाक्यांची निर्मिती करण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पालघर-डहाणू-विक्रमगड या तीन तालुक्यांना सुर्या प्रकल्पाचे पाणी देण्याबाबत

**(८६) * ३२६८० अॅड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धामणी व कवडास धरणांचा सुर्या प्रकल्प हा पालघर-डहाणू-विक्रमगड या तीन तालुक्यांसाठी प्रामुख्याने उभारण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सूर्या नदीचे पाणी वसई-विरार, मीरा-भाईंदर व अन्य महानगरासाठी वळविण्यास जिल्हयातील तीन तालुक्यातील शेतकऱ्यांनी विरोध दर्शविला असून दिनांक ४ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास मासवण येथे निषेधाची सभाही आयोजित करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सदर तीन तालुक्यातील गावांना सूर्या नदीचे पाणी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.
(२) होय.
(३) नाही.
सद्य:स्थितीत सूर्या प्रकल्पातील कालव्यांची आवश्यक दुरुस्ती प्रस्तावित करण्यात येत असून आदिवासी भागात सिंचनाबाबत जागृती निर्माण करुन प्रत्यक्ष सिंचन क्षेत्र वाढविणेसाठी महाराष्ट्र सिंचन पध्दतीचे शेतक-यांकडून व्यवस्थापन अधिनियम, २००५ अंतर्गत शेतकरी पाणी वापर संस्था स्थापन करणे नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात बंजारा समाजाच्या तसेच विमुक्त जाती, भटक्या जमाती समाजाच्या तांडा-वस्तीला अध्यक्ष पद देण्याबाबत**

**(८७) * ३१०६८ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात बंजारा समाजाच्या तसेच विमुक्त जाती, भटक्या जमाती समाजाच्या तांडा- वस्तीला सर्व सोईसुविधा उपलब्ध होण्याकरिता वसंतराव नाईक तांडा सुधार योजना सुरु करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागील दोन वर्षाच्या काळामध्ये या समितीला (वाशीम जिल्हा वगळता) जिल्हानिहाय अध्यक्ष पद अजूनपर्यंत दिलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर योजना योग्य प्रकारे व आवश्यक त्याठिकाणी न राबविणे, तसेच गावे-तांडे निवडण्याचे अधिकार अधिकाऱ्यांना देण्यात येणे, यामुळे तांडे वस्तीवर अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) वसंतराव नाईक तांडा सुधार योजनेनुसार जिल्हास्तरीय तांडा समितीवर अध्यक्ष/सदस्य नियुक्त करण्याबाबतची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बाई गंगाबाई जिल्हा स्त्री रुग्णालय (जि.गोंदिया) येथे बालकांचे मृत्यू झाल्याबाबत**

**(८८) * ३३२९४ श्री.परिणय फुके, श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बाई गंगाबाई जिल्हा स्त्री रुग्णालय (जि.गोंदिया) येथे दिनांक १ एप्रिल, २०१७ ते १३ मे, २०१७ या कालावधीत एकूण ४५ बालकांचा मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रुग्णालयात डॉक्टर, परिचारिका व चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांची कमतरता तसेच उपचाराला होणारा विलंब व डॉक्टरांचा निष्काळजीपणा यामुळे सदर बालकांचा मृत्यू झाल्याचे आरोप सामाजिक कार्यकर्त्यांनी जिल्हा आरोग्य केंद्र अधिकारी, गोंदिया यांच्याकडे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश पालकमंत्री, गोंदिया यांनी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच आदिवासी महिलांमध्ये असलेले कुपोषण, सकस आहाराअभावी बालकांच्या मृत्यूस कारणीभूत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही. बाई गंगाबाई स्त्री रूग्णालय, गोंदिया या रूग्णालयामध्ये दिनांक ०१/०४/२०१७ ते दिनांक १४/०५/२०१७ या कालावधीमध्ये भरती झालेल्या एकूण १९९ नवजात बालकांपैकी १८ नवजात बालकांचा मृत्यू झालेला आहे.
(२) व (३) हे खरे नाही.

(४) हे खरे आहे.
(५) गोंदिया जिल्ह्यातील मातामृत्यू व बालमृत्यू दर कमी करण्यासाठी तसेच रोखण्यासाठी विविध उपाययोजनांद्वारे कार्यवाही करण्यासाठी जिल्हाधिकारी, गोंदिया यांनी एक त्रिसदस्यीय समिती गठीत केली आहे.

-----------------

**काळम्मावाडी धरण (ता.राधानगरी, जि.कोल्हापूर) येथे भूकंपमापक यंत्र बसविण्याबाबत**

**(८९) * ३११२४ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) काळम्मावाडी धरण (ता.राधानगरी, जि.कोल्हापूर) येथे गेल्या तीन वर्षापासून भूकंपमापन केंद्र बंद असल्याने या धरणाची सुरक्षा धोक्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नवीन भूकंपमापन यंत्रासाठीचा प्रस्ताव महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक (मेरी) यांच्याकडे एक वर्षापूर्वी पाठविला असून प्रस्ताव प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नवीन भूकंपमापक यंत्र बसविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) व (२) नाही.

धरणाची सुरक्षा धोक्यात आली नाही. तथापि, नवीन भूंकपमापक उपकरणे खरेदी करण्यासाठी संबंधित धरण विभागाने दिनांक ०९/११/२०१६ रोजी महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक (मेरी) यांच्याकडे मागणी केली आहे.
(३) राज्यातील विविध भूकंपमापन केंद्रात अद्ययावत डिजिटल पध्दतीचे भूकंपमापक यंत्रांचे विनिर्देश तसेच निविदेच्या अटी व शर्ती अद्ययावत करण्यात येत आहेत. उपकरणे खरेदीची निविदा प्रक्रिया राज्यस्तरीय समितीद्वारे पूर्ण करण्यात येवून लवकरच अद्ययावत डिजिटल पध्दतीचे भूकंपमापक उपकरणे/ यंत्र कार्यान्वित करण्याचे नियोजित आहे. त्यामध्ये काळम्मावाडी येथील उपकरणांचा देखील समावेश आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात गरजू रुग्णांसाठी जीवन अमृत सेवा योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत

**(९०) * ३०९९० श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गरजू रुग्णांना शासकीय शुल्कामध्ये इच्छित स्थळी रक्त उपलब्ध व्हावे या उद्देशाने जीवन अमृत सेवा (ब्लड ऑन कॉल) योजना सार्वजनिक आरोग्य विभागाने माहे जानेवारी, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान राज्यभरात सुरु केलेली असून १०४ या दूरध्वनी क्रमांकावर रुग्णालयांनी संपर्क साधला असता, तासभराच्या आत थेट रुग्णालयात रक्त पुरविण्याची सुविधा या योजनेंतर्गत देण्यात येणार होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेंतर्गत मुंबईत प्रस्तावित आठ रक्त साठवणूक केंद्रे अद्यापही उभारण्यात आलेली नसून उक्त योजनेची तीन वर्षे होवूनही अंमलबजावणी झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

मुंबईतील ८ रक्त साठवणूक केंद्रापैकी ४ रक्त साठवणूक केंद्र कार्यान्वित झालेली आहेत व उर्वरीत ४ केंद्र लवकरच कार्यान्वित करण्यात येत आहेत.

(३) सदरच्या योजनेची मुंबईमध्ये सर जे.जे. महानगर रक्तपेढी व इतर चार रक्तसाठवणूक केंद्रातून अंमलबजावणी करण्यात आलेली आहे व उर्वरीत चार रक्त साठवणूक केंद्र सुरु करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**ब्रम्हगव्हाण उपसा जलसिंचन योजना प्रकल्प पूर्ण करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देणेबाबत**

**(९१) * ३२१६८ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक २८८९७ ला दिनांक १६ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पैठण तालुक्यातील (जि.औरंगाबाद) ५५ गावातील पाणी टंचाईवर मात करण्यासाठी सन २००९ मध्ये रुपये २२२ कोटीची ब्रम्हगव्हाण उपसा जलसिंचन योजना मंजुर केली असून सदर योजना पूर्ण झाल्यास किमान ५५ गावांना सिंचन व पिण्यासाठी पाणी मिळणार आहे, हे खरे काय आहे,

(२) असल्यास, या योजनेवर आतापर्यंत रूपये ९७ कोटी खर्च झालेला असून अजून रुपये १५० कोटीची गरज आहे व या योजनेच्या कामासाठी सन २०१६-१७ करीता फक्त रुपये १०,००० ची तरतूद केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हा प्रकल्प पुर्ण करण्यासाठी आवश्यक असणारा निधी रूपये १५० कोटी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

ब्रम्हगव्हाण उपसा सिंचन योजनेद्वारे पैठण तालुक्यातील ५५ गावांच्या एकूण १८७८७ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ होणार आहे.

(२) सदर योजनेची अद्ययावत किंमत रुपये ५२१.१३ कोटी असून, जून, २०१७ अखेर रुपये १३०.५३ कोटी खर्च झाला आहे व उर्वरीत किंमत रुपये ३९०.६० कोटी इतकी आहे.

योजनेच्या कामासाठी सन २०१६-१७ मध्ये रुपये १०, ००० ची तरतूद मंजूर होती. तथापी, प्रत्यक्षात रुपये ३.५२ कोटी निधी उपलब्ध करुन देण्यात आला. तसेच सन २०१७-१८ मध्ये रुपये ५.०० कोटी इतकी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे.

(३) व (४) राज्याच्या अर्थोपायाची स्थिती व मा.राज्यपाल महोदयांच्या निदेशानुसार मराठवाडा विभागास उपलब्ध होणारा निधी तसेच प्रकल्पाचे सद्य:स्थितीनुसार प्राधान्यक्रम विचारात घेऊन निधी उपलब्ध करुन देता येतो.

-----------------

## गंगापूर (जि.नाशिक) धरणाजवळील मेगा पर्यटन संकुलातील बोट क्लब कार्यान्वित करण्याबाबत

**(९२) * ३०९९६ श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गंगापूर (जि.नाशिक) धरणाजवळील मेगा पर्यटन संकुलातील जागतिक दर्जाच्या बोट क्लबची इमारत पूर्ण होऊनही मागील दिड वर्षापासून कोटयवधी रुपयांचा प्रकल्प वापराविनाच असून उभारण्यात आलेली प्रशासकीय इमारत, कोट्यवधी रुपयांच्या खरेदी केलेल्या विदेशी बनावटीच्या बोटी विनावापर असल्याचे दिनांक २५ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पर्यटन संकुलातील ग्रेप पार्क रिसॉर्ट, साहसी क्रीडा संकुल व कन्व्हेन्शन सेंटरच्या कामांना निधी उपलब्ध असूनही ही कामे अद्याप पूर्ण करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) होय.

(२), (३) व (४) होय. नाशिक जिल्ह्यातील गंगापूर येथील पर्यटन संकुलातील ग्रेप पार्क रिसॉर्टचे काम ऑक्टोबर, २०१७ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. साहसी क्रिडा संकुलाचे काम नोव्हेंबर, २०१७ अखेर पूर्ण होणे अपेक्षित आहे. कन्व्हेन्शन सेंटर उभारण्याबाबत, केंद्र शासनाने मान्यता दिली होती. परंतु, केंद्र शासनाने योजना बंद केल्यामुळे या कामांसाठी राज्य शासनाकडे निधी मिळण्याबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने सादर केलेला असून तो विचाराधीन आहे.

-----------------

### औरंगाबाद जिल्हयात शिक्षकांच्या बदल्या शासन निकषानुसार करण्याबाबत

**(९३) * ३२४०६ श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयात शिक्षकांच्या बदल्यांसाठी सोयीच्या शाळेतील नाव अवघड शाळा क्षेत्रात समाविष्ट करुन बदल्या करण्यात येत असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार ठरविलेल्या निकषानुसार बदल्या व्हाव्यात म्हणून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### मालनगाव (ता.साक्री, जि.धुळे) धरणातून साक्री शहरासाठी पिण्याच्या पाण्याचे आरक्षण ठेवण्याबाबत

**(९४) * ३३३९८ श्री.चंद्रकांत रघुवंशी :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालनगांव (ता.साक्री, जि.धुळे) धरणातून साक्री शहरासाठी पिण्याच्या पाण्याचे आरक्षण ठेवावे अशी मागणी साक्री नगरपंचायतीने शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या धोरणाप्रमाणे पिण्याच्या पाण्याला प्रथम प्राधान्य असतानाही साक्री नगरपंचायतीची मागणी मान्य करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मालनगांव धरणातील पाणी साक्री शहरासाठी आरक्षित ठेवण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.
(२) व (३) नाही.

साक्री शहरासाठी मालनगांव धरणातून १.९५८ दलघमी पाणी आरक्षणाचा प्रस्ताव मे २०१७ मध्ये सादर झालेला आहे. मा.मंत्री (जलसंपदा) यांचेकडे याबाबत प्राप्त निवेदनाबाबत कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळाकडून अहवाल मागवला आहे. अहवाल प्राप्त होताच याबाबत त्वरीत कार्यवाही करण्यात येईल.

तथापि, साक्री शहराच्या पाणीपुरवठा योजनेसाठी जिल्हा आरक्षण समितीमार्फत सन २०१६-१७ या वर्षात मालनगांव मध्यम प्रकल्पात १.४१ दलघमी (५० दलघफु) पाणीसाठा आरक्षित झालेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कळवा (जि.ठाणे) येथील पारसिक बोगद्यावरील अतिक्रमणे हटविण्याबाबत**

**(९५) * ३३८२५ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळवा (जि.ठाणे) येथील पारसिक बोगद्याला जवळपासच्या बांधकामामुळे धोका असल्याने या बोगद्यावरील झोपडया हटविण्याचे आदेश मा.मुख्यमंत्री यांनी वनविभागाला दिल्याचे दिनांक २१ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पारसिक बोगदयाच्या कळवा व दिवा येथील दोन्ही बाजूंना अनेक झोपडया असुन या झोपडयांमधून सातत्याने रेल्वे रुळांवर कचरा टाकण्याचे प्रकार घडतात तसेच झोपड्यांचे सांडपाणी थेट बोगद्यात पडत असल्याने या बोगद्याला धोका असल्याने विभागातील नागरिकांचे इतरत्र स्थलांतर करण्याचे वन विभाग व ठाणे मनपा तसेच रेल्वे यांना निदेश देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) मा.मुख्यमंत्री व मा.रेल्वेमंत्री यांच्या उपस्थित दिनांक १८/४/२०१७ रोजी झालेल्या बैठकीत पारसिक बोगद्यावरील अतिक्रमणे हटविण्याकरिता आवश्यक कार्यवाही करण्यास ठाणे महानगरपालिका, वन विभाग व रेल्वे यांना सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच हटविण्यात येणाऱ्या झोपडपट्टीवासीयांचे एस.आर.ए. अथवा प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत पुनर्वसन करण्याकरिता एस.आर.ए. आणि गृहनिर्माण विभागाव्दारे कार्यवाही करण्यास देखील निर्देश देण्यात आले आहेत.

(३) पारसिक बोगद्याच्या डोंगरावरील कळवा बाजूकडील २८ अतिक्रमित झोपड्या व मुंब्रा बाजूकडील ४६ अतिक्रमित झोपड्या स्थलांतरित करण्याचा निर्णय दिनांक २३/६/२०१७ रोजीच्या बैठकीत घेण्यात आलेला होता. त्यानुसार संबंधित प्राधिकरणांकडून उक्त ठिकाणच्या झोपड्यांना संयुक्तपणे नोटीसा बजावण्यात आलेल्या असून सद्य:स्थितीत त्या हटविण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शेततळयांची कामे पूर्ण करण्याबाबत

**(९६) * ३०९२१ श्री.नारायण राणे, श्री.जयंत पाटील, श्री.बाळाराम पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ३०६१८ ला दिनांक ६ एप्रिल, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१६-१७ या वर्षात किमान एक लाख शेततळी बांधण्याचे शासनाचे उद्दिष्ट असताना फक्त ५ हजार २१० शेततळी बांधल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील जलयुक्त शिवार योजनेची आणि शेततळ्यांची कामे दोन महिन्यात पूर्ण करण्याचे निर्देश मा. मुख्यमंत्री यांनी दिनांक १९ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास राज्यातील जिल्हाधिकारी यांना दिले आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त निश्चित केलेले उद्दिष्ट पुर्ण न झाल्याने याबाबत शासनाने चौकशी करुन सदर कामास निधी उपलब्ध करुन कामे पूर्ण करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, मा. मुख्यमंत्री यांनी निदेश देवूनही कामे अपूर्ण ठेवणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) हे खरे नाही. “मागेल त्याला शेततळे” या योजनेंतर्गत १,११,१११ इतका लक्षांक निश्चित करण्यात आला आहे. दिनांक ३१ मे, २०१७ रोजी शेततळ्यांची ३६,२९४ इतकी कामे पूर्ण झाली होती, तर ११,५३० इतकी कामे प्रगतीपथावर होती.

(२) व (३) होय. शेततळयांची कामे जलद गतीने पूर्ण होण्यासाठी शासनाने वेळोवेळी पुरेसा निधी उपलब्ध करून दिला आहे. तसेच, मशिनधारकास शेततळयाच्या केलेल्या कामाची रक्कम मिळण्याची हमी देण्यासाठी क्षेत्रियस्तरावर लाभार्थी शेतकरी, मशिनधारक आणि कृषी विभागाचा प्रतिनिधी यांच्यामध्ये करार करण्याबाबत तसेच, लाभार्थ्यास अनुज्ञेय रकमेपैकी २० टक्के रक्कम अग्रिम देण्याबाबतच्या सुचना देण्यात आल्या आहेत. सद्य:स्थितीत शेततळ्यांची ४७,८२४ इतकी कामे पूर्ण झाली आहेत तर ७,२६२ इतकी कामे प्रगतीपथावर आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर शहरात पॅथॉलॉजी संचालकांकडून गरीब रुग्णांची आर्थिक फसवणूक होत असल्याबाबत

**(९७) * ३१२९६ प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील धंतोली, बर्डी, रामदास पेठ, मेडीकल चौक सेंट्रल एवेन्यू, इतवारी, सक्करदरा येथील सोनकुल डायग्नोस्टिक सेंटरमध्ये रक्त तपासणी, मल, मूत्र तपासणीची शुल्क मनमानीपणे घेत असून प्रत्येक परिसरात तपासणी चे शुल्क वेगवेगळे असल्याने गरीब रूग्णाची पॅथॉलॉजी लॅब संचालकांकडून मोठया प्रमाणात फसवणूक होत असल्याचे दिनांक २२ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पॅथॉलॉजी संचालकाकडून होणाऱ्या फसवणुकीवर निर्बंध घालण्यासाठी संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**म्हैसाळ (ता.मिरज, जि.सांगली) येथील बेकायदा गर्भपात व भ्रूणहत्या प्रकरणी चौकशी समिती नियुक्त करण्याबाबत**

**(९८) * ३१०९२ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हैसाळ (ता.मिरज, जि.सांगली) येथील बेकायदा गर्भपात व भ्रुणहत्या प्रकरणी शासनाने चौकशी करण्यासाठी नेमलेल्या चौकशी समितीने चौकशी पूर्ण करुन आपला अहवाल दिनांक १५ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर चौकशी समितीने शासनास सादर केलेल्या अहवालानुसार अहवालातील तपशील काय व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, राज्यात अशा प्रकारांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी कोणती विशेष दक्षता घेण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

अद्याप शासनास अहवाल सादर केलेला नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली सर्व जिल्ह्यांमध्ये पत्रकार परिषदा घेण्यात आल्या असून त्यामध्ये जिल्ह्याचे म.न.पा. आयुक्त, पोलीस आयुक्त (म.न.) असल्यास जिल्हा पोलीस अधिक्षक, अन्न व औषध प्रशासन अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी (जि.प.), जिल्हा आरोग्य अधिकारी, महिला बालकल्याण अधिकारी उपस्थित होते.

- पीसीपीएनडीटी कायद्यांतर्गत कोणत्याही नोंदणीकृत, अनोंदणीकृत केंद्रातील डॉक्टर किंवा अन्य कोणी, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कायद्याचे उल्लंघन केल्याचे निदर्शनास आणून देणाऱ्या व्यक्तीस संबंधितांवर कोर्ट केस दाखल केल्यानंतर रक्कम रुपये २५,०००/- बक्षीस देण्यात येणार असल्याबाबतचे आवाहन करण्यात आले आहे.
- पीसीपीएनडीटी व एमटीपी कायद्याच्या अनुषंगाने तक्रार करावयाची असल्यास उपलब्ध असलेले टोल फ्री नं. (१०४ व १८००२३३४४७५) www.amchmulgi.gov.in वेबसाईट याबाबत मोठ्या प्रमाणावर प्रबोधन करण्याविषयी सर्वांना पत्रकार परिषदेमध्ये आवाहन करण्यात आलेले आहे.

- दिनांक ३१/५/२०१७ अखेर राज्यामध्ये ३५९०१ वैद्यकीय केंद्रांची तपासणी करण्यात आली असता, ६३१८ केंद्रात त्रुटी आढळून आल्या आहेत. सदर त्रुटी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या समितीसमोर ठेवण्यात आल्या असता त्या केंद्रांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आली आहे. तसेच समितीच्या शिफारशीनुसार १५ बोगस डॉक्टरांवर एफआयआर दाखल करण्यात आले आहेत.
- राज्यामध्ये गर्भधारणापूर्व व प्रसूतीपूर्व निदान तंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध) या कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**मानखुर्द बालसुधारगृहात अल्पवयीन मुलीला मारहाण केल्याबाबत**

**(९९) * ३२३०० डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.सुनिल तटकरे** : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानखुर्द (मुंबई) येथील बालसुधारगृहाच्या व्यवस्थापिका संगिता पवार यांनी बाथरुममध्ये उशिर झाल्याने एका आठ वर्षीय अल्पवयीन मुलीला मारहाण करुन तिने केलेली उलटी चाटण्याची शिक्षा दिल्याचे दिनांक ३० मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय

(२) असल्यास, याप्रकरणी बालसुधारगृहाच्या व्यवस्थापिका यांच्या विरोधात ट्रॉम्बे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने संबधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) होय. बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ च्या कलम ७५ अन्वये व्यवस्थापिकेवर ट्रॉम्बे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) दि चिल्ड्रेन्स एड सोसायटी यांनी संबंधित मेट्रन यांना निलंबित केले आहे. तसेच जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, मुंबई उपनगर यांनी दिनांक ३१/५/२०१७ रोजी मानखुर्द येथील बालगृहात जाऊन चौकशी केली असून, सदर प्रकरणी त्वरीत कारवाई करण्यात यावी असे लेखी आदेश दिलेले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पंढरपुर (जि.सोलापूर) तालुक्यातील निरा व उजव्या कालव्यावरील शेतकऱ्यांना पाणी मिळण्याबाबत

**(१००) * ३२४७५ श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यातील निरा व उजव्या कालव्याच्या शाखा क्र. १ व २ वरील अनेक शेतकऱ्यांना पास असूनही पाणी मिळाले नसल्यामुळे ऐन उन्हाळयात पाण्याअभावी डाळींब, द्राक्षे बागा व शेतपीके जळून शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने नुकसान झालेल्या फळ व शेतपिकांचे त्वरीत पंचनामे करुन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत तसेच, शेतकऱ्यांना पाणी उपलब्ध न करुन देणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) लागू करण्याचा निर्णय घेतल्याबाबत

**(१०१) * ३२१५३ श्री.संजय दत्त :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात जीएसटी लागू झाल्यानंतर कर वसूलीबाबत राज्याच्या अधिकारात कपात होऊन केंद्र शासनाला अमर्याद अधिकार प्राप्त होणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जीएसटीमुळे राज्यातील महानगरपालिका, नगरपालिका व नगरपरिषदा यांच्याकडून वसूल करण्यात येणारे स्थानिक संस्था कर व जकात कर विचारात घेतल्यास एकुण ३० हजार कोटी पेक्षा जास्त उत्पन्नांचे स्त्रोत बंद होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, जीएसटीमुळे राज्यातील महापालिकांची निर्माण होणारी आर्थिक तूट भरुन काढण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) होय. राज्यामध्ये दिनांक १ जुलै, २०१७ पासून वस्तू व सेवा कर (जीएसटी) प्रणाली अंमलात आली आहे.
(२) हे खरे नाही. महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ अनुसार राज्यास राज्यांतर्गत होणाऱ्या वस्तू व सेवांच्या पुरवठ्यावर कर आकारणीचा अधिकार असल्याने जीएसटी लागू झाल्यानंतर ही कर वसूलीबाबत राज्याच्या अधिकारात कपात झालेली नाही.
(३) हे खरे नाही. संविधान (एकशे एक) सुधारणा कायदा, २०१६ अन्वये राज्यास, पर्यायाने महानगरपालीकांना स्थानिक संस्था कर तसेच जकात वसूल करण्याचा अधिकार दिनांक १ जुलै, २०१७ पासून निरसित झाला आहे. नगरपालिका व नगरपरिषदामार्फत स्थानिक संस्थाकर व जकात याची आकारणी करण्यात येत नव्हती. महानगरपालिकामार्फत स्थानिक संस्था कर तसेच जकातमुळे प्राप्त होणाऱ्या महसूलाची भरपाई पाच वर्ष केंद्र शासनामार्फत करण्यात येणार आहे.
(४) राज्य शासनाने महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (स्थानिक प्राधिकरणांना द्यावयाची नुकसानभरपाई) कायदा, २०१७ दिनांक १ जुलै, २०१७ पासून अंमलात आणला असून, त्यान्वये महानगरपालिकांना स्थानिक संस्था कर व जकात निरसीत झाल्याने होणाऱ्या आर्थिक तूटीची भरपाई करण्यास राज्य शासन बांधील आहे.
(५) लागू नाही.

-----------------

## महाड (जि.रायगड) तालुक्यात भावे आरोग्य उपकेंद्राची दूरवस्था दूर करण्याबाबत

**(१०२) * ३२५०३ श्री.जयंत पाटील, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड तालुक्यातील (जि.रायगड) भावे, भावेपठार, पिंपळदरी, मोरानडेवाडी या गावांसह अतिदुर्गम गावातील नागरीकांना प्राथमिक स्वरूपातील आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी आरोग्य विभागामार्फत वरंध प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत भावे आरोग्य उपकेंद्राची निर्मिती करण्यात आली असून या आरोग्य उपकेंद्रात नागरीकांना आरोग्य सेवेचा लाभ मिळत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भावे आरोग्य उपकेंद्राची इमारत नादुरूस्त झालेली असून अनेक आधुनिक सुविधांचा अभाव असल्याने रूग्णांची गैरसोय होत असून या ठिकाणी प्रसुती केली जात नसल्याने गर्भवती स्त्रियांना बिरवाडी किंवा वरंध येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात अथवा खासगी रूग्णालयात उपचार घ्यावे लागत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन त्यानुषंगाने भावे आरोग्य उपकेंद्र सुस्थितीत करण्यासाठी व रूग्णांना योग्य आरोग्य सेवा मिळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र वरंध, ता.महाड अंतर्गत भावे आरोग्य उपकेंद्र कार्यरत आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**उत्तमसिंग चव्हाण**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण : शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.